# १

# राजकीय जागृतीची सुरुवात

१.० उद्दिष्टे
१.१ प्रस्तावना
१.२ १८५७चा उठाव - कारणे व परिणाम
१.३ राजकीय संघटनांचे योगदान
१.४ भारतीय राष्ट्रीय सभेची (काँग्रेस) स्थापना
१.५ सारांश
१.६ प्रश्न
१.७ संदर्भसूची

## १.० उद्दिष्टे

(१) १८५७ च्या उठावाची पार्श्वभूमी समजणे

(२) १८५७ च्या उठावाची कारणे व व्याप्ती समजणे.

(३) उठावाचा घटनाक्रम व उठाव अयशस्वी होण्यास कारणीभूत घटक उमगणे.

(४) उठावाचे परिणामांचे आकलन होणे.

(५) देशातील विविध प्रांतांमध्ये उदयाला आलेल्या राजकीय संघटनांची माहिती होणे.

(६) बेंगाल ब्रिटीश इंडिया सोसायटी व जमीनदारी सभा यांच्या स्थापना व त्यांचे कार्य याची माहीती होणे.

(७) ब्रिटीश बेंगाल असोसिएशनी स्थापना व कार्य समजणे.

(८) इंडियन असोसिएशनचे कार्य व उद्दिष्टे याबाबत माहीती होणे.

(९) बॉम्बे असोसिएशनची (मुंबई सभा) स्थापना व कार्य याचे आकलन होणे.

(१०) पुणे सार्वजनिक सभेच्या कार्याबद्दल जाणीव होणे.

(११) भारतीय राष्ट्रीय सभेच्या स्थापनेस कारणीभूत घटनांचे आकलन होणे.

(१२) राष्ट्रीय सभेच्या स्थापनेत ॲलन हयुम यांच्या योगदानाबद्दल माहिती.

(१३) राष्ट्रीय सभेची ध्येय धोरणे स्पष्ट होणे.

(१४) राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात संमत झालेले ठरावांचे आकलन होणे.

(१५) राष्ट्रीय सभेबाबत ब्रिटीशांचा दृष्टिकोण स्पष्ट होणे.

## १.१ प्रस्तावना

१८५७ चे बंड ही अनपेक्षित अथवा अकस्मात घडलेली घटना नव्हती. १७५७ पासून प्लासीच्या लढाईनंतर ब्रिटीश साम्राज्य विस्तार सुरु झाला होता. १७५७ ते १८५७ या शंभर वर्षात ब्रिटीशांचे राजकीय सामर्थ्य वाढलेले होते. या राजकीय सत्ता विस्तारामुळे भारतातील अनेक घटकांना झळ पोहोचली होती. सैनिक,शेतकरी, विणकर, कापडउदयोगातील लोक इत्यांदीच्या कामावर ब्रिटीश शासन प्रणालीचा परिणाम झाला होता. भारतीय समाज घटकांची आर्थिक पिळवणूक हा कळीचा मुद्दा होता. १८५७ चा उठाव या पार्श्वभूमीवर घडलेली महत्वाची घटना होय. भारतातील ब्रिटीश साम्राज्याला या बंडाने जबर तडखा बसला होता. या बंडाची परिपूर्ण माहिती जाणून घेण्यासाठी त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे.

## १.२ १८५७चा उठाव - कारणे व परिणाम

**१८५७च्या बंडाची पार्श्वभूमी -**

१८५७ चा उठाव म्हणजे केवळ सैनिकांनी केलेला उठाव नव्हता. १७५७ पासून १८५७ पर्यंत देशातील विविध भागांमध्ये अनके समाजघटकांनी वेळोवेळी ब्रिटीशांविरोधात लढा दिला होता. त्यामध्ये आदिवासी समुहांचा मोलांचा वाटा होता. ब्रिटीशांना पहिला विरोध झाला तो या देशातील विविध आदीवासी जमातीकडून. ब्रिटीशांचे नैसर्गिक साधनसंपत्ती लूटण्याचे धोरण त्यास कारणीभूत होते.

**भिल्लांचा उठाव -** पश्चिम महाराष्ट्रात मोठया भूभागावर भिल्ल जमात वसली होती. डोंगराळ प्रदेशातील पायवाटांवर त्यांचे नियंत्रण होते. खान्देश प्रांत ब्रिटीशांनी अंमलाखाली आणल्यावर त्यांचा भिल्लांशी संघर्ष अटळ होता. १८१७ मध्ये भिल्लांनी संपूर्ण शक्तीने ब्रिटीशांविरुद्ध संघर्ष सुरु केला. ब्रिटीशांची सैन्यशक्ती जास्त असल्याने त्यांनी हा उठाव मोडून काढला. भिल्लांना पराभूत करण्यासाठी त्यांनी अनेक अमानवीय पद्धतीचा वापर केला. भिल्लांनी पूर्णपणे हार न मानता वेळोवेळी ब्रिटीश सत्तेला आव्हान दिले.

**रामोशी जमातीचा उठाव -** मराठा सैन्यामध्ये रामोशींना महत्वाचे स्थान होते. १८१८ नंतर मराठा साम्राज्याचा अंत झाल्यावर रामोशींना सामावून घेणारी कोणतीही यंत्रणा नव्हती. ब्रिटीश प्रशासकीय यंत्रणेत त्यांच्यासाठी स्थान नव्हते. उमाजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली रामोशींनी बंडाचे निशाण फडकाविले. उमाजी नाईक यांना ब्रिटीशांनी पकडले व देहदंडाची सजा दिली. परंतू रामोशांनी हार मानली नाही. अखेरीस ब्रिटीशांनी त्यांना पोलीस खात्यात काही पदांवर नेमणूक करुन त्यांचे समाधान करण्याचे प्रयत्न केले.

**सावंतवाडीतील बंड -** सावंतवाडी मधील लोकांनी १८३० व १८३६ मध्ये ब्रिटीशांविरोधात बंड उभे केले. ब्रिटीशांनी ते बंड शमवण्यासाठी व प्रशासकीय कारभारासाठी एक प्रमुख अधिकारी नेमला. तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अनेक योजना निमंत्रित केल्या गेल्या.

**कोळी जमातीचा उठाव -** रामूजी भांगरे या प्रमुखाच्या नेतृत्वाखाली कोळी जमातीने १८२८ मध्य ब्रिटीश सत्तेविरुद्ध उठाव केला. ब्रिटीशांनी अनेक कोळयांना ठार मारले व गावावर आडी टाकून त्यांची कसून तपासणी करण्यात आली. १८७३ मधे होन्या या कर्तृत्ववान व शूर कोळी प्रमूखाने ब्रिटीशांविरुद्ध लढण्यासाठी एक सुसज्ज यंत्रणा उभारली.सावकार व जमीनदार यांच्या विरोधातही त्यांनी आघाडी उघडली. होन्याला पकडल्यानंतरही कोळी जमातीने हार न मानता आपला संघर्ष सुरुच ठेवला.

**कच्छचे बंड -** कच्छचा राजा राव भारमाल याला ब्रिटीशांनी पराभूत करुन त्याच्या मूलाला राजा बनवले. त्याचा मुलगा अल्पवयीन असल्याने ब्रिटीशांनीच राज्यकारभार करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. ब्रह्मदेशातील ब्रिटीश सैन्याला पहिल्यांदा हार स्विकारावी लागली होती. त्याची बातमी भारतात पोहोचताच लोकांनी ब्रिटीश सत्तेविरुद्ध उठाव केला.

**वहाबी चळवळ -** रायबरेली येथील सय्यद अहमद यांनी वहाबी या धार्मिक चळवळीद्वारे ब्रिटीश साम्राज्याविरुद्ध लढा देण्याचा प्रयत्न केला. इस्लाममधील आधुनिक विचारांना नाकारुन त्यांनी त्यांचे शुद्धीकरण ही संकल्पना मांडली . ब्रिटीश राज्य हा शाप असून त्याचे उच्चाटन होणे आवश्यक असल्याचे विचार त्यांनी पसरवले. १८५७ च्या बंडाची धग अधिक तेज करण्यात वहाबी चळवळीने भरघोस प्रयत्न केले.

**सैन्याचे बंड -** १८५७ पूर्वीदेखील सैनिकांनी अनेक वेळा ब्रिटीस

शासनाविरुद्ध बंड केले होते. १७६४ मधे पहिले बंडाचे निशाण फडकवले गेले. त्या वेळेस बंड करणाऱ्या पूर्ण निपा:त करण्यात आला होता. ब्रिटीशांनी सैन्यात शिस्त आणण्यासाठी अनेक उपाययोजना अमलात आणल्या होत्या. त्यामुळे देखील सैन्यात असंतोष, अविश्वास पसरला होता. १८०६ मधे वेल्लोर येथे काही सैनिकांनी याविरुद्ध बंड केले होते. परंतू ब्रिटीशांनी वेळीच उपाययोजना केली. यावरुन हे ध्यानात येते की १८५७ चे बंड ही अचानक व अकस्मात घडलेली

घटना नव्हती. याआधीही सैनिकांनी आपला असंतोष दाखवून दिला होता. मात्र १८५७ मधे त्याचे रुपांतर मोठया वणव्यात झाले.

**उठावाची कारणे :**

१८५७ चा उठाव हा प्रामुख्याने सैनिकांनी केलेला असला तरी त्यास ते एकच कारण नव्हते. समाजातील विविध घटकांमध्ये ब्रिटीश राजवटीविरुद्ध असंतोष पसरला होता. त्याचा उद्रेक १८५७ मधे झाला. या उठावाची काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

**राजकीय कारणे -** ईस्ट इंडिया कंपनीने भारतात व्यापार करण्यासाठी प्रवेश केला होता. ऐतद्देशीय राजकारणाचे कच्चे दुवे हेरुन कंपनीने अल्पावधीत राजसत्तेवर वर्चस्व प्रस्थापित केले. अनेक छोटया व प्रभावशाली राज्यसत्तांना बरखास्त करुन कंपनीने आपले साम्राज्य उभे केले. देशातील विविध राज्ये अनेक कारणांनी त्यांनी खालसा केली. लॉर्ड वेलस्ली याची तैनाती फौज पद्धती परिणामकारक पद्धतीने वापरुन ब्रिटीशांनी अनेक सत्तांना मांडलिक बनवले. कालांतराने लॉड डलहौसीने अनेक राज्यसत्ता दत्तक वारस नामंजूर, कुप्रशासन अशा सबबीखाली ब्रिटीश साम्राज्याला जोडल्या. लॉर्ड डलहौसी हा १८४८ ते १८५६ या काळात भारताचा गव्हर्नर जनरल होता. त्याने ब्रिटीश साम्राज्य विस्ताराचे धोरण अमलात आणले. संस्थाने खालसा करण्याच्या धोरणातून त्याने सातारा, जयपूर, सबळपूर, झाँसी,नागपूर व इतर अनेक संस्थाने सरळ ब्रिटीश साम्राज्याला जोडली. संस्थाने खालसे केल्यावर त्यांच्या संस्थानिकांना दरवर्षी मिळणारा भत्तादेखील रद्द केला. नानासाहेब पेशवा यांचादेखील वार्षिक भत्ता बंद केला. अवध संस्थानाच्या नवाबाला लोकांचा पाठींबा होता असे असूनही अवधचे संस्थानही खालसा करण्यात आले. त्याने ब्रिटीशांचे मांडलिकत्व पत्करुनही त्यांच्या वाटयाला सत्तेहून पायउतार होण्याचे दुर्भाग्य आले. त्यामुळे अवधची जनता व सैनिक दोघांमधे प्रंचड असंतोष पसरला. संस्थाने खालसा झाल्यावर तेथे नोकरीला असलेल्या लोकांची कंपनीने कोणतीही सोय केली नाही. त्यांना पर्याय उपलब्ध करुन दिला नाही. त्यामुळे अवधचा नबाब वाजीद अली याला लोकांनीच  पाठींबा दिला. बहादूरशहा दुसरा यांच्या मूत्युनंतर ब्रिटीशांनी त्यांचे लाल किल्यातील बस्तान हलविले.गवर्नर जनरल मुघल बादशहाचा अजिबात सन्मान करत नसत. त्यामुळे मुघल साम्राज्याशी निष्ठा असलेले लोकही ईस्ट इंडिया कंपनीच्या राजकारभाराविरुद्‌ध गेले. मुघल बादशहाचा अपमान हा त्यांना झोंबणारा होता.

**प्रशासकीय कारणे :**

ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन हे तुलनेने आधुनिक असले तरी ते लोकाभिमुख नव्हते. सर्वसामान्य लोकांचे प्रश्न सोडवण्याऐवजी त्या प्रशासनाचा उपयोग ब्रिटीश सत्ता टिकवणे व देशाची आर्थिक पिळवणूक पद्धतशीरपणे करणे हाच होता. सर्वोच्च प्रशासकीय जागा या इंग्रजांसाठीच राखीव होत्या. भारतीय वंशाच्या

munotes.in

लोकांना त्यात कोणताही वाव नव्हता. भारतीयांबद्दल ब्रिटीशांना आकसबुद्धी होती. ते भारतीयांना हीनपणे वागवत. ब्रिटीशांनी भारतात आणलेले कायदयाचे राज्य ही संकल्पना देखील भारतीयांच्या सहजपणे पचनी पडली नाही. भारतात जातीव्यवस्थेप्रमाणे उच्चवर्णीय व निम्नवर्गीय यांसाठी वेगवेगळे कायदे होते. उच्चवर्णियांना शिक्षेत सूट होती. तुलनेने कनिष्ठ जातीतील लोकांना कमी गुन्हयासाठीही जबर शिक्षेची तरतूद होती. या पार्श्वभूमीवर सर्वासाठी समान कायदा ही भूमिका येथील परंपरेने उच्च वर्णाचा लाभ घेणाऱ्यांना मानवणारी नव्हती. सर्वासाठी समान कायदा ही भूमिका समाजातील कनिष्ठ जाती व गरीब लोक यांच्यासाठीही फारशी लाभदायक नव्हती कारण त्यांना या कायदे प्रणालीचे ज्ञान नव्हते. देशात अशिक्षित लोकांचे प्रमाण जास्त होते. त्यामुळे कायदे प्रणालीचा व न्याय प्रणालीचा लाभ घेण्याची क्षमता लोकांमध्ये नव्हती. सर्वसामान्य लोकांना याचा लाभ मिळवून देण्याची मानसिकता ही ब्रिटीश प्रशासनात रुजली नव्हती.

**आर्थिक कारणे :**

ब्रिटीशांच्या वसाहतवादी धोरणांमुळे भारताच्या आर्थिक व्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला होता. भारतावर याआधी आलेल्या परकीय सत्ता या भारतातच राहील्या होत्या. त्यामुळे येथील संपत्तीचे बाहेर वहन झाले नाही. मात्र ब्रिटीशाची नाळ ही इग्लंडशी जोडली असल्याने त्यांनी भारताकडे एक लूट करण्यास योग्य असलेली वसाहत या दृष्टीनेच पाहिले होते. भारतातील संपत्तीचे पद्धतशीरपणे त्यांनी इंग्लडला वहन केले. इंग्लंडमधील कंपन्यांना लागणार कच्चा माल त्यांनी भारतातून स्वस्तात नेला व तेथील कंपनीत तयार होणारा पक्का माल भारतात आणून विकला. इंग्लडमधील कापड गिरण्यामधील कापड भारतात विक्री करण्यासाठी त्यांनी भारतातील हातमाग उदयोगधंदे बंद पाडले. ब्रिटीश वस्तूंची भारतात निर्यात केली गेली व त्यासाठी अनुकूल बाजारपेठ तयार केली गेली. भारतीय उदयोगधंदे मोडीत निघाल्याने बाजारपेठेत ब्रिटीश वस्तु सहजपणे खपू लागल्या. यामुळे कारागीर, विणकर व कष्टकरी बेरोजगार झाले. त्यांना दुसरे कोणतेही कौशल्यपूर्ण काम करता येत नसल्याने ते शेतीकडे वळले. त्यामुळे शेतीवरील ताण वाढला. शेती व्यवसाय आधीच ब्रिटीशांच्या सदोष महसूल पद्धतीमुळे तोटयात चालला होता. बंगालमध्ये ब्रिटीशांनी सुपिक जमीनी बडया जमीनदारांच्या ताब्यात देऊन टाकल्या. केवळ जमीन महसूलांचे संकलन व्यवस्थितपणे व्हावे यासाठी जमिनीची मालकी जमीनदार वर्गाला देण्यात आली. त्यातून शेतमजूरांचे प्रचंड शोषण सुरु झाले. ब्रिटीशांनी धान्य रुपात कर घेण्यास नकार दिला त्यामुळे शेतसारा भरण्यासाठी शेतकऱ्यांना प्रचंड ओढाताण करावी लागत असे. प्रसंगी शेतजमीनी गहाण ठेवाव्या लागत किंवा विकाव्या लागत असत. त्यामुळे शेतजमिनीचे मालकच शेतमजूर बनले होते. भ्रष्ट ब्रिटीश अधिकारी व लालची जमीनदार यांच्या अभद्र युतीमधून शेतकऱ्यांचे शोषण सुरु होते. त्यातून सावकार वर्गही त्यांचे शोषण करीत होता. अशा रितीने ब्रिटीशांच्या आर्थिक धोरणांमुळे शेतकरी, कष्टकरी व सैनिक या सर्व वर्गांना विपन्नावस्था आली होती.

**सामाजिक व धार्मिक कारणे :**

ब्रिटीश राज्यकर्ते वंश श्रेष्ठत्वाच्या अहंकाराने पछाडलेले होते. ते स्वतःला उच्च वंशाचे मानत व भारतीय लोकांना कनिष्ठ समजत व तशाच प्रकारचे वर्तन करीत. अनेक सार्वजनिक ठिकाणी भारतीयांना सहजासहजी प्रवेश नव्हते. खास रेल्वे डबे, उदयाने व उपहारगृहे येथे फक्त युरोपियन वंशाच्या लोकांनाच प्रवेश होता. भारतीयांना तेथे जाण्यास मनाई होती. ब्रिटीशांच्या या वर्तणूकीचा भारतीयांना प्रचंड राग होता. वंशश्रेष्ठत्वाच्या अहंगडातून ब्रिटीश अधिकारी वेळोवेळी भारतीयांचा पाणउतारा करीत. काही ब्रिटीश अधिकाऱ्यांनी उदारमतवादी दृष्टीकोणातून भारतातील सामाजिक रूढींमध्ये बदल करण्याचे प्रयत्न केले. अनिष्ट प्रथा, परंपरा बंद करण्याचे प्रयत्न केले. सती प्रथा कायदयाने बंद करणे, विधवा विवाहाल उत्तेजन देणे, स्त्री शिक्षणाला चालना देणे यासारख्या सामाजिक सुधारणा करण्याच्या आग्रहामुळे भारतीयांना ब्रिटीशांच्या हेतूबद्दल शंका येवू लागली होती. अनिष्ट असल्या तरी त्या चालीरीती हिंदु धर्माचा भाग होत्या. त्यामुळे आमच्या धर्मात ब्रिटीशांनी ढवळाढवळ करावी हे त्यांना अमान्य होते. याशिवाय हिंदु धर्मात मूलींना जन्मतःच मारण्याची परंपरा काही राज्यात होती. काही ठिकाणी तर अनेक क्रुर पद्धतींचा वापर करुन स्त्रीभ्रूणहत्या केली जात होती. ब्रिटीशांनी कायदयाचा वापर करुन या अमानवीय पद्धतींना पायबंद घालण्याचा प्रयत्न केला. १८२९ मधे लॉर्ड विलियम बेंटींक याने सती प्रथा बंद केली. मुंबईमधे गर्व्हनर माऊंट स्टुअर्ट एलफिस्टन याने ही अनेक सुधारणा करण्याचे काम केले. समाजातील धर्ममार्तडांना हया सुधारणा अमान्य होत्या. आपला धर्म धोक्यात असून ब्रिटीश ख्रिश्चन मिशनाऱ्यांच्या सहाय्याने हे कार्य करीत असल्याची भावना धार्मिक कट्टर लोकांमध्ये प्रबळ झाली.

ख्रिस्चन मिशनरी हे धर्मप्रसाराचे कार्य करीत. त्यांनी अनेक सेवाभावी संस्था काढून त्यामार्फत धर्मप्रसाराचे कार्य केले. अर्थात हे मिशनरी केवळ इग्लंड या देशातून आलेले नव्हते व ब्रिटीश प्रशासनाने अधिकृतरित्या धर्मप्रसाराला उत्तेजन ही दिलेले नव्हते. परंतू सर्वसामान्य लोकांमध्ये सर्व ख्रिश्चन मिशनरी व ब्रिटीश यांच्यात संगनमत असून ते सर्व लोकांचे धर्मांतर करु इच्छितात अशी भावना तयार झाली. अनेक हिंदु लोकांनी स्वेच्छेनेदेखील ख्रिश्चन धर्म स्विकारला होता. त्याचाही हिंदु धर्मत्तीत कडव्या मंडळींना धक्का बसला होता. मिशनरी हिंदु देवदेवतांची टिंगल करतात व धर्म निंदा करतात याचाही राग या मंडळीमध्ये होताच. ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या सामाजिक सुधारणा व ख्रिश्चन धर्म प्रसारकाचे कार्य यामुळे हिंदु धर्म धोक्यात आल्याची भावना पसरली.

जातीव्यवस्था आणि जातीभेद हे हिंदु धर्माचे महत्वाचे लक्षण. ब्रिटीशांनी यामध्ये कोणतीही ढवळाढवळ केली नाही परंतू त्यांच्या प्रशासकीय बाबींमध्ये ते जातीव्यवस्थेचे पालन करु शकत नव्हते. सैन्यदलांमध्ये तथाकथित उच्च जातीयांसाठी वेगळे उपहार गृह व कनिष्ठ जातींसाठी वेगळे अशा बाबी आधुनिक सैन्यव्यवस्थेत पाळणे त्यांना शक्य नव्हते. त्याचाही सैन्यदलातील उच्चवर्णिय

सैनिकांना राग होता. आधुनिक इंग्रजी शिक्षण व आधुनिक कायदे व्यवस्था यामुळे आपल्या धर्मातील परंपरावादी मूल्यांना धोका निर्माण होऊ शकतो याची जाणीव धर्मातीत मूलतत्ववादी मंडळींना झाली होती. हिंदु व मुस्लिम धर्मस्थळांनाही ब्रिटीशांनी कायदयाच्या व करांच्या कक्षेत आणले होते त्यामुळे वर्षानुवर्षे एकाधिकार राहीलेल्या व्यवस्थेलाही हादरा बसू लागला होता. परकीय संस्कृतीच्या आक्रमणामुळे आपला धर्म धोक्यात आल्याची जाणीव हिंदु व मुस्लीम दोन्ही घटकांना अस्वस्थ करत होती.

**लष्करी कारणे :**

ब्रिटीशांची भारतावरील राजकीय वर्चस्व हे मूळात भारतीय सैनिकांच्या बळावरच सुरु होते. असे असूनही त्यांना ब्रिटीश अधिकारी मानाने वागवत नसत. युरोपियन सैनिकांच्या तुलनेत त्यांना कमी प्रतीची वागणूक देण्यात येत होती. युरोपियन सैनिक व भारतीय सैनिक यांच्या पगारातही कमालीची तफावत होती. तसेच सैन्यदलातील ईतर भत्ते व बढतीच्या संधी याबाबत ही भारतीय सैनिकांना फारसा वाव नव्हता. ब्रिटीश सैनिकांना लष्करातील सर्व बढतीच्या जागा मिळत. उच्च जागा या फक्त ब्रिटीशांसाठीच राखीव होत्या. भारतीय सैनिकांना सैन्यदलातील मोक्याच्या जागा कधीच मिळत नसत.

बंगालमधील ब्राह्मण व राजपूत सैनिक ब्रिटीशांच्या सैन्यात जातीभेद न पाळण्याच्या धोरणांवर नाराज होते. तसेच त्यांनी आणलेल्या समाजसुधारणांमुळेही त्यांच्यात नाराजी होती. जातिबंधने पाळणे व जातश्रेष्ठत्व दर्शवणाऱ्या कोणत्याही खूणा लष्करात बाळगणे याला सक्त मनाई होती. त्यामुळे उच्चवर्णिय हिंदी सैनिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या होत्या. सैन्यदलातील सर्व सैनिकांना मोफत पत्र पाठवण्याची सुविधाही ब्रिटीश सरकारने बंद केली होती. तसेच हिंदु धर्मात समुद्र प्रवासास बंदी असातानाही हिंदु सैनिकांना बर्मासारख्या देशात जबरदस्तीने पाठवण्यात आले होते. लॉर्ड कॅनिंग याच्या काळात पास झालेल्या कायदयानुसार हिंदी सैनिकाला ब्रिटीश साम्राज्यात कोठेही लढायला जाणे बंधनकारक होते. अनेक सैनिकांना क्रिमिया, चीन व ईराण या देशात लढाई करण्यासाठी पाठवण्यात आले. या सर्व बाबींमुळे लष्करात असंतोष माजला होता.

**तत्कालीक कारण :**

१८५७ च्या उठावास कारणीभूत ठरलेले महत्वाचे कारण म्हणजे एनफिल्ड कंपनीने बनवलेल्या रायफलींच्या गोळयांची काडतूसे हे होय. या काडतुसांमधून गोळया भरण्यासाठी त्यांना दाताने तोडावे लागत असे. या काडतुसांमधील चरबी ही गाय व डुक्कर या प्राण्यांची आहे अशी अफवा सैनिकांमध्ये पसरली. गाय हिंदुना पवित्र तर डुक्कर मुस्लीमांसाठी निषिद्ध. त्यामुळे या दोन्ही समाजघटकात कमालीचा असंतोष पसरला. अशा प्रकारची चरबीयुक्त काडतुसे आणून आपला धर्म भ्रष्ट करण्याचे इंग्रज कारस्थान करत असल्याची भावना सैनिकांत पसरली. अनेक सैनिकांनी ही काडतूसे वापरण्याचे नाकारले. त्यांच्यावर शिस्तभंगाची

कारवाई करण्यात आली. मंगल पांडे या शिपायाने २९ मार्च १८५७ मधे एका उच्चपदस्थ ब्रिटीश अधिकाऱ्यावर गोळी झाडली. मंगल पांडे याला देहदंडाची शिक्षा सुनावण्यात आली. यातूनच उठावाची ठिणगी पडली व पहाता पहाता तीचे रुपांतर वणव्यात झाले.

**१८५७ च्या उठावाची व्याप्ती व स्वरुप :**

बेहरामपूरच्या पलटणीने काडतुसांना दिलेला नकार व मंगल पांडे हयाला दिलेली फाशी यातून उठाव सुरु झाला. ३ मे १८५७ रोजी लखनौ व अयोध्या येथील शिपायांनी ही काडतुसे वापरण्यास नकार दिला. मीरतच्या शिपायांमधेही हे बंडाचे लोण पसरले व त्यांनीही असाच पवित्रा घेतला. इंग्रजांनी या सर्वांवर लष्करी कारवाई अंतर्गत शिस्तभंगाचा बडगा उगारला. त्या सर्वाचे कोर्ट मार्शल करुन त्यांना सजा फर्मावण्यात आली. यामुळे संतापलेल्या शिपायांनी ब्रिटीश वंशाच्या लोकांवर हल्ला चढविला व तुरुंगातील आपल्या सहकाऱ्यांना मुक्त केले. ११ मे १८५७ रोजी बंडखोरांनी दिल्ली काबीज केली. उठावातील शिपायांनी इंग्रज शिपयांची कत्तल केली व दिल्लीवर ताबा मिळताच शेवटचा नामधारी असलेला मुघल बादशहा दुसरा बहादूरशहा जफर याला हिदुस्थानचा बादशहा घोषित केले. दिल्लीवर ताबा मिळताच शिपायांनी देशात इतरत्रही ब्रिटीशांवर हल्ले चढवले. फिरोजपूर, अलीगढ, लखनौ, बरेली, वाराणासी, मथुरा, अलाहाबाद, झाशी, अंबाला, बुंदेलखंड इत्यादी ठिकाणी हिंदी शिपायांनी उठाव केला व ब्रिटीशांच्या कैदेत असलेल्या शिपायांची मुक्तता करण्यात आली. राणी लक्ष्मीबाई हिनेही ''मेरी झांशी नहीं दूंगी'' अशी गर्जना करत बंड पुकारले. तात्या टोपे या पेशव्यांच्या सेनापतीने झाशींच्या राणीला साथ दिली. तात्या टोपे व राणी लक्ष्मीबाई ग्वाल्हेरकडे रवाना झाले. नानासाहेब याला तेथे पेशवा घोषित करण्यात आले. पण अल्पावधीतच ब्रिटीशांनी ग्वाल्हेर पुन्हा जिंकून घेतले. झाशीच्या राणीने ब्रिटीशांशी निकराचा लढा दिला पण ब्रिटीशांविरुद्ध लढा देत असताना ती मृत्यू पावली. तात्या टोपे याला पकडून फाशी देण्यात आली. नानासाहेब पेशवा नेपाळकडे पळून गेला. रायबरेली मधे खान बहादूर खानने स्वतःला नबाब म्हणून घोषित केले. बिहारमधे कुंवरसिंह या वयोवृद्ध स्थानिक नेत्यानेही उठावामधे भाग घेतला. ब्रिटीशांनी उठाव पूर्णपणे मोडून काढला. उठावाच्या पहिल्या काही दिवसात ब्रिटीशांना माघार घ्यावी लागली होती पण त्यांच्याशी निष्ठावान असलेल्या सैनिक व संस्थानिक यांच्या सहाय्याने त्यांनी उठावास पायबंद घातला. पंजाबमधील शीख पलटणी दिल्लीला आणून त्यांनी उठाव मोडून काढला. या उठावात राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, कुंवर सिंह, मौलवी अहमुदुल्ला, अवधची बेगम हजरत महल, वकील अझमुल्लाखान इत्यांदीनीही महत्वाची भूमिका बजावली होती. उठाव मोडून काढल्यानंतर सूड म्हणून इग्रजांनी हजारो निरपराध स्त्री पुरुषांची कत्तल केली होती.

**उठावाचे स्वरुप :**

१८५७ च्या उठावाबाबत अनेक इतिहासकारांनी विभिन्न मते प्रकट केली. ब्रिटीश इतिहासकार या उठावाला हिंदु-मुस्लीम विरुद्ध ख्रिश्चन, अशा प्रकारचे स्वरुप देतात. या उठावाल शिपायांचे बंड म्हणून संबोधतात तर राष्ट्रीय इतिहासकार याची स्वातंत्र्ययुद्ध म्हणून दखला घेतात याबाबत काही मते पुढीलप्रमाणे आहेत.

जॉन लॉरेन्स व सीली या उठावाला शिपायांचे बंड म्हणून संबोधतात. इतिहासकार न.र. फाटक हे देखील या उठावाचा उल्लेख शिपाई गर्दी असाच करतात. तत्कालीन समकालीन लेखक किशोरचंद मिश्रा व गोडसे भटजीही या उठावाला शिपायांचे बंड म्हटले आहे. डॉ.आर.सी मुजूमदार यांनी १८५७ च्या बंडास राष्ट्रीय चळवळ म्हणण्यास नकार दिला कारण त्या उठावाचे स्वरुप देशव्यापी व राष्ट्रीय नव्हते. स्वातंत्र्यवीर सावरकर या उठावाला भारताचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध संबोधतात. कार्ल मार्क्सने १८५७ च्या उठावावर विस्तृत निबंध लिहिले आहेत. शोषणाविरुद्ध व सरंजामशाही व्यवस्थेविरुद्ध शेतकऱ्यांनी केलेले बंड असे मार्क्सचे उठावाबाबात आकलन आहे. ब्रिटीश इतिहासकार या उठावाला सुधारणावादी शासन व परंपरावादी भारतीय समाज यांच्यातील संघर्ष असे रुप देण्याचा प्रयत्न करतात. काही इंग्रज इतिहासकार तर सांस्कृतिक व सभ्य लोकांविरुद्ध असभ्य लोकांनी केलेले बंड या शब्दात याचे वर्णन करतात. वस्तुस्थिती पहात १८५७ चे बंड हे शिपायांनी केलेले असले तरी तेवढयापूरते ते मर्यादित नव्हते. शिपायांचे बंड यापेक्षा ते अधिक व्यापलेले होते. शिपायांचे बंड व पहिले स्वातंत्र्ययुद्ध या दोन भूमिकांच्या मधले असा त्याचा उल्लेख होऊ शकतो.

**१८५७ चा उठाव अयशस्वी होण्याची कारणे :**

१८५७ च्या उठावाने ब्रिटीशांसमोर मोठे आव्हान उभे केले होते. केवळ शिपायांचे बंड असे याचे वर्णन केले गले तरी ब्रिटीशांना या उठावाच्या स्वरुपाची जाणीव होती. ब्रिटीशांनी हा उठाव मोडून काढण्यासाठी संपूर्ण शक्ती पणास लावली होती. अखेरीस हा उठाव त्यांनी मोडून काढला. हा उठाव अयशस्वी होण्याची कारणे पुढीलप्रमाणे

**(१) आयोजनाचा अभाव -** १८५७ च्या उठावातील नेते हे समर्पित व लढवय्ये असले तरी त्यांच्यात एकवाक्यता नव्हती . कोणत्या वेळेस काय याचे प्रत्यक्ष नियोजन त्यांनी केले नव्हते. केवळ ब्रिटीश ठाण्यांवर अकस्मात हल्ले करुन दहशत तर निर्माण झाली पण त्यामुळे उठाव यशस्वी होण्याची कोणतीही शाश्वती नव्हती. ब्रिटीश सैन्य लष्करी डावपेचात तरबेज होते. त्यांच्यामधे शिस्तबद्धता व सुसूत्रता होती.

**(२)** उठावातील बंडखोरांच्या तुलनेत ब्रिटीशांकडे अधिक संसाधने होती. मुबलक पैसा, शस्त्रात्रे व सैन्यबळ याबबात ब्रिटीश बंडखोरांच्या तुलनेत सक्षम होते. क्रिमिया व चीनमधील युद्ध समाप्त झाल्याने ब्रिटीशांना अधिक सैनिक उपलब्ध झाले. शस्त्रास्त्रांच्या बाबतीतही ब्रिटीशांची बाजू प्रबळ होती. त्यांच्याकडे आधुनिक शस्त्रास्त्रे होते. आधुनिक रायफलींच्या जोरावर ते बंडखोरांच्या मोठया पलटणीवर देखील मात करु शकत होते. बंडखोर व शूर व लढवय्ये असले तरी त्यांच्या शस्त्रांस्त्रांचा आधुनिक युद्धनिती पुढे निभाव लागणे अवघड होते.

(३) बंडखोरांपुढे एक समान ध्येय नव्हते. एक समान ध्येयासाठी संपूर्ण लढा समर्पित करण्याची त्यांची मानसिकता नव्हती. या उठावात भाग घेणाऱ्यांपैकी प्रत्येकाचा काही ना काही वैयक्तिक स्वार्थ होता. देशप्रेमाच्या भावनेने ओथंबून हा उठाव झालेला नव्हता. राणी लक्ष्मीबाई झाशीसाठी लढत होती. नानासाहेब पेशवा त्याचा तनखा बंद झाल्यामुळे लढत होता. धर्मामार्तडं त्यांच्या धर्मभावना दुखावल्यामुळे लढत होते.

(४) ब्रिटीशांकडे चांगले सेनानी होते. त्यांचा भारताच्या भौगोलिक व राजकीय परिस्थितीचा चांगला अभ्यास होता. इग्लंड या देशाशी निष्ठा ठेवून ते लढत होते. याऊलट उठाव करणाऱ्यांना एकत्रित ठेवू शकेल असा कोणताही नेता त्याच्याकडे नव्हता.

(५) देशातील बहुतेक संस्थानिक लढण्यापासून अलिप्त राहीले. ऊलटपक्षी त्यांनी ब्रिटीशांना मदत केली. त्याचाही विपरीत परिणाम झाला.

**उठावाचे परिणाम :**

१८५७ चा उठाव ब्रिटीशांनी पूर्णपणे दडपून टाकला तरी उठावाची धग ब्रिटीशांना जाणवली होती. अशा तऱ्हेचे उठाव पुन्हा होऊ नये यासाठी खबरदारी घेणे त्यांच्यासाठी आवश्यक बनले होते. त्यानुसार त्यांनी एक निती बनवली व १८५७ च्या राणीच्या जाहीरनाम्यानुसार भारतातील इस्ट इंडिया कंपनीची सत्तेचे हस्तांतर ब्रिटीश राजसत्ता व संसद याकडे झाले. या उठावाचे परिणाम पुढीलप्रमाणे

(१) भारतामध्ये १८५७ पूर्वीची राजकीय सत्ता ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीकडे होती. १८५७ च्या उठावानंतर या राजकीय सत्तेचे हस्तांतरण झाले. ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता संपुष्टात आली. ब्रिटीस राजघराणे व ब्रिटीश संसद यांच्यामार्फत भारतातील राज्यकारभार चालवला जाणार होता. भारताच्या गर्व्हनर जनरलला व्हाईसरॉय हे नवीन पदनाम देण्यात आले.

(२) लॉर्ड कॅनिंग याने १८५८ मधे अलाहाबाद येथे राणीच्या जाहीरनामा प्रसिद्ध केला. भारतातील सर्व लोकांना धर्म व वंश या आधारावर भेदभाव न करता

सर्वांना समान संधी देण्याचे आश्वासन या जाहीरनाम्यात दिले गेले. या बदल्यात भारतातील लोकांनी ब्रिटीश राजसत्तेशी प्रामाणिक रहाण्याचे आवाहन करण्यात आले. सर्व बंडखोरांना जाहीर माफी देण्यात आली. मात्र ब्रिटीश नागरिकांच्या हत्येस जबाबदार असणाऱ्यांना या माफीतून वगळण्यात आले होते.

(३) भारतातील सर्व संस्थानिकांचे स्वातंत्र्य अबाधीत राखण्यात आले. उठाव काळात त्यांची अलिप्तता पाहता भविष्यात हेच आपले मित्र असल्याचे त्यांनी हेरले होते. भारतातील लोकांना त्यांचे धर्म पालन करण्याचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले होते. त्यांच्या धर्मात सरकार ढवळाढवळ करणार नसल्याची ग्वाही देण्यात आली होती. सर्वासाठी समान कायदा शासकीय सेवेत सर्वांना समान संधीदेखील देण्यात आली.

(४) १८५७ च्या उठावानंतर भारतीय व ब्रिटीश यांच्यादरम्यान वांशिक भेद प्रकर्षाने समोर आले. भारतीय लोक हे आपल्यापेक्षा कनिष्ठ असून केवळ बळाच्या सहाय्यानेच त्यांना काबूत ठेवता येईल. अशा प्रकारची मानसिकता ब्रिटीश अधिकाऱ्यांमध्य वाढीस लागली. भारतीयांमधे फूट पाडण्यासाठी ब्रिटीशांनी हिंदु मुस्लीम फुटीरवादी घटकांना उत्तेजन देण्याची चाल खेळली.

(५) १८५७ च्या उठावामधे भारतीय सैन्यदलाचा प्रामुख्याने सहभाग असल्याने या उठावानंतर ब्रिटीशांनी सैन्यव्यवस्थेत मोठया प्रमाणावर बदल केले. भारतीय सैनिकांबद्दलचा त्यांचा विश्वास कमी झाला होता. बंगालमधे युरोपियन सैनिकांची संख्या ४५,००० वरुन ६५,०००वर वाढवण्यात आली. उठावकाळात ब्रिटीशांना मदत केलेल्या पंजाबमधील व वायव्य सरहद्दीवरील सैन्यदलांना झुकते माप देण्यात आले. लष्करात त्यांची भरती मोठया प्रमाणावर करण्यात आली.

(६) या उठावाचा महत्त्वाचा परिणाम म्हणजे समाजसुधारणेबाबत ब्रिटीशांचा बदललेला दृष्टिकोण होय. उठावाआधी मानवतावादी दृष्टीकोणातून काही ब्रिटीश अधिकारी समाज सुधारणेचे कार्य करत होते. मात्र त्यामुळे समाजातील धर्मभावनांना ठेच पोहोचते व धर्ममार्तंड संतप्त होता हे ब्रिटीशांना कळून चुकले. त्यामुळे धर्म व समाज सुधारणेच्या बाबतीतील त्यांचा आग्रह बोथट झाला. समाजसुधारणा करण्यापेक्षा लोकांना योग्य प्रशासन देणे यावर त्यांचा भर राहिला. त्यामुळे समाजसुधारणेच्या प्रक्रियेला खीळ बसली.

अशा प्रकारे १८५७ च्या उठावानंतर ब्रिटीश प्रशासन यंत्रणेत बदल झाले.१८५७ चा उठाव अयशस्वी झाला असला तरी भारतीय असंतोषाची कल्पना ब्रिटीशांना आली होती. भारतीयांनी भविष्यात असा काही उठाव करु नये म्हणून ब्रिटीशांनी अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना योजल्या. समाजात धार्मिक वैमनस्य वाढवले. धर्मफूटीरतावादी संघटनांना उत्तेजन दिले गेले. संस्थानिकांचा उपयोग करुन संबंध देशातील सर्व भूभागांवर नियंत्रण ठेवण्यात आले.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

१) १८५७ च्या उठावाच्या धार्मिक कारणांची चर्चा करा.

## १.३ राजकीय संघटनांचे योगदान

१८५७ च्या अयशस्वी उठावानंतर भारतामध्ये वेगवेगळया प्रांतामध्ये प्रादेशिक संस्था उदयाला आल्या. भारतीयांनी आपल्या प्रश्नांना या सभांद्वारे वाचा फोडली. राजा राममोहन रॉय यांनी पाश्चात्य शिक्षणाचे व मूल्यांचे महत्व जाणले होते. ब्रिटीशांनी सुरु केलेल्या आधुनिक शिक्षणामुळे भारतीयांपैकी काही जण त्यांच्या वैज्ञानिक व सामाजिक प्रगतीमुळे प्रभावित झाले होते मात्र ब्रिटीशांनी या सुधारणांसोबतच भारताची आर्थिक पिळवणूक सुरु केली होती ही गोष्ट ते नजरेआड करु शकत नव्हते. यातूनच भारतीय राष्ट्रवादाचा जन्म झाला. प्रादेशिक सभांनी या कामी मोलाची भूमिका बजावली. एकोणिसाव्या शतकामध्ये या सभांनी भारतीयांना राजकारणाचे धडे दयायला सुरुवात केली होती. प्रादेशिक सभांनी प्रादेशिक प्रश्नांना व राष्ट्रीय समस्यांना वाचा फोडण्यासाठी एक विचारपीठ उपलब्ध करुन दिले होते. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उच्चशिक्षितांनी राजकीय समज लोकांमध्ये येण्यासाठी अशा सभा स्थापना करण्यास सुरुवात केली. सुरुवातीस जातीभिमान अथवा उच्च कुळाभिमान या तत्वांवर काही संस्था सुरु झाल्या पण लवकरच अशा संस्था मागे पडून त्याची जागा राष्ट्रविचार व प्रादेशिक समस्या यावर कार्य करणाऱ्या संस्थांनी घेतली. धर्म, पंथ, व इतर बाबी यांना फाटा देऊन देशाच्या व समाजाच्या समस्या मांडण्यासाठी त्यांना सोडवण्यासाठी निधर्मी तत्वावर अशा संस्था उभ्या राहील्या. समाज कायदा व उच्चशिक्षण यामुळे एकत्र आलेल्या लोकांनी देशाच्या विविध प्रांतात अशा सभा सुरु केल्या. अशा सभांची उद्दिदीष्ट्ये मर्यादीत होती. त्यांचे सभासदही एका विशिष्ट वर्गातील होते. उच्चकुलीन जमीनदार, उच्चशिक्षित, व्यापारी, इत्यादी वर्गातील सदस्य अशा सभांना उत्तेजन देत होते. त्यामध्ये त्यांचेही काही हितसंबंध गुंतलेले होते. पण लवकरच या दृष्टीकोणामध्ये फरक पडला व विशिष्ट वर्गाच्या दृष्टीने लढणाऱ्या सभांची जागा सर्व समाजाच्या समस्यांसाठी लढणाऱ्या सभांनी घेतली. या प्रादेशिक सभांमधूनच पुढे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेचा मार्ग मोकळा झाला. प्रादेशिक सभांची सुरुवात बंगालपासून झाली. ब्रिटीशांनी प्रथम बंगालमध्ये आपल्या राजकीय सत्तेचा पाया घातला. तेथे त्यांनी आधुनिक शिक्षण सुरु केले होते. बंगालपासूनच भारताच्या आर्थिक लूटीसही प्रारंभ केला होता. त्यांनी सुरु केलेल्या जमीनदारी पद्धतीतूनच पहिल्या प्रादेशिक सभेच्या स्थापनेस चालना मिळाली.

**जमिनदारी सभा :**

लॉर्ड कॉर्नवॉलिस याच्या कायमधारा जमीन महसूल पद्धतीमुळे बंगालमधील जमीनदार वर्ग गब्बर झाला. त्यातूनच जूलै १८४८ मधे जमीनदारी सभा स्थापना झाली. जमीनदार वर्गाचे हितसंबंध जोपासण्यासाठी या संस्थेची स्थापना झाली होती. या सभेचे सभासद संविधानिक व शांततामय मार्गाचा वापर करुन त्यांच्या समस्याा सोडवण्याचा प्रयत्न करीत असत. जमीनदार वर्गाचे आर्थिक हितसंबंध सांभाळणे हे त्या सभेचे प्रमुख कार्य होते.

**बेंगाल ब्रिटीश इंडिया सोसायटी :**

१८४३ मधे बंगाल ब्रिटीश इंडिया सोसायटी ही पहिली राजकीय सभा स्थापन झाली. लोककल्याणासाठी शांततामय मार्गाने प्रश्न सोडवणे हे या संस्थेचे मुख्य कार्य होते. या सभेने फारसे कार्य केले नाही. मात्र देशामधे राजकीय भान आणण्याचा कार्यास त्यांनी हातभार लावला. लवकरच ब्रिटीश इंडिया असोसीएशन मधे या संस्थेचे विलीनीकरण झाले.

**ब्रिटीश इंडिया असोसिएशन :**

जमीनदारी सभा व बंगाल ब्रिटीश इंडिया सोसायटी या दोन संस्थांचे विलीनीकरण होऊन ब्रिटीश इंडिया असोसिएशन ही संस्था स्थापन झाली. तरी त्या सभेच्या ध्येय व उद्दीष्टांमधे जमीनदार व धनिक वर्ग यांचाच प्रभाव जाणवत होता. या सभेने ब्रिटीश संसदेला अनेक विनंती पत्रे पाठवली. त्याद्वारे भारतात कायदेमंडळ स्थापना करणे, न्यायव्यवस्थेचे कार्यकारी मंडळापासून विभक्त स्वरुप राखणे यासारख्या मागण्या त्यांनी केल्या. ब्रिटीश अधिकाऱ्यांचे पगार कमी करणे व मीठावरील कर रद्द करणे अशा अनेक बाबी करण्यासाठी त्यांनी ब्रिटीश सरकारला साकडे घातले. भारतात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शासनाने लक्ष दयावे व त्यासाठी अतिरिक्त निधी दयावा. अशी मागणीही त्यांनी केली. १८५३ च्या चार्टर कायदयानुसार असोसिएशनने मागणी केल्या प्रमाणे गर्व्हनर जनरलच्या कायदेमंडळात अतिरिक्त सहा सभासद वाढवण्यात आले. पुढील काही दिवसातच ही संस्था लयाला गेली व तिची जागा इंडियन असोसिएशन या सभेने घेतली.

**इंडियन असोसिएशन :**

ब्रिटीश इंडिया असोसिएशनचे कार्य संपुष्टात आल्यावर भारतव्यापी राजकीय सभा स्थापना करण्याचे आव्हान नवशिक्षित भारतीयांपुढे उभे राहीले.शिशिरकुमार घोष व त्यांचे सहकारी यांनी इंडिया लीग ही संस्था स्थापन केली होती. परंतू थोडयाच दिवसात तीदेखील इंडियन असोसिएशनमध्ये विलीन झाली. इंडियन असोसिएशची स्थापना कलकत्ता येथे २६ जूलै १८७६ मधे आनंदमोहन घोष व सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांनी केली. भारतव्यापी संघटना म्हणून या सभेकडे पाहिले जात होते. या सभेची ध्येय व धोरणे पुढीलप्रमाणे होती.

(१) राजकीय बाबतीत जनमत तयार करणे.

(२) हिंदु मुस्लिम ऐक्य घडवणे.

(३) सार्वजनिक चळवळीत लोकसहभाग वाढवणे.

या सभेमधे उच्चशिक्षित व व्यावसायिक सभासद होते. त्यांनीदेखील शांततामय व चर्चात्मक मार्ग स्वीकारला होता. एखादया मुद्दयावर जनमत तयार करुन त्यांच्या स्वाक्षऱ्या घेणे व तो विनंतीअर्ज ब्रिटीश सरकारकडे पाठवणे अशा तऱ्हेचा मार्ग त्यांनी अनुसरला होता. पुढील काही बाबीमध्ये त्यांनी महत्वाची भूमिका बजावली होती.

(१) मुलकी सेवा परीक्षेच्या नवीन नियमांविरुद्ध आंदोलन - मुलकी सेवा परीक्षेसाठी असलेली वयोमर्यादा २१ वरुन १९ वर आणण्यात आली होती. भारतीयांनी या परीक्षेत उत्तीर्ण होऊन प्रशासनात येऊ नये म्हणूने ब्रिटीश शासनाने जाणीवपूर्वक हे केले होते. इंडियन असोसिएशनने भारतव्यापी राष्ट्रीय आंदोलनाची हाक दिली. या आंदोलनामुळे भारतामधील जनतेमध्ये एकतेची भावना दृढ व्हावी हा मुख्य उद्देश होता. सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांनी लाहोर, अमृतसर,दिल्ली, अलाहाबाद, मुंबई व इतर शहरांचा दौरा केला व जनमत संग्रहित केले बॅनर्जी यांच्या देशव्यापी दौऱ्यामुळे भारतीयांमध्ये उत्साह संचारला. मुलकी सेवा परीक्षेसाठी असलेल्या मागण्यांचा विनंती अर्ज सर्वांच्या स्वाक्षरीसह ब्रिटीश संसदेकडे रवाना करण्यात आला.

(२) व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट १८७८ - लॉर्ड लिटन या गर्वनरने देशातील मुद्रण स्वातंत्र्यावर बंधने आणणरा मुद्रण प्रतिबंधक कायदा १८७८ मधे लागू केला. या कायदयान्वये मुद्रणस्वातंत्र्याची गळचेपी करण्यात आली होती. वृत्तपत्रे व नियतकालीके यांच्यावर पुष्कळ बंधने घालण्यात आली होती. लिटनच्या या धोरणांमुळे भारतीयांमध्ये असंतोष पसरला. जनमत प्रक्षुब्ध झाले. इंडियन असोसिएशने ब्रिटीश संसदेकडे याविरुद्ध एक अर्ज केला. पुढे लॉर्ड रिपन या गवर्नरने हा कायदा रद्द केला.

(३) इलबर्ट बिल १८८३ - लॉर्ड लिटननंतर आलेला लॉर्ड रिपन हा गवर्नर उदारमतवादी होता. त्याने मुद्रण स्वातंत्र्यावर बंदी आणणारा कायदा रद्द केला व सर्व देशात कायदया समोर समानता या तत्वासाठी अभ्यास करुन सूचना देण्यासाठी इलबर्ट यांची नेमणूक केली. व्हाईसरॉय कॉऊन्सीलचे सदस्य असलेल्या इलबर्ट यांनी न्याययंत्रणेत समानता प्रस्थापित करण्यासाठी भारतीय वंशाच्या न्यायाधीशाला युरोपियन वंशाच्या कोणत्याही व्यक्तीचा खटला चालवण्याची तरतूद केली गेली होती. भारतातील युरोपियना वंशाच्या लोकांनी याला प्रचंड विरोध केला. भारतीय वंशाच्या न्यायाधिशाकडून आपला खटला चालवणे ही कल्पनाच त्यांना अपमानकारक वाटली.अखेरिस ब्रिटीश शासनाला त्यांच्या मागणीपुढे झुकावे लागले व ही तरतूद रद्द केली गेली. इंडियन असोसिएशनने या बिलाचे जोरदास समर्थन केले. या बिलाच्या समर्थनासाठी त्यांनी जोरदार आघाडी उभारली. अशा रीतीने देशातील जनतेमधे

munotes.in

राजकीय जाणीव व जागृती निर्माण करण्यासाठी इंडियन असोसिएशनने भरपूर प्रयत्न केलेल. सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली इंडियन असोसिएशनने देशव्यापी प्रश्नांवर कार्य केले व पुढे ॲलन हयूम यांच्या कॉग्रेस स्थापनेच्या प्रयत्नांना देखील साथ दिली.

**बॉम्बे असोसिएशन - (मुंबई सभा) :**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतामध्ये बऱ्यापैकी राष्ट्रीय एकतेची जाणीव झाली होती. राजा राममोहन रॉय यांच्या सुधारणावादी दृष्टिकोणातून आत्मीय् सभा व ब्राहमो सभा स्थापन झाला होता. पुढे बंगालमधे याचा प्रभाव ईतर सभांवरही पडला. समाजसुधारणेच्या प्रेरणेतूनच पुढे राजकीय हेतूने प्रेरित सार्वजनिक सभाही स्थापन झाल्या. बंगालनंतर महाराष्ट्रात अशा संस्थांच्या उदयाला सुरुवात झाली. मुंबई हे भारताच्या राष्ट्रीय जाणीवांचे केन्द्र बनले. मुंबईमध्ये भाऊ, दाजी, नौरोजी, फर्दूंजी व मुंबई असोसिएशनचे इतर सभासद ब्रिटीशांच्या राजकीय नेतृत्वावर पूर्ण विश्वास ठेवून होते. भारतातील या नेत्यांनी शैक्षणिक सुधारणांसाठी मुंबई असोसिएशन मार्फत अनेक विनंतीअर्ज सरकारकडे पाठवले होते.

भारतातील मुलकी सेवा परिक्षा : ईस्ट इंडीया कंपनीची कायदेपद्धती व कार्यकारी मंडळ यांच्यात सुधारणांची त्यांनी मागणी केली होती. त्यांच्या विनंतीअर्जामधे शैक्षणिक सुधारणांना विशेष महत्व दिले गेले होते. दादाभाई नौरोजी व नौरोजी फर्दूंजी ब्रिटीश शासनाच्या दयाळूपणांची व सुधारणांची वाखाणणी करीत. ब्रिटीश सत्तेमुळे भारतीयांना प्रगती करण्यास संधी मिळाली असे त्यांचे मत होते. भाऊ दाजी यांच्या राजीनाम्यानंतर मुबई, असोसिएशनवर श्रीमंत व्यापारी व उदयोगपतीचे प्रस्थ वाढले. त्यांचा ब्रिटीश सरकारप्रती असलेला स्नेह हा नौरोजी फर्दूंजी व दादाभाई नौरोजी यांच्यापेक्षा दृढ होता. ते कोणत्याही परिस्थितीत शासनाला दुखावू ईच्छित नव्हते. त्यामुळे बॉम्बे असोसिएशनचे कार्य थंडावले. यामुळे १८६१ मधे नौरोजी फर्दुंजी यांनी असोसिएशनच्या सभासदत्वाचा राजीनामा दिला.

१८६७ च्या सुमारास नौरोजी फर्दूंजी यांनी पुन्हा एकदा बॉम्बे असोसिएशनचे सदस्यत्व स्विकारुरन तीचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी अनेक सभा घेऊन मुलकी परीक्षा इग्लंड व भारत या दोन्ही देशात एकाच वेळेस घेण्याचा विनंती ठराव संमत केला. तसेच या परीक्षेसाठी असलेली वयोमर्यादा वाढविण्याचीही विनंती ब्रिटीश सरकारकडे केली.

१८६९ मधे डॉ. भंडारकर, न्यायमूर्ती रानडे व इतर सहकारी यांनी असोसिएशनचे सभासदत्व स्विकारले. १८७० चे आयकर धोरण बुद्धिवादी वर्ग व व्यापारी वर्ग यांना एकत्र आणण्यासाठी कारणीभूत ठरला. दोन हजारपेक्षा जास्त व्यापारी व मुंबईतील उच्चशिक्षितांनी एक सभा आयोजित केली. या सभेमधे जमशेदजी जिजिभॉय व जगन्नाथ शंकरशेठ यांनी कोणताही कायदा पास करण्यापूर्वी जनतेचे मत जाणून घेणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिले. बुद्धिवादी वर्ग व व्यापारी यांची युती फार काळ टिकू शकली नाही. ऑक्टोबर, १८७२ मधे झालेल्या एका सभेत दोन्ही वर्ग परस्परांपासून दूर झाले. व्यापारी वर्गाने सभेचे अध्यक्ष नौरोजी

munotes.in

फर्दूंजी यांना दूर करण्याचे प्रयत्न केले. पण त्यांना यश आले नाही. अखेरीस दाभोळकर, जीजीभॉय व खोत यासारखे बुद्धिवादी वर्गाचे प्रतिनिधी असोसिएशनपासून दूर झाले.

दरम्यान असोसिएशनचे मुख्य कार्यकारी सभासद काही ना काही कारणांमुळे त्या सभेपासून दूर झाले. १८७४ मधे भाऊ दाजी यांच्या मृत्यु झाला. दादाभाई नौरोजी हे लंडन येथे कार्यरत झाले. न्यायमूर्ति रानडे पुण्याला गेले. केवळ नौरोजी फर्दूंजी व व्ही. एन. मंडलिक हेच अखेरपर्यंत कार्यरत राहीले. १८७९ च्या आसपास मुंबई सभेचे काम पूर्णपणे थंडावले . प्रत्यक्षाच मुंबई सभेने फारच थोडे काम केले होते. तरीदेखील तेव्हाच्या बुद्धिवादी वर्गाला व सार्वजनिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या लोकांना मुंबई सभेने एक व्यासपीठ उपलब्ध करुन दिले होते.

**पूणे सार्वजनिक सभा :**

एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धामधे पूणे सार्वजनिक सभा या संस्थेने सामाजिक व राजकीय क्षेत्रात महत्वाचे कार्य केले. पूणे सार्वजनिक सभेआधी पुणे असोसिएशन नामक संस्था कार्यरत होती. शासन आणि सर्वसामान्य जनता यामधील दुवा म्हणून ती कार्यरत होती. यामधे काशीनाथ परशुराम गाडगीळ, काशिनाथ गोंविद नातू व काशिनाथ बाळकृष्ण मराठे यासारखे व्यक्ती कार्यरत होत्या. १८६८ मधे असोसिएशनने पुणे महानगरपालिके मध्ये सभासद नेमण्याऐवजी त्यांची निवडणुक व्हावी असा अर्ज केला. त्यासाठी सर्वलोकांचे जागरण ही करण्यात आले. पुढे पुणे असोसिएशन ही पुणे सार्वजनिक सभेत विलीन झाली. गणेश वासुदेव जोशी यांच्या नेतृत्वाखाली २ एप्रिल १८७० मधे पुणे सार्वजनिक सभेची स्थापना झाली. राजकीय जाणिवा निर्माण करणे व राजकीय जागृती करणे याबाबत पुणे सार्वजनिक सभेने मोलाची कामगिरी केली. महाराष्ट्रातील लोकांचे प्रतिनिधित्व करुन सरकारी दरबारी लोकांची गाऱ्हाणे पोहोचवणे हे सभेचे मुख्य उद्दीष्ट होते. पुण्यातील सरदार, सावकार, जहागिरदार व सुशिक्षित लोक सभेचे सभासद होते. गणेश वासुदेव जोशी सार्वजनिक काका या नावाने प्रसिद्ध होत. त्यांनी पुणे सार्वजनिक सभेच्या अंतर्गत अनेक उपक्रम हाती घेतले होते. या सभेचे सभासद बनण्यासाठी लोकांचे संमतीपत्रक आवश्यक होते. सभेने शासनाचे वेळोवेळी जाहीर होणारे निर्णय, कायदे याबाबत लोकजागृती केली. सभेचे पहिले अध्यक्ष म्हणून औंध संस्थानाचे प्रमुख श्रीनिवास पंत प्रतिनिधी याची निवड करण्यात आली होती. गणेश वासुदेव जोशी यांनी सभेचे पहिले सचिव म्हणून काम पाहिले. हिंदुव्यतिरिक्त सभेमध्ये मुस्लीम, पारशी व ख्रिश्चन यांचेही प्रतिनिधि होते. सभेमध्ये गणेश वासुदेव जोशी, साठे व चिपळुणकर प्रभुती हिरीरीने कार्य करत. मुंबई असोसिएशनपेक्षा सार्वजनिक सभा लोकांपर्यंत अधिक प्रमाणात पोहोचली होती. राष्ट्रीय जागृतीचे साधन म्हणून सभेकडे पाहिले जात होते. सभेने स्वदेशी, राजकीय विचारप्रवाह मांडणे, आर्थिक विकासासाठी उत्तेजन देणे, आर्थिक व सामाजिक सुधारणा घडणे यासारख्या अनेक गोष्टींना उत्तेजन दिले होते. स्वदेशी चळवळीमध्ये सभेने पुढाकार घेतला होता. १८७६-७७ दरम्यान पडलेल्या दुष्काळांमध्ये सार्वजनिक सभेने दुष्काळ निवारण सहायता केन्द्रे उघडली. १८७२ मधे सभेने महाराष्ट्रातील शेतकरी वर्गाच्या समस्या जाणून घेण्यासाठी एक चौकशी समिती स्थापन केली. या समितीच्या सदस्यांनी अनेक गावांना भेटी दिल्या व त्यांच्याकडून माहिती गोळा केली. त्या माहीतीच्या आधारे शेतकरी वर्गाच्या समस्या व निराकरणाचे उपाय यावर एक पुस्तिका प्रसिद्ध करण्यात आली. भारतीय अर्थव्यवस्थेची माहीती देण्यासाठी मुंबई सभेच्या नौरोजी फर्दूंजी यांना पुणे सार्वजनिक सभेने सहाय्य केले.ब्रिटीश संसदेमध्ये भारतीयांना

प्रतिनिधित्व देण्यात यावे या आशयांच्या अर्जावर सभेने २१,७१३ लोकांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या व तो ठराव संसदेकडे पाठवण्यात आला.

सार्वजनिक सभेने सातारा, कराड,वाई,भिवंडी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, अमरावती व अकोला अशा विविध शहरात आपल्या शाखा उघडल्या होत्या. १८७१ मधे न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे सार्वजनिक सभेमधे कार्यरत झाले. त्यामुळे सभेच्या कार्यक्रमांना आणखी उत्तेजन मिळाले.

१८७८ मध्ये सभेने एक त्रैमासिक सुरु केले. त्यामधे सार्वजनिक सभेने केलेले कार्य, त्यांची कार्यक्रमपत्रिका , त्याच्या सभासदांच्या बैठका व शासनाला वेळोवेळी पाठवलेली निवेदने यांची नोंद केली गेली. जवळजवळ १८ वर्षे सभेचे मुखपत्र अव्याहतपणे सुरु होते. या त्रैमासिकामधे न्यायमूर्ति रानडे, तेलंग व गणेश जोशी यांचे लेख वेळोवेळी प्रसिद्ध होत असत. ब्रिटीश शासन सार्वजनिक सभेकडे संशयाने बघत होते. इंग्रजी वर्तमानपत्रातून सार्वजनिक सभेसारख्या संस्थांना जास्त मुभा न देता त्यांवर शासनाने अंकुश ठेवला पाहिजे अशा आशयाचा इशारा ब्रिटीश सरकारला दिला जाई. ब्रिटीश सरकार ही सभेकडे गांभीर्याने पहात होते. १८७६ मधे सभेने व्हीटोरीया राणीने स्वतःस भारताची सम्राज्ञी म्हणून घोषित केल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव मांडला. यामधे ब्रिटीश राजवटीचा भारतास झालेला फायदा व शैक्षणिक प्रगती याचा आढावा घेण्यात आला होता. यामधेच ब्रिटीश संसदेमधे भारतीयांना प्रतिनिधित्व दिले जावे, उच्च मुलकी सेवेत भारतीयांना संधी दयावी यासारख्या मागण्या केल्या गेल्या. रानडे यांच्या नेतृत्वाखाली सभेने प्रगती केली होती. लॉर्ड लिटन याने संमत केलेल्या व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट विरुद्ध सभेने लॉर्ड रिपन या नंतर आलेल्या गवर्नरला एक निवेदन दिले. अशा रितीने सार्वजनिक सभेने महाराष्ट्रातील व देशातील सामाजिक व राजकीय क्षेत्रात योगदान दिले.

**मद्रास महाजन सभा :**

मद्रासमधे ब्रिटीश इंडियन असोसिएशनची एक शाखा, मद्रास नेटीव असोसिएशन या नावाने उघडण्यात आली होती. कालांतराने या सभेचे सदस्य मद्रास महाजन सभेत सामील झाले व कार्य करु लागले. मद्रास महाजन सभा आर.नायडू , पी आनंद चार्लू व ईतर मित्रमंडळींनी १८८४ मधे स्थापन केली. या सभेनेदेखील ब्रिटीश शासनाला पुष्कळ विनंतीअर्ज व निवेदने दिली. विधिमंडळ, कायदेमंडळात सुधारणा करणे, न्यायमंडळ, कायदेमंडळ व कार्यकारी मंडळापासून विभक्त करणे, शेतकऱ्यांसाठी योजना राबवणे अशा विविध मागण्या सभेने केल्या. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेतही मद्रास महाजन सभेने मोलाची भूमिका बजावली.

१८५७ च्या उठावानंतर देशातील बुद्धिजीवी वर्गाला लोकांच्या संघटीतपणाशिवाय ब्रिटीश राज्यकर्त्यांकडे आपले प्रश्न मांडता येणार नाही याची जाणीव झाली. सुरुवातीला आपपल्या वर्गाच्या समस्या सोडवण्यासाठी स्थापना झालेल्या संघटना संपुष्टात आल्या किंवा सर्वसमावेशक अशा मोठया संघटनामधे त्यांचे विलीनीकरण झाले. इंडियन असोसिएशन , मुंबई सभा, पुणे सार्वजनिक सभा, यासारख्या संस्थांनी लोकजागृती करण्याचे महत्वाचे कार्य केले.

सामाजिक व राजकीय प्रवाहात लोकांना सामावून घेण्यासाठी त्यांच्यात जागृती निर्माण करण्याचे महत्वाचे काम या सभांनी पार पाडले.

## १.४ भारतीय राष्ट्रीय सभेची (काँग्रेस) स्थापना

हिंदुस्थानात एक सर्वव्यापी राष्ट्रसभा स्थापन करणे ही अत्यावश्यक बाब होती.उमेशचंद्र बॅनर्जी, आनंदमोहन बोस, सुरेद्रनाथ बॅनर्जी, नौरोजी फर्दुनजी,विश्वनाथ नारायण मंडलिक, काशिनाथ त्रिंबक तेलंग, फिरोजशहा मेहता, पी. रंगय्या नायडू , पी. आनंदाचार्लू, दादाभाई नौरोजी व न्यायमूर्ती रानडे या लोकांसाठी १८७७ पासून एखादी राष्ट्रीय संस्था स्थापन करावी असे वाटत होते.

### ॲलन ऑक्टोव्हिअन हयुम यांचा पुढाकार :

भारतात राष्ट्रीय सभेची म्हणजे कॅाग्रेसची स्थापना करण्यात भारतातील ब्रिटीश अधिकारी ॲलन हयुम यांचा मोठा वाटा होता. त्यांच्यासमवेत विल्यम वेडरबर्न व सर हेन्री कॅाटन यांनीही या कामी सहकार्य केले . ब्रिटीश साम्राज्य हे दिसते तेवढे स्थिर नसून इंग्रजांबद्दल भारतीय लोकांमधे रोष आहे. तीव्र असंतोष आहे याची जाणीव ॲलन हयुम यांना झाली होती. भारतात लोकांच्या असंतोषाला सनदशीर मार्गाने वाट दिल्यास तो कमी होईल व असंतोषाचा उद्रेक होणार नाही असे त्यांना वाटत होते. भारतात राष्ट्रीय सभेसारखी सर्वप्रतिनिधित्व असणारी सभा स्थापन झाली नाही तर देशात बेबंदशाही व गोंधळ माजेल. त्यामुळे ब्रिटीश व्यापाराला धोका तर होईलच पण त्याचसमवेत देशातील कायदातंत्र बिघडेल असेही त्यांना वाटत होते. ही आपत्ती केवळ शस्त्रास्त्रे व अर्थबळ यामुळे टाळता येणार नाही. त्यासाठी भारतात निर्माण होणाऱ्या राष्ट्रीय भावनेला शांततेचे व सनदशीर स्वरुप देणे ब्रिटीश साम्राज्याच्या व भारतीयांच्या हिताचे असल्याचे ते मानत.

### राष्ट्रीय सभा (काँग्रेस) स्थापनेचे कार्य :

ॲलन हयुम १८८२ मधे सेवानिवृत्त झाले. त्यांनी ब्रिटीश व्हाईसरॉय लॅार्ड डफरीन यांच्याही सल्लामसलत केली. १८८४ मधे काँग्रेस स्थापनेचा एक पहिला महत्वाचा टप्पा म्हणून त्यांनी ''इंडियन नॅशनल युनियन" या नावाची संस्था स्थापन केली.या संस्थेच्या विदयमाने पुण्यामधे १८८५ च्या डिसेंबरमधे एक राष्ट्रीय परिषद स्थापन करण्याचे निश्चित झाले. हयुम यांनी भारतीय उच्चशिक्षितांच्या नावे एक खुले पत्र लिहून राष्ट्रीय सभा स्थापन करण्याच्या कार्यात पुढे यावे असे आवाहन केले. इंडियन नॅशनल युनियनने २५ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या दरम्यान पुणे येथे एक परिषद भरविण्यात येईल. या परिषदेस देशातील सर्व प्रांतातील सुशिक्षितांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले. या परिषदेचे दोन हेतू स्पष्ट करण्यात आले होते.

देशाच्या प्रगतीच्या कार्यात कळकळीने कार्य करणाऱ्या व्यक्तींचा परस्परांशी परिचय व्हावा.

पुढील राजकीय कार्याची रुपरेखा निश्चित केली जावी.

अप्रत्यक्षपणे ही परिषद व स्थापन होणारी सभा भारतीय संसदेची पायाभरणी असेल असा विश्वास ॲलन हयुम यांना वाटत होता. मुंबई, पुणे या शहरांव्यतिरिक्त मद्रास, बंगाल, उत्तर भारत व दक्षिण भारतामधून प्रतिनिधी या परिषदेस उपस्थित राहणे अपेक्षित होते.

भारतीय सुशिक्षितांना आवाहन केल्यानंतर हयुम यांनी व्हॉईसरॉय लॉर्ड डफरनची भेट घेतली व त्याच्याशीदेखील सविस्तर चर्चा केली . मुंबईचे गवर्नर लॉर्ड रे यांनी या परिषदेचे अध्यक्षस्थान स्विकारावे असा प्रस्ताव हयुम यांनी लॉर्ड डफरीन यांच्यापुढे ठेवला. मात्र कॅाँग्रेसच्या होण्याऱ्या अधिवेशनास त्यांनी सहानुभूती व्यक्त करुन या प्रस्तावास नकार दिला. दरम्यान पुण्यात कॅालरा या रोगाची साथ पसरल्याने हे अधिवेशन मुंबईत घेण्याचे ठरले. मुंबइमधे या अधिवेशनाची तयारी करण्याचे काम बदृद्दीन तय्यबजी, काशिनाथ तेलंग, फिरोजशहा मेहता यांनी स्थापन केलेल्या, 'प्रिसिडेन्सी असोसिएशन' या संस्थेने केले.

## मुंबई येथील पहिले अधिवेशन :

२८ ते ३० डिसेंबर १८८५ मध्ये कॅाँग्रेसचे पहिले अधिवेशन मुंबई येथे संमत झाले. मुंबईतील या अधिवेशनास एकूण ७२ प्रतिनिधी उपस्थित होते. त्यापैकी मुंबईचे १८,पुण्याचे ८, कराचीचे २, सुरतचे ६,मद्रासचे ८, कलकत्त्याचे ३, तंजावरचे २ व इतर प्रांताचे सदस्य उपस्थित होते. उमेशचंद्र बॅनर्जी यांची पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. या आधिवेशनास दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनशॉ वाच्छा, बी.एम. मलबारी, गोपाळ गणेश आगरकर, एन.सी. चंदावरकर, आनंदमोहन बोस, मनमोहन घोष, सुब्रमन्यम अय्यर, लाला बैजनाथ, इत्यादी प्रभुती उपस्थित होत्या. उमेशचंद्र बॅनर्जी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात ब्रिटीश साम्राज्याशी निष्ठा व्यक्त केली. आपण राष्ट्रीय सभा स्थापना केली म्हणून ब्रिटीश साम्राज्याशी द्रोह करतो असे मानण्याचे कारण काही या शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

## पहिल्या अधिवेशनात मांडले गेलेले ध्येय व उद्दिष्टे :

ॲलन हयुम व इतर भारतीय नेत्यांनी केलेल्या भाषणातून कॅाँग्रेसची ध्येय व उद्दीष्टे यांची कल्पना येते. कॅाँग्रेसचे संस्थापक सदस्य हे मवाळ होते. त्यांना ब्रिटीशांच्या न्यायवृत्तीबद्दल व त्यांच्या शासनाबद्दल आदर होता. ब्रिटीशांनी भारतात योग्यवेळी प्रवेश केला व भारताला शिक्षण व प्रशासन या बाबतीत योग्य धडे दिले असे त्यांना वाटत होते. कॅाँग्रेसची सुरुवातीची उद्दीष्टे पुढील प्रमाणे –

देशातील अनेक पंथ, धर्म व भाषा या भेदांच्या पलीकडे जावून एक राष्ट्र या संकल्पनेच्या अनुषंगाने लोकांना जोडणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. भारतासारख्या मोठया देशात वैविध्य आढळून येणे साहजिक होते.ब्रिटीश राजकारणी भारताला केवळ भौगोलिक प्रदेश या दृष्टीने पहात होते. भारतातील लोक कधीही एक राष्ट्र म्हणून एकत्र येऊ शकत नाही अशी त्यांची भावना होती. त्याला उत्तर म्हणून देशातील सुरुवातीच्या भारतीय मुत्सदयांपुढे राष्ट्र या संकल्पनेने देशातील लोकांना जोडणे हे आव्हान होते.

देशातील जनतेच्या भावना ब्रिटीश राज्यकर्त्यांपर्यंत पोहोचवणे व त्यासाठी एक व्यासपीठ तयार करणे हे काँग्रेसचे एक उद्दीष्ट होते. जनतेच्या मागण्या विनंतीअर्ज व निवेदने यामार्फत ब्रिटीश पार्लमेंटकडे पाठवणे ही त्यांची कार्यपद्धती होती.

देशातील लोकांना ब्रिटीशांसारखी संसदीय लोकशाही हवी असल्यास त्याप्रमाणे त्यांचे राजकीय शिक्षण घेणे यासाठी काँग्रेसचे पुढारी प्रयत्न करीत. विविध माध्यमातून लोकजागृती करणे व राजकीय ध्येयसाठी त्यांच्यात ऐक्य घडवणे हे त्यांच ध्येय होते.

देशातील धार्मिक, व वांशिक भेदाभेदांना तिलांजली देणे व निधर्मी लोकशाही व्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करणे हे त्यांचे मुख्य ध्येय होते.

**पहिल्या अधिवेशनात संमत झालेले ठराव :**

काँग्रेसच्या ध्येय व धोरणानुसार पहिल्या अधिवेशनात पुढील ठराव मंजूर करण्यात आले.

राज्यकारभाराची चौकशी करण्यासाठी एक रॉयल कमिशन नेमावे व त्यात भारतीय लोकांचे प्रतिनिधित्व घ्यावे.

मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळात मोठया प्रमाणात लोकनियुक्त प्रतिनिधी घ्यावेत.या कायदेमंडळात अंदाजपत्रके मांडण्यात यावी सभासदांना राज्यकारभारांसंबंधी प्रश्न विचारण्याचा अधिकार असावा आणि येथील अधिकार वर्गाला या कायदेमंडळाच्या सल्ल्याविना आपले म्हणणे ब्रिटीश संसदेपुढे मांडता यावे यासाठी तरतूद असावी.

नोकरशाहीत हिंदी लोकांचा प्रवेश व्हावा म्हणून मुलकी परीक्षा (सिव्हील सर्व्हिस) इंग्लंडप्रमाणे भारतातही घेण्यात यावी. भारतीय उमेदवाराची वयोमर्यादा २३ पर्यंत असावी.

वायव्य प्रांत, अवध प्रांत व पंजाब प्रांतासाठी स्वतंत्र प्रांतिक कायदेमंडळ स्थापन करावे. लष्करी खर्चात कपात करण्यात यावी. ब्रह्मदेश खालसा करु नये.

munotes.in

**कॉंग्रेसच्याबाबतीत ब्रिटीशांचा दृष्टीकोण :**

प्रारंभीचे कॉंग्रेसचे पुढारी मवाळ धोरणाचे होते. ब्रिटीश राज्याशी त्यांची निष्ठा होती. त्यामुळे कॉंग्रेसच्या स्थापनेत ब्रिटीशांचा हात होता व ब्रिटीश साम्राज्य सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने त्यांनी कॉंग्रेसची स्थापना केल्याचा आरोप थोडयाच दिवसात निराधार ठरला. ॲलन हयुम यांनी कॉंग्रेस स्थापना करण्याच्या कामी पुढाकार घेतला व त्यादृष्टीने ब्रिटीश अधिकारी व व्हाईसरॉय यांच्याशी चर्चा केली तरी कॉंग्रेसच्या स्थापनेनंतर ब्रिटीशांनी कॉंग्रेसच्या सर्व हालचालींवर लक्ष ठेवले. लॉर्ड डफरीन या गवर्नरने तर हयुम व कॉंग्रेस दोघांची संभावना केली. शासकीय कर्मचाऱ्यांना कॉंग्रेसच्या कोणत्याही कार्यक्रमास उपस्थित न राहण्याबद्दल सक्त ताकीद दिली गेली. कॉंग्रेसविरुद्ध हिंदु व मुस्लिम जमातवादी संघटनांना शासनाने उत्तेजन दिले.

कॉंग्रेसचे दुसरे अधिवेशन कलकत्ता येथे भरले होते. कॉंग्रेसच्या वाढत्या प्रभावमुळे ब्रिटीश शासनाला धास्ती बसली होती. सध्याचे मवाळ नेते जरी ब्रिटीश सत्तेसोबत एकनिष्ठ असले तरी भविष्यात कॉंग्रेसची वाटचाल वेगळया दिशेने होऊ शकते हे त्यांनी ओळखले. शासनाकडून राष्ट्रीय सभेच्या वाढत्या लोकप्रियतेला आळा घालण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या.कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून चांगल्या वर्तनाबद्दल हमी म्हणून जामीन मागण्यात आले. राष्ट्रसभेच्या अधिवेशनाला हजर न रहाण्याचे फर्मान जारी करण्यात येऊ लागले.

लॉर्ड डफरीन हे जाहीरपणे कॉंग्रेसची निंदा करु लागले. कॉंग्रेसमध्ये कोणत्याही प्रकारचे राष्ट्रीय ऐक्य दिसत नाही. तिचे स्वरुप राष्ट्रव्यापी व लोकव्यापी मुळीच नाही. मूठभर उच्चशिक्षित लोकांनी स्थापना केलेली संस्था अशा शब्दात डफरीनने कॉंग्रेसवर टीका केली.

संयुक्त प्रांताचे गवर्नर लॉर्ड ऑकलंड कोल्विन यांनी हयुम यांना लिहिलेल्या पत्रात कॉंग्रेसमुळे अधिकारी व शासन यांच्या विरोधात लोकांमध्ये द्वेष पसरत असल्याचा आरोप लावला.त्यास उत्तर देताना हयुम यांनी तो आरोप पूर्णपणे नाकारला. याऊलट हा प्रचार खोटा असल्याचे प्रतिपादन केले. त्यांच्या मते खेडयातील लोकांमध्ये ब्रिटीश राज्यकारभाराबद्दल असंतोष माजला असून त्यांना दु:ख व अन्याय असहय होत आहे. कारण ब्रिटीश शासनाला खरी परिस्थिती माहीत नाही. कॉंग्रेस अशा वर्गाचे दु:ख ब्रिटीशांपर्यंत पोहोचावे या दृष्टीने कार्य करते. देशातील सुसंस्कृत व बुद्धिमान लोकांचा राष्ट्रसभेला पाठींबा असून ब्रिटीश अधिकारीच कॉंग्रेसला शह देण्यासाठी हिंदु व मुस्लीम यांच्यात भेद निर्माण करणारी निती वापरत असल्याचा स्पष्ट आरोप हयुम यांनीच केला आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) भारतीय राष्ट्रीय सभेच्या स्थापनेची पार्श्वभूमी थोडक्यात सांगा.

## १.५ सारांश

राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून भारतीयांच्या राजकारणाला एक दिशा मिळाली. देशातील विविध प्रांताचे प्रतिनिधित्व करणारी एकमेव संघटना म्हणून कॉँग्रेसने कार्य केले. ॲलन हयुम या ब्रिटीश अधिकाऱ्याने व देशातील विविध राजकीय संघटनांनी या कामी मोलाची भूमिका बजावली . सुरुवातीमधे ब्रिटीश अधिकारी राष्ट्रीय सभेच्या स्वरुपाबद्दल साशंक होते. राष्ट्रीय सभा ही लवकरच ब्रिटीशांच्या धोरणांना सनदशीर मार्गाने विरोध करु लागले. त्यामुळे ब्रिटीशांनी राष्ट्रीय सभेस असलेला विरोध अधिक प्रखर केले.

## १.६ प्रश्न

(१) १८५७ च्या उठावाची आर्थिक, सामाजिक व राजकीय कारणे स्पष्ट करा.

(२) १८५७ च्या कारणांची विस्तृत चर्चा करा.

(३) १८५७ च्या उठावांचे परिणाम स्पष्ट करा.

(४) १८५७ च्या उठाव अयशस्वी का झाला ? उठावाचे परिणाम स्पष्ट करा.

(५) बंगालमधील राजकीय संघटनांची माहीती दया.

(६) इंडियन असोसिएशनची स्थापना व कार्य यावर सविस्तर टीप लिहा.

(७) मुंबई सभेची स्थापना, विकास व कार्य या बद्दल सविस्तर माहिती दया.

(९) भारतीय राष्ट्रीय सभेच्या स्थापनेस कारणीभूत परिस्थिती व ॲलन ऑक्टोव्हीअन हयूम यांचे योगदान यावर चर्चा करा.

(१०) राष्ट्रीय सभेची ध्येये, उद्दीष्टे व पहिल्या अधिवेशनात संमत झालेले ठराव याबद्दल माहीती दया.

(११) भारतीय राष्ट्रीय सभेबाबत ब्रिटीशांचा दृष्टीकोण स्पष्ट करा.

## १.७ संदर्भसूची

(१) बिपिनचंद्र , इंडियन स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स, व्हायकिंग नवी दिल्ली १९८७

(२) आचार्य शं.द. जावडेकर, आधुनिक भारत, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७९

(३) मॉडर्न महाराष्ट्र भाग १ व २, बी. आर. सुंठंनकर पॉप्युलर प्रकाशन

(४) आचार्य शं.द. जावडेकर, आधुनिक भारत, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे १९७९

(५) आधुनिक भारत, आचार्य शं.द. जावडेकर, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७९.

(६) सोशल बॅकग्राऊंड ऑफ इंडियन नॅशनॅलिझम, ए.आर. देसाई, पाप्युलर प्रकाशन, मुंबई १९७६.

(७) अ न्यू लूक अॅट मॉर्डन इंडियन हिस्ट्री, ग्रोवर अॅण्ड ग्रोवर, एस. चांद,नवी दिल्ली, २००१.

❖❖❖❖

munotes.in

# २

# मवाळयुग

**प्रकरणाची रचना**

२.० उद्दिष्टे
२.१ प्रस्तावना
२.२ मवाळवादी कालखंड (इ.स.१८८५ ते १९०५)
२.३ मवाळांची विचारसरणी व कार्यक्रम
२.४ मवाळ काँग्रेसची कामगिरी
२.५ गोपाळ कृष्ण गोखले
२.६ सारांश
२.७ प्रश्न
२.८ संदर्भ सूची

## २.० उद्दिष्टे

**या घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला :**

१. मवाळवादी कालखंडाची सुरूवात कशी झाली हे समजते.
२. मवाळांची विचारसरणी व कार्यक्रम काय होते हे लक्षात येते.
३. मवाळवाद्यांची कामगिरी समजण्यास मदत होते.
४. भारतातील मवाळवादी नेत्यांचे कार्य समजते.
५. गोपाळ कृष्ण गोखले यांचे योगदान काय होते ते समजते.

## २.१ प्रस्तावना

एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रीय चळवळीची पार्श्वभूमी तयार झाली होती परंतु राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व करु शकेल अशी राष्ट्रीय स्वरुपाची संघटना अस्तित्वात नव्हती. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेचे श्रेय ॲलन ह्यूम या सेवानिवृत्त इंग्रज अधिकाऱ्याला द्यावे लागते. गव्हर्नर जनरल लॉर्ड डफरीन यांच्याशी चर्चा केल्यानंतर ह्यूमने सर्वांच्या विचाराने पुण्याला इ.स.१८८५ साली राष्ट्रीय सभेचे अधिवेशन घेण्याचे निश्चित केले परंतु पुण्याला कॉलऱ्याची साथ सुरु झाल्यामुळे पुण्याऐवजी मुंबईला अधिवेशन

घेण्याचे ठरविले. या अधिवेशनाचे यजमानपद 'बाँबे प्रेसिडेन्सी असोसिएशनने' स्वीकारले. २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईच्या गोकुळदास तेजपाल संस्कृत कॉलेजमध्ये अधिवेशनास सुरुवात झाली. या अधिवेशनाचे अध्यक्षपद उमेशचंद्र बॅनर्जी यांना देण्यात आले. काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात ७२ प्रतिनिधींनी भाग घेतला. दादाभाई नौरोजी, उमेशचंद्र बॅनर्जी, दिनशा वॉच्छा, पंडित मोतीलाल नेहरु, फिरोजशाह मेहता, न्या. तेलंग, लाला लजपत राय, लोकमान्य टिळक, पंडित मदन मोहन मालविय, गोपाळकृष्ण गोखले, नरेंद्रनाथ सेन, गिरजाभूषण मुखर्जी, न्या. महादेव गोविंद रानडे, डॉ. भांडारकर, गोपाळ गणेश आगरकर, रंगय्या नायडू, जी. सुब्रम्हणम अय्यर, वीर राघवाचार्य, गंगाप्रसाद वर्मा या हिंदी नेत्याशिवाय युरोपियन व्यक्तींनीही अधिवेशनात सहभाग घेतला होता.

राष्ट्रीय काँग्रेसच्या इतिहासाचे ढोबळ मानाने तीन कालखंड सांगता येतीलः

१. मवाळ गटाचा कालखंड (इ.स. १८८५ ते १९०५)
२. जहाल गटाचा कालखंड (इ.स. १९०५ ते १९२०)
३. गांधी युग (इ.स. १९२० ते १९४७)

## २.२ मवाळवादी कालखंड (इ.स.१८८५ ते १९०५)

काँग्रेसच्या प्रारंभीच्या काळात ज्या नेत्यांच्या हातात काँग्रेसची सूत्रे होती त्या नेत्याच्या विचारसणी, तत्वप्रणाली व कार्यपध्दतीवरुन त्या नेत्यांच्या गटाला मवाळ गट (नेमस्त गट) म्हणून ओळखले जाते. इ.स. १९०५ पर्यंत मवाळ गटाच्या हातात काँग्रेसच्या कार्याची सूत्रे होती त्यामुळे इ. स. १८८५ ते १९०५ हा राष्ट्रीय काँग्रेसचा पहिला कालखंड मवाळांचा कालखंड म्हणून आधुनिक भारताच्या इतिहासात ओळखला जातो. २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईमध्ये काँग्रेसचे पहिले अधिवेशन झाले. राष्ट्रीय काँग्रेसचे दुसरे अधिवेशन कलकत्ता येथे १८८६ मध्ये दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली भरले. या अधिवेशनात काँग्रेसने राजकीय कार्य करावे असे ठरले. काँग्रेसचे तिसरे अधिवेशन मद्रासला १८८७ मध्ये कायदेपंडित सर बद्रुद्दीन तय्यबजी यांच्या अध्यक्षतेखाली भरले. काँग्रेसची लोकप्रियता वाढू लागली होती. राजकीय जागृती करण्याचे काँग्रेसचे ध्येय हळूहळू फलद्रुप होऊ लागले होते. या अधिवेशनात ह्युम यांनी ब्रिटिश सरकारच्या धोरणावर टिका केली. काँग्रेसच्या या आक्रमक प्रचारामुळे ब्रिटिश राज्यकर्ते नाराज झाले. अशा तप्त चौथे अधिवेशन वातावरणातच अलाहाबाद येथे १८८८ मध्ये भरले. अध्यक्ष जार्ज युल होते. या अधिवेशनाला जागा मिळू नये म्हणून सरकारने प्रयत्न केले व सरकारी नोकरांनी अधिवेशनात भाग घेवू नये असा हुकूम सरकारने काढला. तरी देशाच्या कानाकोपऱ्यातून १२४८ प्रतिनिधी हजर राहिले होते. काँग्रेसने सरकारचा सौम्य शब्दात निषेध केला व प्रातिनिधीक लोकशाहीची मागणी

केली. अशा तऱ्हेने सरकार व काँग्रेसमधील अंतर हळूहळू वाढत गेले. पाचवे अधिवेशन १८८९ मध्ये मुंबई येथे विल्यम वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी ब्रिटिश संसदेचे एक सदस्य चार्लस ब्रॅड यांनी अधिवेशनात भाग घेऊन काँग्रेस नेत्याबरोबर चर्चा केली. कायदेमंडळाच्या सुधारणेबद्दलचा भारतीयांच्या मागण्यांचा ठराव करून १८९० साली तो ब्रिटिश संसदेत सादर केला. त्यामुळेच १८९२च्या कौन्सील कायद्याच्या प्रक्रियेस चालना मिळाली. काँग्रेसची अधिवेशने प्रत्येक वर्षी होत राहिली. १८९० चे अधिवेशन कलकत्ता आणि १८९१चे नागपूर १८९२ चे अधिवेशन लाहोरला झाले.

या सर्व अधिवेशनातुन काँग्रेसने आपल्या मागण्या पुन:पुन्हा मांडल्या. सरकारने मात्र या मागण्याकडे दुर्लक्ष केले. काँग्रेसला जनतेचा पाठिंबा दिवसेंदिवस वाढत असल्याने काँग्रेस लोकप्रिय बनत चालली होती. १९०१ चे काँग्रेसचे अधिवेशनात आयर्लंडच्या धर्तीवर हिंदुस्थानमध्ये होमरूल चळवळ सुरू करावी अशी सूचना केली होती. पण इंग्रजांच्या न्यायप्रियतेवर विश्वास असणाऱ्या नेमस्तांनी अशा प्रकारच्या चळवळीस विरोध केला. परंतु पुढे कर्झनच्या दडपशाही धोरणामुळे भारतीय तरुणाईत संतप्त वातावरण तयार झाले. त्यावेळी काँग्रेसनेही आपल्या धोरणात बदल केला व १९०५च्या वाराणशी येथे भरलेल्या अधिवेशनात नामदार गोखले यांनी अध्यक्षीय भाषणात वसाहतीचे स्वराज्य हे काँग्रेसचे ध्येय राहिल असे जाहीर केले. अशा प्रकारे १८८५ ते १९०५ या काळात काँग्रेसमधील मवाळ नेत्यांनी काँग्रेसच्या विविध अधिवेशनातून आपले विचार मांडले व इंग्रजांच्या ध्येयधोरणांवर टिका केली.

## २.३ मवाळांची विचारसरणी व कार्यक्रम

राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपासून काँग्रेसच्या कार्याची सर्व सूत्रे उदारमतवादी विचार असणाऱ्या भारतीय नेत्यांच्या हातात होती. न्या.महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, फिरोजशाह मेहता, दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, उमेशचंद्र बॅनर्जी या भारतीय नेत्यांचे विचार उदारमवादी होते. या सर्व व्यक्ती आंग्ल-विद्याविभूषित असल्यामुळे त्यांच्यावर पाश्चात्य शिक्षण व संस्कृतीचा प्रभाव पडलेला होता. ब्रिटिशांचे शासन म्हणजे एक प्रकारे भारतासाठी वरदानच आहे असे या नेत्यांचे मत होते, त्यामुळे ब्रिटिशांच्या सहकार्याशिवाय भारताचा विकास होणे कठीण आहे अशी त्यांची पक्की समजूत होती, या नेत्यांचा इंग्रजांची न्यायप्रियता व उदारता यावर गाढ विश्वास होता. इंग्रज हे न्यायप्रिय असल्यामुळे ते कधी ना कधी तरी आपल्या मागण्या मान्य करतील असा मवाळांचा विश्वास होता, त्यामुळे त्यांनी आपल्या मागण्यांसाठी सरकारला कधीच वेठीस धरले नाही – तसेच आपल्या मागण्या मंजूर करण्यासाठी मवाळांनी क्रांतिकारी मार्गाचा अवलंब न करता सनदशीर मार्गाचा अवलंब केला. अर्ज, विनंत्या आणि शिष्टमंडळांवरच त्यांचा भर होता.

munotes.in

ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेवर व प्रामाणिकपणावर उदारमतवादी नेत्यांचा विश्वास असल्यामुळे राज्यकर्त्यांकडून राजकीय हक्क व अधिकार शांततापूर्वक व सनदशीर मार्गानेच मिळविणे त्यांना योग्य वाटत होते.

पहिल्या कालखंडात (१८८५ ते १९०५) काँग्रेस नेत्याची विचारसरणी उदारमतवादी होती. राजकीय प्रश्नावर संघटित लोकमत तयार करावे, लोकांमध्ये राजकिय जागृती करावी व सनदशीर मार्गाने चळवळ करून आपले प्रश्न सोडवावेत अशी त्यांची मनोवृत्ती होती. ब्रिटिश सरकार व ब्रिटिश लोकमत आपल्या बाजूस वळवून त्यांच्याकडून काही मागण्या मान्य करून घेणे हे या नेत्यांचे ध्येय होते. १८८५ च्या अधिवेशनात राष्ट्रीय काँग्रेसने ज्या मागण्यांचे निवेदन सरकारला दिले होते त्या मागण्यांचा सतत पुनरूच्चार त्यांनी केला. इंग्रज हे न्यायप्रिय असून त्यांना अर्ज विनंत्या करीत राहिल्यास आपल्या मागण्या मान्य होतील असे नेमस्त नेत्यांना वाटत होते. काँग्रेसच्या नेमस्त नेत्यांची ब्रिटिश राजसत्तेवर निष्ठा होती. ही निष्ठा त्यांनी वेळोवेळी भरलेल्या काँग्रेस अधिवेशनातुन व्यक्त केली होती. ब्रिटिशांच्या उदारमतवादी धोरणावर, न्यायप्रियतेवर व इंग्लंडच्या लोकशाही तत्वप्रणालीवर त्यांचा विश्वास होता. ब्रिटिशांची राजवट ही भारतीय लोकांच्या हिताचीच आहे, काँग्रेसने ब्रिटिश सत्तेविरूद्ध चळवळ न करता फक्त सनदशीर मार्गाने मागण्या करीत राहून ब्रिटिशांच्या वसाहतवादी राजवटीचे राष्ट्रीय राजवटीत रूपांतर होण्याची वाट पहावी ते योग्य वेळी आपणास सत्तेत सहभागी करून घेतील असे काँग्रेस नेत्यांना वाटत होते. ब्रिटिशाबद्दल या काळात काँग्रेसच्या नेत्यांचे विचार काय होते हे नामदार गोखले यांच्या भाषणावरून स्पष्ट होते. ते म्हणतात, ''भारतात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे काम फक्त इंग्रज लोकच करू शकतात. आपले सामाजिक व आर्थिक जीवन हे ब्रिटिश शासनावरील निष्ठेवरच अवलंबून आहे. इंग्रजांचे भारतात असणे भारतातील विविध वर्गांना एक राष्ट्र म्हणून विकसित होण्यासाठी आवश्यक आहे. देशासाठी ते एक वरदान आहे.'' भारतीय लोकांमध्ये राजकीय परिपक्वता आल्यानंतर ब्रिटिश लोक क्रमाक्रमाने आपणास राजकीय हक्क देतील असे मवाळांना वाटत होते. कौन्सील सदस्यात वाढ करणे, निरनिराळे राजकिय हक्क प्राप्त करून घेणे व जनतेत राजकीय जागृती घडवून आणणे हेच या काळात काँग्रेस नेत्यांचे ध्येय होते. स्वराज्य मिळविणे हे या काळात काँग्रेसचे ध्येय नव्हते.

★ **आपली प्रगती तपासा :**

१. मवाळांची कार्यपद्धती थोडक्यात सांगा.

______________________________________________
______________________________________________
______________________________________________
______________________________________________

## २.४ मवाळ काँग्रेसची कामगिरी

राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या कालखंडातील कार्याबद्दल विविध मते व्यक्त केली जातात. 'या कालखंडातील काँग्रेस म्हणजे अर्ज विनंत्या करणारी काँग्रेस होती. इथ पासून ते या काळातील नेत्यांनी स्वीकारलेली भूमिका ही कालानुरूप होती व या काळात काँग्रेसने राजकीय जागृतीचे कार्य केले, असे मूल्यमापन करणारी विधाने केली जातात. त्या काळातील प्रभावी अशी ब्रिटिशांची सत्ता व भारतीय लोकांचे राजकीय मागासलेपण याचा विचार करताना काँग्रेसने या काळात केलेले कार्य महत्त्वपूर्ण होते. मवाळ नेत्यांची कामगिरी पुढिलप्रमाणे सांगता येईल :

### १. राजकीय, सामाजिक व आर्थिक गाऱ्हाणी मांडली :

काँग्रेसने या काळात स्वातंत्र्याचे उद्दिष्ट्च डोळ्यासमोर ठेवले नव्हते. परंतु इतर अनेक प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. त्यासाठी रॉयल कमिशन नेमण्याची मागणी केली. भारतीय जनतेवरील अन्यायी कर रद्द करावेत. आय.सी.एस. सारख्या वरिष्ठ श्रेणीतील स्पर्धा परीक्षा हिंदुस्थानात घ्याव्यात. परीक्षेसाठी उमेदवाराची वयोमर्यादा वाढवावी. स्थानिक स्वराज्य संस्थात भारतीय लोकांचे वाढते सहकार्य घ्यावे, नोकऱ्यांचे हिंदीकरण करा, वांशिक भेदभाव करणारे कायदे रद्द करावे. इ. राजकीय प्रश्नांना वाचा फोडली. हे प्रश्न सोडविण्यासाठी भारतीय तरुणास सनदशीर मार्गाने चळवळ करण्यास प्रवृत्त केले. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवा, धरणे बांधा, कालवे खोदा, सहकारी बँका काढून कमी व्याजात शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा, उद्योगधंद्यास चालना, दुष्काळग्रस्त जनतेला मदत, युवकांना नोकऱ्या, औद्योगिक व तांत्रिक शिक्षणात वाढ अशा अनेक मागण्या सरकारकडे केल्या त्यासाठी व्हाइसरायकडे विनंत्या अर्ज, मागणीपत्रके पाठवली जात असत. काँग्रेस प्रतिनिधीची मंडळे वारंवार राज्यकर्त्यांना भेटत असत. ब्रिटिश सरकारवर दबाव आणला जात असे. या सर्व प्रयत्नामुळे त्यांच्या काही मागण्या मान्यही झाल्या.

### २. परदेशातील भारतीय लोकांच्या गाऱ्हाण्याकडे लक्ष :

ब्रिटिशांचे साम्राज्य जगभर पसरलेले होते. ब्रिटिश सरकारने इतर देशातील वसाहतीमध्ये काम करण्यासाठी हिंदुस्थानातील मजूर नेले होते. त्यांची संख्या खूप मोठी होती. या भारतीय मजूरांना इंग्रज लोक तुच्छतेची वागणूक देत असत. त्यांना 'काळे' म्हणून हिणवले जाई. १८९४ मध्ये नाताळ येथील हिंदी मजुरांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला गेला तर १८९७ साली ट्रान्सवाल मधील भारतीय मजुरांना शहराबाहेर राहण्याची सक्ती केली. हा भारतीय मजुरावर एक प्रकारचा अत्याचारच होता. याविरूद्ध काँग्रेसने आवाज उठविला. १८९४च्या अधिवेशात ठराव करून त्या प्रश्नाकडे लक्ष

वेधले. पुढील अधिवेशनातुनही या प्रश्नाचा पाठपुरावा केला. दक्षिण आफ्रिका, मलाया, मॉरिशस, वेस्ट इंडिज इत्यादी देशातून भारतीय मजुरांची स्थिती हलाखीची होती, ती सुधारण्याचा प्रयत्न केला.

**३. प्रशासकीय सुधारणा :**

मवाळवादी नेत्यांनी या कालखंडात प्रशासकीय सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले. प्रशासनातील सर्व उच्च पदे इंग्रजांनाच देवू नयेत, भारतीयांनाही त्यात सहभागी करून घ्यावे, अशी भूमिका काँग्रेसने मांडली. भारतातील युरोपियन अधिकाऱ्यांना प्रचंड वेतन दिले जाते, शासनाचा तो खर्च अकारण वाढतो त्या ऐवजी त्याच पात्रतेची भारतीय माणसे कमी वेतनात काम करू शकतात. त्यामुळे वेतनावर होणारा प्रचंड खर्च वाचेल व भारतीय युवकांना नोकऱ्या मिळून त्यांच्यातील नैराश्य संपेल. सन १८५८च्या कायद्याने कंपनी सरकारचा शेवट होऊन हिंदुस्थानचा कारभार ब्रिटिश संसदेने भारतमंत्र्याकडे सोपविला होता. त्यांचा व त्यांच्या मदतीसाठी असलेले 'भारत मंडळाचा' पगार भारतीय तिजोरीतून दिला जात असे. त्यावर ३५ लाख रूपये खर्च येत होता. तो भारतमंत्र्याचा पगार ब्रिटिश संसदेने द्यावा, अशा प्रकारचा ठराव काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात पास करण्यात आला होता. पुढील काळातही त्याचा पाठपुरावा केला गेला होता. मवाळवाद्यांच्या प्रयत्नामुळे 'इंडियन कौन्सिल ॲक्ट' पारित करण्यात आला. तसेच विविध प्रकारच्या प्रशासकीय सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी त्यांनी सरकारकडे निवेदने सदर केली.

**४. न्याय विषयक व इतर सुधारणाची मागणी :**

काँग्रेसमधील राष्ट्रवाद्यांनी न्यायविषयक सुधारणांची मागणी केली. न्यायव्यवस्था व कार्यकारीव्यवस्था एकमेकांपासून स्वतंत्र ठेवल्या पाहिजेत. ज्युरीचे अधिकार कमी करू नयेत. या मागण्या ब्रिटिश सरकारकडे केल्या होत्या. तसेच सामाजिक प्राथमिक शिक्षण, तांत्रिक व उच्च शिक्षण असे लोक कल्याणकारी कार्यक्रम सरकारने हाती घ्यावेत अशी मागणी त्यांनी केली. वैद्यकिय व आरोग्यविषयक सुविधा लोकांना द्याव्यात, कार्यक्षम व जनकेंद्रित पोलीस व्यवस्था निर्माण करावी, शेतीविषयक सुधारणा कराव्यात, कालवे पाटबंधारे खोदावेत, दुष्काळग्रस्त लोकांना रोजगार द्यावेत, त्यांना मदत करावी, अशा अनेक मागण्या ब्रिटिश सरकारकडे काँग्रेसकडून सतत करण्यात आल्या.

**५. राष्ट्रीय चळवळीची पायाभरणी :**

आद्य राष्ट्रवाद्यांनी भारतीय लोकांच्यात राजकीय जागृती घडवून आणण्यात या काळात यश मिळविले. भारतीय लोक राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक ऋणानुबंधाने एकमकांशी बांधलेले आहेत आणि ब्रिटिशांची साम्राज्यशाही ही आपणा सर्वांची शत्रु आहे, अशी जाणीव भारतीय जनतेत या काळात निर्माण झाली. लोकांमध्ये एक राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली

त्यामुळे या काळात राष्ट्रवादी चळवळीच्या पायाभरणीचे मोठे कार्य झाले. त्यांनी भारतातील आर्थिक समस्येचा संबंध इंग्रजांनी चालविलेल्या आर्थिक शोषणाशी जोडला व हे केवळ पारतंत्र्यामुळे घडते असे सांगितले त्यामुळे राजकारणात हे नेते मवाळ असले तरी वस्तुस्थितीचे राजकीय व आर्थिक स्वरूप कसे विदारक आहे हे त्यांनी दाखवून दिले. लोकांतील राष्ट्रवाद वाढविण्यासाठी त्यांनी हातभार लावला. पुढील काळात जी राष्ट्रीय चळवळ उभी राहिली तिची पायाभरणी याच काळात मवाळवादी नेत्यांनी केली.

★ **आपली प्रगती तपासा :**

१. मवाळवादी काँग्रेसच्या कामगिरीची थोडक्यात चर्चा करा.

________________________________________________
________________________________________________
________________________________________________
________________________________________________

## २.५ गोपाळ कृष्ण गोखले

गोपाळ कृष्ण गोखले यांनी राजकरणात प्रवेश केल्याकेल्याच राष्ट्रसभेच्या कार्यात सहभागी झाले. २७ डिसेंबर १८८९ रोजी राष्ट्रसभेच्या न्यासपीठावरून त्यांनी आपले पहिले भाषण केले त्यावेळी त्यांनी व्हॉईसरॉयाच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सीलची सुधारणा करण्यासंबंधीच्या ठरावाला टिळकांनी उपसुचना पाठविली होती. त्याला पाठिंबा देण्यासाठी त्यांनी भाषण केले. राष्ट्रसभा भारतीय जनतेचे खरेखुरे प्रतिनिधित्व करते ही गोष्ट त्यांनी आपल्या लेखात ठासून मांडली. लोकांच्या हिताचे राष्ट्रसभा प्रतिनिधित्व करीत नाही, या आरोपालाही गोखल्यांनी प्रत्युत्तर दिले. त्याचा संबंध जोडल्यापासून देशकार्याचे हे अखिल भारतीय क्षेत्र त्यांनी शेवटपर्यंत सोडले नाही. १८८९ ते १९१५ ह्या कालावधीत गोखले काँग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनात आपले विचार सांडत असत.

मवाळवादी कालखंडातील नेमस्त नेत्यांमध्ये गोपाल कृष्ण गोखले यांचे कार्य कूप महत्वाचे आहे. त्यांच्या कार्यामुळे त्यांना मवाळांचे अग्रणी नेते म्हणून ओळखले जाते. मिठाचा कर, कायदेमंडळाच्या सुधारणा, दुष्काळ, एकाच वेळी सिव्हील सर्विसची हिंदुस्थानात व इंग्लंडमध्ये परिक्षा, जमाखर्चाचे शिल्लकी अंदाज पत्रक, याप्रमाणे त्यांच्या भाषणाचे विषय होते. १९०५ मध्ये ते बनारस येथील काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. या अधिवेशनात अध्यक्षीय भाषणात गोखल्यांनी बंगालची फाळणी, कर्झनशाही उर्मटपणा, स्वदेशीची चळवळ व आवश्यक वाटल्यास बहिष्काराच्या शस्त्राचा उपयोग यासंबंधी विवेचन केले. ब्रिटीश नौकरशाहीच्या हातात एकवटलेल्या अधिकारावर त्यांनी घणाहाती हल्ले केले. अशाप्रकारे गोखले यांनी काँग्रेसच्या अधिवेशनात सक्रिय सहभाग घेतला व मवाळ गटांचे नेतृत्व केले.

### वेल्बी कमिशनपुढील साक्ष

सार्वजनिक सभेत १८९६ साली टिळकपक्षीयांचे प्राबल्य झाल्यामुळे पुणे रानडे, गोखले वगैरे मंडळी तिच्यातून बाहेर पडली परंतू स्वस्थ न बसता आपले काम चालु ठेवण्याच्या दृष्टीने त्यांनी ४ नोव्हेंबर १८९६ रोजी डेक्कन सभेची स्थापना केली. त्याच सुमारास विलायत सरकार व हिंदुस्थान सरकार यांच्यावरील खर्चाच्या प्रश्नाचा विचार करण्याकरीता लॉर्ड वेल्बी यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने एक खास कमिशन नेमण्याचे ठरविले. या कमिशनपुढे साक्ष देण्याकरिता गोखले यांची निवड झाली आणि ही साक्ष त्यांनी डेक्कन सभेच्या वतीने तिचा खास प्रतिनिधी म्हणून दिली. सुरेंद्रनाथ बॅनर्जी, वाचला, जी. सुब्रहण्यम अय्यर व गोखले अशा चौघांच्या साक्षी झाल्या. गोपाळरावांची साक्ष फार चांगली झाली व सर्वत्र त्यांची वाहवा झाली.

### मुंबई कायदेमंडळातील कामगिरी

१८९९ साली गोखले यांची मुंबई लेजिस्लेटिव्ह कॉन्सिलमध्ये सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली. मुंबई कायदेमंडळात त्यांनी पुढील विषयांकडे लक्ष पुरविले.

१. **दुष्काळाचा कायदा** : दुष्काळग्रस्त लोकांच्या परिस्थितीची गोखले यांना चांगली माहिती असल्यामुळे आणि या कायदयाच्या अंमलबजावणीची त्यांना यथार्थ कल्पना असल्यामूळे त्यांनी संधी मिळताच या कायदयावर प्रभावीपणे टीका केली.

२. **लॅंड ॲलिनेशन बील** - ३० मे १९०१ रोजी मुंबई सरकारने कायदेमंडळात हे बील मांडले. या बीलामुळे सावकारांचे नव्हे तर शेतकऱ्यांचे अत्यंत नुकसान होईल असे गोखल्यांनी दाखवून दिले पण बिनसरकारी सभासदांच्या विरोधाला न जुमानता सरकारने ते बील मंजूर घेतले त्यावेळी तर फिरोजशाह मेहता यांच्या नेतृत्वाखाली गोखल्यासह बिनसरकारी सभासदांनी सभात्याग केला.

### इम्पिरियल लेजिस्लेटिव कौन्सिलमधील कामगिरी

१९०२ ते १९११ या काळात गोखल्यांनी प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पावर ११ आणि इतर महत्वाच्या विषयांवर ३६ भाषणे दिली. अर्थव्यवस्थेसारख्या गुंतागुंतीच्या किचकट विषयांवर बोलत असतांनाही त्यांची विषयाची पक्कड पक्की असे. सरकारी गुप्त माहिती कायदा, भारतीय विद्यापीठ कायदा, सहकारी पतपेढयांचा कायदा, राजद्रोही सभांचा कायदा, वृत्त विरोधक कायदा, चलन व शिल्लक, नोकऱ्यांचे भारतीयकरण, कला आणि कर इ. विषयांवर गोखल्यांची भाषणे, त्यांचे परिश्रम, उदार विचारसरणी आणि आपल्या राष्ट्राची प्रगती ज्या ज्या गोष्टींमुळे लाभेल या चर्चाविषयी वाटत असलेली

भाषणे व्यक्त करणारी आहेत. भारतीय अंदाजपत्रकात सुधारणा घडवून आणण्याचा दृष्टीने गोखल्यांनी बऱ्याच सुचना केल्या. सुप्रिम लेजिसलेसिव्ह कौन्सिलमध्ये अंदाजपत्रकातील प्रत्येक बाबीचा क्रमवार विचार करून ते मंजूर केले पाहीजे असे त्यांचे म्हणणे होते. भारताबाहेर ब्रिटीश सरकारने ज्या लष्करी मोहिमा केल्या त्यांचा खर्च भारतावर लादला जाऊ नये अशी त्यांची सुचना होती. तसेच मुंबई, बंगाल, वायव्य सरहद्द प्रांत, पंजाब व ब्रम्हदेश यांच्या कायदेमंडळांनी आपल्यातील लोकनियुक्त सभासदांमधून एक एक प्रतिनिधी निवडावा अशी अभिनव सुचना केली.

सामान्य जनतेचे शिक्षण हा गोखल्यांना फार जिव्हाळयाचा प्रश्न वाटे. त्यांच्या पुष्कळ भाषणात सरकारने प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी जोराने प्रयत्न केले पाहीजे असे आग्रहाने सांगितले. १९१० साली मार्च मध्ये एक ठराव मांडला त्यात त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याच्या दृष्टीने पाउल टाकावे असा ठरावाचा उद्देश होता. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारामध्ये भारत सर्व देशांत मागासलेला आहे हे गोखल्यांनी दाखवून दिले. गोखल्यांनी १९११ मध्ये सुप्रीम लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये पुन्हा अशाच स्वरूपाचे बील मांडले पण बीलाला सरकारने विरोध केला व बिल पास झाले नाही.

### सरकारी नोकऱ्यांचे भारतीयकरण

ब्रिटिश सरकारने शासकिय नोकऱ्या केवळ इंग्रजांना दिल्या होत्या या विरोधात अनेक भारतीय नेत्यांनी भारतीयांना सरकारमध्ये उच्च पदाच्या व अधिकाराच्या जागा द्याव्यात यासाठी वेळोवेळी निवेदने दिले. विश्वासाच्या आणि जबाबदारीच्या नोकऱ्या हिंदी लोकांना देण्याची आवश्यकता प्रथम दादाभाई नौरोजी यांनी प्रतिपादिली. हा प्रश्न हिंदी लोकांच्या दृष्टीने महत्वाचा होता पण हा आरोप १९०४ मध्ये लॉर्ड कर्झन यांनी आपल्या भाषणात इन्कार केला पण गोपाळरावांनी १९०५ साली त्यांनी अर्थसंकल्पावर जे भाषण केले त्याला जोडलेल्या आकडेवाडीत असे दाखवून दिले की, ५०० रू. पेक्षा अधिक पगार असलेल्या मोक्याच्या जागेवर युरोपियन आहेत. आय.सी.एस परिक्षेत फक्त गोऱ्या लोकांनाच बसण्याची परवानगी असे. इतकेच नव्हे तर प्रत्येक महत्वाची जागा ब्रिटीश अधिकाऱ्याला दिली जाई. मुंबई प्रांतात त्यावेळी १५७ पैकी फक्त ५ जागांवर भारतीय होते. याची टक्केवारी गोखल्यांनी दाखवून दिली. सरकारी नोकऱ्यांचे भारतीयकरण करण्याची त्यांनी सुचना केली.

### इंग्लंडमधील कामगिरी

गोपाळ कृष्ण गोखले यांनी भारतीयांचे प्रश्न केवळ भारतात न मांडता त्यांनी अनेक प्रश्न इंग्लंडमध्ये सुद्धा मांडले. त्यासाठी त्यांनी अनेकवेळा इंग्लंड दौरा केला. कॉंग्रेसचे प्रतिनिधी म्हणून भारताची कैफियत इंग्लिश लोकांपुढे मांडण्यासाठी १९०५ साली गोखले इंग्लडंला गेले तेव्हा ब्रिटीश पार्लमेंटची

सार्वजनिक निवडणूक जवळ आली होती. इंग्लंडमध्ये फक्त पन्नास दिवस होते पण या अल्पकाळात त्यांनी ४५ सभांमधून व्याख्याने दिली. १९०६ व १९०८ साली ते परत इंग्लंडला गेले. इंग्लंडमध्ये १९०६ मध्ये केलेल्या कामगिरीचा काँग्रेसने गौरव केला व १९०८ साली एका ठरावान्वये आपल्या प्रयत्नाचे अंशतः आलेले यश म्हणून मोर्ले-मिंटो सुधारणेचे स्वागत केले.

**भारत सेवक समाज -१९०५**

देशसेवेसाठी तरुण वर्ग निर्माण व्हावे यासाठी एक संस्था स्थापन करण्याचे गोखल्यांनी ठरविले. अभ्यासु तरूणांनी दिर्घकाल प्रशिक्षण घेउन अनुशासनबध्दरित्या राजकरणात उतरल्याखेरीज राजकीय जीवनाची पातळी उंचावणार नाही याची त्यांना खात्री होती म्हणूनच त्यांनी भारत सेवक या संस्थेच्या उद्देशपत्रकांतील भावना निधर्मीपणाच्या पायावर उभ्या आहेत. सार्वजनिक जीवन विशुध्द व पवित्र राहावे यासाठी तरुणवर्ग निर्माण करावा हा या संस्थेचा उददेश होता. संस्थेत प्रवेश देण्यापूर्वी गोखले सदस्याला अनेक प्रश्न विचारत असत. सदस्याला लोकांमध्ये देशप्रेम, बंधूभाव, दलितवर्गाचा उध्दार, शिक्षण प्रसार, स्त्रिया आणि मागासलेल्या वर्गाची निःस्वार्थ सेवा करण्याची शपथ घ्यावी लागत असे. भारत सेवक समाजाच्या सदस्यांनी अनेक राष्ट्रोपयोगी कार्य केले व देशसेवा केली.

**गोखले यांच्या कार्याचे मुल्यमापन**

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे सर्व जीवन हे एका आदर्श पुरुषाचे जीवन होते. गोखले हे त्याचे गुरु रानडे यांसारखेच थोर देशभक्त होते. प्रत्येक विषयांचा सांगोपांग अभ्यास करणे व त्यावरील स्वतःची मते निर्भयपणे व ठामपणे मांडणे हे तर गोखल्यांच्या चारित्र्याचे विशेष होते. जरी गोखले हे नेमस्त पक्षाचे होते तरी त्यांनी सरकारशी वागताना स्वाभिमानाला केव्हाही मुरड घातली नाही. पुढे येणाऱ्या प्रश्नांचा ते नेहमी सर्वांगीण अभ्यास करीत. त्यांनी जे जे काम स्वीकारले ते अत्यंत जबाबदारीच्या जाणिवेने पूर्ण केले. गोखले आपल्या सर्व जीवनात ब्रिटीश सत्तेशी लढले. ब्रिटीश अधिकाऱ्यांवर त्यांनी कडक टीका केली. या टिकेच्या मुळाशी त्यांचे राष्ट्रप्रेम होते. ब्रिटीशांचा द्वेष नव्हता.यादृष्टीने भारतीय राजकारणात गोखले हे अद्वितीय होते. त्यांची जीवनयात्रा १९ फेब्रुवारी १९१५ रोजी संपली. त्यांच्या निधनामुळे भारतीय राजकारणातील एका युगाचा अस्त झाला.

★ **आपली प्रगती तपसा :**

१. गोपाळ कृष्ण गोखलेच्या कार्याची माहिती द्या.

______________________________________________
______________________________________________
______________________________________________
______________________________________________

## २.६ सारांश

राष्ट्रीय काँग्रेसच्या मवाळवादी कालखंडातील कार्यावर अनेक विरोधकांनी टिका केलेली आढळते. 'इंग्रज धार्जिण्या लोकांचा प्रगती शून्य, दिखाऊ राष्ट्रभक्तीचा चैतन्यहीन तमाशा, स्वातंत्र्याची मागणी न करता सवलती मागणारी टोळी', अशा प्रकारची टिका केली जाते किंवा लाला लजपतराय सारखे जहाल नेते 'आपल्या तक्रारी दूर करण्यासाठी व सरकारकडून सवलती मिळविण्यासाठी वीस वर्षे धडपड केल्यावर त्यांच्या हाती भाकरी ऐवजी दगड पडले', अशा प्रकारची एकांगी टिका केली होती. टिका अल्पप्रमाणात खरी असली तरी ती पूर्णतः योग्य नाही. या काळात काँग्रेस पूर्णतः अयशस्वी ठरली असे म्हणता येणार नाही. काँग्रेसने सनदशीर मार्गाने सतत झगडून अनेक सुधारणा मिळविल्या. न्या. गोखले म्हणाले होते, 'इंग्रजी सत्तेचे उच्चाटन करण्याच्या दृष्टीने त्यांनी काही केले नसले तरी सर्व देशभर देशाभिमान, स्वातंत्र्य, प्रेम व देशासाठी त्याग करण्याची वृत्ती जनतेत निर्माण केली म्हणून काँग्रेसवर होणारी टिका अयोग्य आहे.'

काँग्रेसच्या स्थापनेपासूनची पहिली ४-५ वर्षे सोडली तर ब्रिटिश सरकारने काँग्रेसच्या विरोधातच भूमिका घेतलेली दिसते. काँग्रेस ही पुढील काळात राजकीय संघटना होऊन ती आपणास डोईजड होईल यांची जाणीव ब्रिटिशाना होऊ लागली होती म्हणून त्यांनी 'फोडा व झोडा' या नितीचा अवलंब केला व ब्रिटिश राजवटीला पाठिंबा देणाऱ्या सर सय्यद अहमद खान, बनारसचे राजे शिवप्रसाद इत्यादींना काँग्रेस विरोधात पाठिंबा दिला त्यामुळे काँग्रेसला ब्रिटिश धार्जिणे म्हणणे चूक आहे.

डॉ. पट्टाभी सीतारामय्या यांच्या मते, 'भारतीय राजकीय सुधारणा चळवळीच्या अग्रभागी असलेल्या मवाळांनी स्वीकारलेल्या धोरणाबद्दल आपण त्यांना दोष देऊ शकत नाही तेव्हाच्या परिस्थितीत मवाळांचीच धोरणे बरोबर होती कारण त्यापेक्षा जहाल पावले मवाळांनी उचलली असती तर ब्रिटिशांनी काँग्रेस संघटनेवरच बंदी घातली असती. काँग्रेस टिकवून ठेवण्याचे व तिला राष्ट्रीय पक्षाचे रूप मिळवुन देण्यात मवाळ गटाचे नेतृत्व उपयुक्त ठरले यात शंका नाही.' ख्यातनाम इतिहासकार बिपिन चंद्र म्हणतात, 'आद्य राष्ट्रवाद्यांची अपयशे कितीही असली तरी राष्ट्रीय चळवळीच्या वाढीला योग्य असा भक्कम

पाया त्यांनी घातला आणि आधुनिक भारताचे निर्माते म्हणून मवाळ गटाचे स्थान फार वरचे आहे.'

## २.७ प्रश्न

(१) मवाळांची विचारसरणी व कार्यक्रम स्पष्ट करा.
(२) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील मवाळवादयांच्या कामगिरीचे मूल्यमापन करा.
(३) भारतीय राष्ट्रीय चळवळीतील गोपाळ कृष्ण गोखले यांच्या भुमिकेचे वर्णन करा.

## २.८ संदर्भ सूची

(१) बिपीन चंद्र व इतर, भारतीय स्वातंत्र्य लढा
(२) बिपीन चंद्र, अमलेशत्रिपाठी, बरुण डे: स्वातंत्र्याचा लढा
(३) ग्रोव्हर आणि बेल्हेकर: आधुनिक भारताचा इतिहास
(४) सुमन वैद्य व शांता कोठेकर:
 १) आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०)
 २) आधुनिक भारताचा इतिहास (१९२०-१९४७)
(५) सुमित सरकार: आधुनिक भारत
(६) डॉ. जयसिंगराव पवार: आधुनिक हिंदुस्तानचा इतिहास
(७) धनंजय आचार्य: आधुनिक भारत (१७५०-१९५०)

♦ ♦ ♦ ♦ ♦

munotes.in

**३**

# जहालयुग

**प्रकरणाची रचना**

३.० उद्दिष्ट्ये
३.१ प्रस्तावना
३.२ जहालवादाचा उदय
३.३ जहालवादी तत्वज्ञान
३.४ लोकमान्य टिळकांचे कार्य
३.५ टिळकांचा चतु:सुत्री कार्यक्रम
३.६ सुरत अधिवेशन व क्राँग्रेसमध्ये फुट -१९०७
३.७ होमरुल चळवळ
३.८ सारांश
३.९ प्रश्न
३.१० संदर्भ सूची

## ३.० उद्दिष्टे

या घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला :

१. जहालवादाचा उदय कशाप्रकारे झाला हे समजते.
२. जहालवादी तत्वज्ञान काय होते हे लक्षात येते.
३. लोकमान्य टिळकांचे कार्य समजण्यास मदत होते.
४. जहालवादी कालखंडातील टिळकांचीचतु:सुत्री काय होती हे समजते.
५. होमरुल चळवळीचे कार्य काय होते हे लक्षात येते.

## ३.१ प्रस्तावना

राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतरच्या ७-८ वर्षात काँग्रेसचे कार्य संथपणे व ठराविक चाकोरीतून चालू होते. सरकारकडून काँग्रेसच्या मागण्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची जाणीव काँग्रेस सदस्यांना होऊ लागली. परिणामी तरुणांच्या मनात काँग्रेसच्या नेतृत्वाविषयी अविश्वासाची भावना वाढत गेली. काँग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनात काँग्रेसच्या ध्येय धोरणांवर टिका वाढू लागली. इ.स. १८८५ ते १९०५ या काळात राष्ट्रीय सभेने अनेकवेळा सरकारपुढे आपल्या मागण्या मांडल्या, अनेक अर्ज विनंत्या केल्या पण सरकारने

त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले. त्यामुळे हिंदी जनतेचा ब्रिटीशांच्या उदारमतवादावरील विश्वास नाहीसा झाला. मवाळवाद्यांनी ब्रिटिशांकडे वसाहतीच्या स्वराज्याची मागणी केली होती तर जहाल राष्ट्रवाद्यांनी संपूर्ण स्वराज्य हे आपले अंतिम ध्येय ठरविले होते त्यामुळे राष्ट्रीय चळवळीने एका टप्प्यातून दुसऱ्या टप्प्यात प्रवेश केला.

## ३.२ जहालवादाचा उदय

काँग्रेसमध्ये जहालवादी विचारसरणीची सुरुवात खरे तर १८९१ पासूनच झाली होती. १८९१ च्या नागपूर अधिवेशनात मुरलीधर नावाच्या पंजाबच्या प्रतिधिनीने इंग्रजांवर व इंग्रजनिष्ठ भारतीय नेत्यांवर टिका केली गेली. त्यांच्या मते, ''इंग्लंडमध्ये उत्पादीत होणाऱ्या चैनीच्या वस्तू विकत घेउन सधन सुशिक्षित भारतीय लोक आपल्या लक्षावधी देशबाधवांचे रक्त शोषण करीत आहेत''. हिंडमन या इंग्लंडच्या प्रसिध्द समाजवादी नेत्यानेही दादाभाईंना लिहिलेल्या एका पत्रात लिहिले की, आपल्या समोरील प्रश्नांचा गंभीरपणे विचार करण्याऐवजी हिंदी लोक राणीच्या अभिनंदनाचे मूर्खपणाचे ठराव पास करीत असल्याचे पाहिले की मला त्यांच्याबददल तिरस्कार वाटातो.' तसेच कॉग्रेस संघटना ही राष्ट्रकार्याचे प्रभावी माध्यम बनवायची असेल तर ती मुठभर आंग्लशिक्षित उच्चमध्यम वर्गीयांपुरती मर्यादित ठेवून चालणार नाही तर सर्वसामान्य जनतेला यात सहभागी करुन घेऊन ती खऱ्या अर्थाने राष्ट्रीय संघटना बनवली पाहिजे, असे बहुसंख्य तरुणांना वाटू लागले. बाळ गंगाधर टिळक, बिपीनचंद्र पाल, लाला लजपतराय, अरविंद घोष यांची काँग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनात काँग्रेसच्या ध्येयधोरणांवर टिका वाढू लागली. भारतात जहालवाद वाढण्यात अनेक कारणे महत्वाची ठरली. ती पुढीलप्रमाणे दिलेली आहेत :

### १. सरकारची उदासीनता

इ.स. १८८५ ते १९०५ या काळात राष्ट्रीय सभेने अनेकवेळा सरकारपुढे आपल्या मागण्या मांडल्या. अनेक अर्ज विनंत्या केल्या पण सरकारने त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले. त्यामुळे हिंदी जनतेच्या ब्रिटीशांच्या उदारमतवादावरील विश्वास नाहीसा झाला. गव्हर्नर जनरल लॉड एल्गीनने, ''हिंदुस्थान हा शस्त्रबळाने जिंकला आहे आणि बळानेच तो ताब्यात ठेवला जाईल.'' असे म्हटल्याने अनेकांना धक्का बसला व ब्रिटीशांची भारताबददल कोणती कल्पना आहे याचे प्रत्यंतर आले. ब्रिटीश सरकारच्या उदासीन धोरणाला आपले मवाळ धोरण कारणीभूत आहे, ही भावना प्रबळ बनत गेली. त्यामुळेच काँग्रेसमधील

तरुण वर्गाने जहालवादी तत्वज्ञान स्विकारून ब्रिटिशांशी लढण्याचे ठरविले व त्यातूनच जहालवादाचा उदय झाला.

### २. मवाळ नेत्यांबद्दल अविश्वास

काँग्रेसला सुरुवातीच्या काळात भारतीयांच्या मागण्या सरकारकडून मान्य करुन घेण्यास अपयश आल्याने त्यांच्याबददल जनतेमध्ये अविश्वास वाढू लागला. मवाळ नेते राष्ट्रीय संघटनेचे नेतृत्व समर्थपणे करु शकत नाही असे जहाल तरुणांना वाटल्यामुळे त्यांनी उघडउघड या नेत्यांवर टिका सुरु केली. मवाळ नेते केवळ खुर्चीत बसून सावधगिरीचे राजकारण करणारे बुध्दीजीवी वर्गाचे प्रतिनिधी आहेत, ते राष्ट्राचे प्रतिनिधी नाहीत, काँग्रेस क्षयग्रस्त बनली आहे, राष्ट्रकार्यासाठी कोणत्याही त्यागाची किंवा कपट सोसण्याची त्यांची तयारी नाही अशी मवाळवादयांवरील टिका वाढत गेल्याने त्यांच्याबददल अविश्वासाचे वातावरण वाढले व त्यातून जहाल विचारसरणीला पाठिंबा दिला जाऊ लागला.

### ३. आर्थिक शोषण

इंग्रजाचे साम्राज्य हे आर्थिक साम्राज्यातून निर्माण झालेले होते. इंग्रज राज्यकर्ते व्यापाराच्या व कराच्या रुपाने करोडो रुपयांची संपत्ती मायदेशी दरवर्षी नेत असल्याने दादाभाई नौरोजी, न्या. रानडे इ. नेत्यांनी अभ्यासपूर्णरित्या आकडेवारी देउन सिध्द केले होते. इंग्रजाच्या खुल्या व्यापाराच्या धोरणामुळे भारतीय उदयोगधंदे आणि शेती यांची दुरावस्था वाढली. इंग्रजांचे आर्थिक शोषण संपविण्यासाठी जहाल तत्वज्ञानाचा पुरस्कार केला पाहिजे असे अनेक तरुणांना वाटत होते.

### ४. नैसर्गिक आपत्तीत सरकारचे धोरण

इ.स. १८९६-९७ साली पडलेला दुष्काळ हा आतापर्यंत इंग्रज राजवटीत पडलेल्या दुष्काळात सर्वात भयंकर दुष्काळ होता. या दुष्काळात दोन कोटी भारतीय मृत्यूमुखी पडले तरीही सरकारला काहीही दुःख वाटले नाही. उलट भारत सरकार व्हिक्टोरिया राणीच्या जयंती उत्सवात मग्न होते. ज्या संपत्तीची जनतेच्या मदतीसाठी आवश्यकता होती, ती संपत्ती अनावश्यक उत्सवात उधळली जात होती त्यामुळे जनतेच्या मनात ब्रिटीश सरकारबददल द्वेषाची भावना वाढली. इ.स. १८९९-१९०० या काळात पसरलेल्या प्लेगच्या साथीत इंग्रज सरकारने अन्यायाचा कळस गाठला. लोकांवर अनेक अत्याचार करण्यात आले. परिणामी जनता प्रक्षुब्ध बनली. सरकारच्या अशाप्रकारच्या धोरणामुळे जहालवादाचा उदय झाला व तरुण मनांची मने याकडे आकर्षित झाली.

## ५. आंतरराष्ट्रीय घटनांचा प्रभाव

ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली असलेल्या दक्षिण आफ्रिकेत भारतीयांना दिल्या जाणाऱ्या मानहानीकारक वागणुकीमुळे भारतीय सुशिक्षितांची मने प्रक्षुब्ध बनली. इंग्रजांच्या हुकूमशाही वृत्तीला जगात अनेक ठिकाणी विरोध होत होता व त्याचा अप्रत्यक्ष परिणाम भारतीयांवर घडत होता. चीनमधील बॉक्सर उठाव, इजिप्तमधील राष्ट्रवादी चळवळ, आयर्लंडमधील ब्रिटीशविरोधी चळवळ या सर्व घटनांची माहिती भारतात प्रसारीत होत होती. भारतीय तरुणांवर सर्वात मोठा प्रभाव जपानचा पडला होता. राष्ट्रवादी जपानने १९०४-०५ मध्ये बलाढय रशियाचा पराभव केल्यामुळे युरोपियन श्रेष्ठत्वाला मोठा धक्का बसला. जपान हे सर्व अशियाई राष्ट्रांना प्रेरणादायी ठरले. भारतीय समाजातही आपण इंग्रजांचा पराभव करु शकतो अशी भावना पसरली. अशाप्रकारच्या आंतरराष्ट्रीय घटनांच्या प्रभावातून जहालवादी तत्वज्ञानाचा उदय भारतात झाला.

## ६. लॉर्ड कर्झनची दडपशाही

इ.स. १८९९ ते १९०५ या काळात व्हॉईसरॉय म्हणून आलेल्या लॉर्ड कर्झनने आपल्या काळात अत्याचाराचा परमोच्च बिंदू गाठला. त्यांच्या दडपशाहीमुळे भारतीयातील जहाल विचारसरणीला खतपाणी मिळाले. स्थानिक स्वराज्य संस्थांवर नियंत्रण आणण्यासाठी १८९९ मध्ये कलकत्ता कार्पोरेशन ॲक्ट पास करुन कार्पोरेशन मधून हिंदी लोकप्रतिनिधींची हकालपटटी केली. उच्च शिक्षण प्रसाराला विरोध करण्यासाठी १९०४ मध्ये 'इंडियन युनिव्हर्सिटीज ॲक्ट' पास करुन विदयापीठांची स्वायतत्ता नष्ट केली. त्याने नेहमी भारतीय संस्कृतीला हिणवले. त्यांच्या या धोरणामुळे भारतात असंतोष पसरला. लार्ड कर्झनने हिंदु व मुस्लीमांमध्ये मतभेद निर्माण होण्यासाठी धार्मिक आधारावर बंगालच्या फाळणीचे कारस्थान आखले होते. बंगालची भौगोलिक व भावनिक एकता नष्ट होण्यासाठी व राष्ट्रवाद्यांचे खच्चीकरण करण्यासाठी ही योजना होती. लार्ड कर्झनने बंगालची फाळणी जाहीर करताच काँग्रेसच्या नेत्यांना धक्का बसला. १९०५ मध्ये बंगालची फाळणी केल्यामुळे असंतोषात दुप्पट वाढ झाली. बंगालच्या फाळणीविरुध्द आंदोलन करणाऱ्या प्रजेवर त्यांनी प्रचंड अत्याचार केले. लॉर्ड कर्झनच्या ध्येयधोरणांवर अनेक तरुण टिका करु लागले व यातूनच भारतात जहालवादाचा उदय झाला.

या सर्व गोष्टीवरून सिद्ध झाले की, मवाळांच्या मार्गाचा ब्रिटिशांवर काहीही परिणाम होत नव्हता. नेमस्तांनी आजपर्यंत चालवलेली सनदशीर मार्गाने चालवलेली चळवळ फोल ठरली होती यामुळे भारतीयांतील असंतोष पराकोटीला पोहचला. जहालवादाचा उदय होण्यास मदत झाली. अशा या वातावरणात भारतीयांच्या मनात जहाल राष्ट्रवाद वाढविण्याचे कार्य महाराष्ट्रात लो. टिळक व त्यांचे अनुयायी, बंगालमध्ये अरविंद घोष, बिपीनचंद्र पाल व त्यांचे सहकारी, पंजाबमध्ये लाला लजपतराय यांनी केले.

★ **आपली प्रगती तपासा.**

१. जहालवादाच्या काँग्रेसच्या उदयाची कारणे थोडक्यात सांगा.

---

## ३.३ जहालवादी तत्वज्ञान

जहाल काँग्रेसच्या उदयामुळे भारतीय राजकारणाला नवीन वळण मिळाले. ब्रिटिश सत्ता केवळ अर्ज, विनंत्या करून वठणीवर येणार नाही तर त्यासाठी तीव्र आंदोलनाची गरज आहे अशी विचारधारा पुढे आली. काँग्रेसमध्ये जहाल विचारसरणीच्या लोकांची वाढ झाली. देशात प्रथमच ब्रिटिश सत्तेविरूद्ध क्रांतीकारी आंदोलने सुरू झाली. बंगालच्या फाळणीनंतर जहाल राष्ट्रवाद्यास जोर आला. जहालवादी तत्वज्ञान पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. कोणतीही साम्राज्यवादी सत्ता कल्याणकारी असू शकत नाही. शोषण करणे हेच त्यांचे मुख्य सुत्र असते. हे शोषण राजकीय सुधारणांनी नव्हे तर स्वराज्य मिळाल्यानेच थांबेल.

२. राजकिय चळवळ परिणामकारक बनविण्यासाठी त्यात संपूर्ण भारतीय समाज सामिल होणे आवश्यक आहे. मुठभर लोकांचे नव्हे तर केवळ जनतेच्याच चळवळीचे दडपण सरकारवर येऊ शकेल.

३. लोकजागृती व संघटनासाठी इंग्रजी भाषेऐवजी मातृभाषेचा वापर केला पाहिजे. राष्ट्रीयत्वाची भावना अर्जविणारा अभ्यासक्रम शैक्षणिक संस्थातून आखला पाहिजे. त्यासाठी भारतीयांनी स्वतःच्या शिक्षणसंस्था सुरु कराव्यात.

४. भारतीय समाजाला राजकिय चळवळीत सहभागी करून घेण्यासाठी त्यांच्यात प्रखर राष्ट्राभिमान जागृत करणे गरजेचे आहे. त्यासाठी भारताच्या इतिहासातील महान व्यक्ति जनतेची स्फुर्ती स्थाने बनवली पाहिजेत.

५. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी जनतेने समाजसुधारणांना महत्व न देता राजकीय चळवळीला महत्व देणे देशाच्या दृष्टीने अगत्याचे आहे.

६. आर्थिक स्वावलंबनाचा अवलंब करणे महत्वाचे आहे.

७. भारतीयांची राजकिय अस्मिता जागृत करुन त्यांना अन्यायाच्या प्रतिकारासाठी सज्ज करायला पाहिजे.

८. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी सक्रियपणे कायदेशीर व सनदशीर मार्गाचा अवलंब करावा तसेच राष्ट्रकार्यासाठी कष्ट सोसण्याची तयारी ठेवावी.

वरील जहालवादी तत्वज्ञान भारतात लवकरच लोकप्रिय झाले. जहालवादी नेत्यांनी या तत्वज्ञानाचा प्रथम अवलंब केल्याने त्यांना पाठिंबा वाढू लागला. त्या काळात लाल-बाल-पाल हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत प्रसिद्ध झाले होते. त्यांनी 'स्वराज्य-स्वदेशी-बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण' हा चळवळीचा मार्ग जनतेसमोर ठेवला. यालाच जहालांची 'चतु:सूत्री' असे म्हणतात. जहाल पुढारी लोकमान्य टिळक, बिपिनचंद्र पाल व लाला लजपतराय यांनी संपूर्ण देशाचा दौरा काढून आपल्या विचारसरणीचा प्रसार केला.

★ **आपली प्रगती तपासा :**

१. जहालवादी तत्वज्ञान थोडक्यात सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ३.४ लोकमान्य टिळकांचे कार्य

जहाल राष्ट्रवादाचा प्रचार सातत्याने करुन राष्ट्रीय चळवळीत नवे चैतन्य निर्माण करु पाहणाऱ्या पुढाऱ्यांमध्ये अग्रस्थानी महाराष्ट्रातील बाळ गंगाधर टिळक यांचे नाव सर्वमान्य आहे. टिळकांप्रमाणेच बंगालमध्ये जहालवादाचा प्रसार करण्याचे कार्य

अरविंद घोष, बिपीनचंद्र पाल तर पंजाबमध्ये लाला लजपतराय यांनी केले. जहालवादी कालखंडात लाल-बाल-पाल ही त्रिमूर्ती बरीच गाजली. २८ डिसेंबर १८८५ रोजी भरलेल्या कॉंग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात टिळकही उपस्थित होते. पण काही वर्षानंतर मवाळवादी नेत्यांच्या अपयशावर त्यांनी कडक टिका करण्यास सुरुवात केली. कॉंग्रेसमध्येच मवाळांना विरोध करणारा जहाल गट सक्रिय बनला व या गटाचे नेतृत्व टिळकांनी केले. वांशिक, भाषिक, धार्मिक एकता आणि समान राजकीय आकांक्षा यातूनच राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होत असते यावर टिळकांचा विश्वास असल्याने त्यांनी भारतीयांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रीयत्वाच्या या चळवळीत टिळकांनी जनतेला परदेशी मालावर बहिष्कार टाकणे, स्वदेशीचा पुरस्कार करणे, राष्ट्रीय शिक्षण देणे व स्वराज्य प्राप्त करणे ही चतु:सुत्री दिली. आपल्या या चळवळीत त्यांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग न स्वीकारता वरील चार शस्त्रानिशी लढा दिला. इंग्रजांविरुध्द संपूर्ण भारतात असंतोष निर्माण करण्यात ते यशस्वी झाले म्हणून व्हॅलेन्टाईन चिरोल यांनी त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' असे म्हटले.

### गणेशोत्सव व शिवजयंती उत्सव

राष्ट्रकार्याला निस्वार्थपणे वाहून घेणाऱ्या तरुणांची पिढी तयार करण्यासाठी तसेच भारतीय लोकांत राष्ट्रवाद निर्माण करुन एकी निर्माण करण्याच्या हेतूने टिळकांनी १८९३ साली सार्वजनिक गणेशोत्सव आणि १८९५ साली शिवजयंती उत्सवास सुरुवात केली. सार्वजनिक उत्सव म्हणजे लोकजागृतीचे, लोकसंघटनेचे माध्यमच होते. समारंभ जरी धार्मिक असला तरी या उत्सवाचा हेतू राजकिय होता. लोकांमध्ये राष्ट्राची संस्कृती व धर्माचा अभिमान निर्माण करण्यासाठी धार्मिकदृष्टया एकत्र आणण्याची गरज वाटत होती म्हणूनच वरील दोन उत्सवाला त्यांनी सुरुवात केली. लोकजागृती केल्यामुळेच राजकिय चळवळींना व्यापक अधिष्ठान प्राप्त झाले.

### लोकजागृतीची चळवळ

टिळकांना मवाळांची कार्यपद्धती मान्य नव्हती. राष्ट्रीय कॉंग्रेस ही मुठभर बुद्धीवादी लोकांपूरती मर्यादित न ठेवता ती सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी कॉंग्रेसने लोकजागृतीच्या चळवळीचा प्रारंभ करावा असे टिळकांचे मत होते. ॲलन हयुम यांनीही कॉंग्रेसने लोकजागृतीची चळवळ हाती घ्यावी अशी सूचना केली होती. टिळकांनी 'मराठा' व 'केसरी' या वृत्तपत्रातून लोकजागृती करण्याचा प्रयत्न केला. लोकजागृतीचे प्रभावी माध्यम म्हणून वृत्तपत्रांचा टिळकांनी पूरेपूर फायदा घेतला. गणेशोत्सव व शिवजयंती उत्सवाची सुरुवात टिळकांनी लोकजागृती करण्यासाठीच केली होती. लोकजागृतीच्या

चळवळीमधून अनेक तरुण मंडळी टिळकांना मिळाली. त्यांनी सुरु केलेल्या चळवळींमुळे काँग्रेस ही खऱ्या अर्थाने राष्ट्रीय सभा बनली. राष्ट्रकार्यासाठी तरुण पिढी बलवान असावी यासाठी व्यायाम शाळा सुरु केल्या. केसरी व मराठा या वृत्तपत्रातून सरकारविरुध्द प्रचंड मोठे जनमत तयार केले. टिळकांच्या मते एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करणे ही गोष्ट नीतीशी विसंगत आहे म्हणूनच भारतीयांनी ब्रिटिशांविरुद्ध चळवळ करणे हेच त्यांचे नैतिक कर्तव्य आहे.

**वंगभंग आंदोलन**

१९०५ साली भारतीय राजकिय जीवनात एका नविन पर्वाचा आरंभ झाला. त्या काळातील भारताचे व्हॉइसरॉय लॉर्ड कर्झन यांनी 'फोडा व राज्य करा' या नीतीचा अवलंब करुन हिंदू-मुस्लीमांत भेदभाव निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु केला. त्यासाठी कर्झनने लोकांच्या भावनेची कदर न करता बंगालची फाळणी १९०५ साली केली. फाळणीमुळे संतप्त झालेल्या बंगाली तरुणांनी ब्रिटनविरुद्ध दंड थोपटले. वंगभंग आंदोलनाची सुरुवात केली व हिंदु-मुस्लिम ऐक्य घडवून आणले.

## ३.५ टिळकांचा चतुःसुत्री कार्यक्रम

लोकमान्य टिळकांची चळवळ त्यांनी आखलेल्या चतुःसुत्री कार्यक्रमावर आधारित होती. टिळकांचा चतुःसूत्री कार्यक्रम पुढीलप्रमाणे सांगता येईल :

**१. स्वराज्य**

स्वराज्याचा अर्थ स्वातंत्र्य असला तरी टिळकांना स्वराज्याचा एवढाच अर्थ कधीच अभिप्रेत नव्हता. स्वराज्य ही कल्पना पुरातन असून ती ऋगवेद व प्राचीन शास्त्रे यावर आधारित असल्याचे त्यांचे मत होते. स्वराज्याची कल्पना धर्माला अनुसरुन असून, स्वराज्याशिवाय एकही व्यक्ती स्वतःच्या धर्माप्रमाणे आचरण करु शकत नाही असे टिळकांचे मत होते. स्वराज्याशिवाय कोणताच विकास होणार नसल्यामुळे आमच्या देशाची सत्ता आमच्या हातात असली पाहिजे त्याशिवाय देशाचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास होत नाही असे टिळकांनी म्हटले होते. २ मे १९०८ रोजी टिळकांनी अकोल्याला शिवजयंती उत्सवात 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' ही घोषणा केली. चतुःसूत्री कार्यक्रमात स्वराज्याचा उल्लेख टिळकांनी केला असला तरी त्यांच्यासाठी स्वराज्य हे साधन नव्हते तर ते जनतेचे ध्येय होते.

## २. बहिष्कार

बहिष्कार म्हणजे परकिय वस्तूचा त्याग करणे, टिळकांनी म्हटले,'परकिय सत्ता व संघर्ष सुरु असताना परकिय वस्तुंवर बहिष्कार टाकणे सोयीचे असते. मी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करीत नाही. आमच्यामध्ये तशी ताकदही नाही. परंतु बहिष्कार या अस्त्रामुळे आम्ही सरकारला वठणीवर आणू शकतो आणि देशाची खालावत चाललेली आर्थिक परिस्थती सावरु शकतो.' बहिष्कार या अस्त्रामुळे स्वदेशीचा विकासही होतो आणि परकिय राजवटीची अर्थव्यवहारही कोलमडण्यास मदत होते. टिळकांची बहिष्काराची कल्पना विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकण्यापूरतीच मर्यादित नव्हती. ब्रिटिशांना शासन करण्यासाठी मदत न करणे, न्यायालयासंबंधी त्यांना सहकार्य न करणे, करवसूलीसाठी मदत न करणे, सरकारी शाळांवर बहिष्कार टाकणे तसेच सरकारला कोणत्याच बाबतीत सहकार्य न करण्याच्या धोरणाचा पुरस्कार केला. टिळकांच्या बहिष्कार चळवळीचे ब्रिटनवर फार मोठे दुष्परिणाम झाले. ब्रिटनचा व्यापार बंद पडला. गोदामात मालाचे ढिग पडून राहिले. मोठमोठया व्यापारी कंपन्या बंद पडल्या. या बहिष्कारामूळे सशस्त्र क्रांतीपेक्षाही अधिक फटका ब्रिटनला बसला.

## ३. स्वदेशी

बहिष्काराच्या आंदोलनाला पुरक अशी स्वदेशी चळवळ होती. स्वदेशी व बहिष्कार ही दोन सूत्रे एकमेकांना पूरक अशी होती. परकिय मालावर बहिष्कार टाकून आणि परदेशी कापडाच्या होळया करुन केवळ भागणार नव्हते. तर बहिष्काराच्या चळवळीस स्वदेशी चळवळ जोडली पाहिजे असे टिळकांचे मत होते. स्वदेशी चळवळीचा हेतू देशी व्यापार उदयोगधंदे यांचा विकास करणे आहे कारण ब्रिटिशांनी देशातील सर्व उदयोगधंदे नष्ट केले होते. ते आर्थिकदृष्टया डबघाईला आले होते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने स्वदेशी वस्तूचा वापर केला पाहिजे असा संदेश टिळकांनी दिला.

## ४. राष्ट्रीय शिक्षण

टिळकांनी स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीबरोबरच राष्ट्रीय शिक्षणाचा हिरीरीने पुरस्कार केला. त्या काळातील शाळा व महाविदयालये सरकारच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे अशा शाळा व कॉलेजमधून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संस्कृती, धर्म, इतिहास, राजकिय स्थिती आणि देशप्रेम याबद्दलचे शिक्षण देण्यात येत नव्हते. त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना आपल्या देशाचाच इतिहास माहित नसल्यामुळे त्यांच्यात देशप्रेम कसे निर्माण होणार? असा प्रश्न टिळकांना होता. राष्ट्रीय शिक्षण एखादया शैक्षणिक संस्थेचे अनुदान बंद करत असे

त्यामुळे कोणत्याही शाळा राष्ट्रीय शिक्षण देण्यास तयार नव्हत्या अशावेळी सरकारने अनुदान बंद केले तरी हरकत नाही, परंतू राष्ट्रीय शिक्षण देण्याचे आवाहन टिळकांनी अनेक शिक्षणसंस्थांना केले. टिळकांनी राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या अनेक संस्थांना आर्थिक मदतही केली.

★ **आपली प्रगती तपासा :**

१. टिळकांचा चतु:सुत्री कार्यक्रम थोडक्यात सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ३.६ सुरत अधिवेशन व काँग्रेसमध्ये फुट १९०७

१९०६ च्या कलकत्ता अधिवेशनात दादाभाई नौरोजीच्या अध्यक्षतेखाली स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हे चार महत्वाचे ठराव पास झाल्यामुळे जहालवादी गटाचा प्रभाव वाढला होता परंतु मवाळ गटातील फिरोजशाह मेहतासारख्या नेत्यांना राष्ट्रसभा कोणत्याही परिस्थितीत जहाल मार्गावर जाऊ देण्याची इच्छा नव्हती आणि जहाल गटातील बिपीनचंद्र पाल, अरविंद घोष यांना मवाळांशी तडजोड मान्य नव्हती. १९०७ चे अधिवेशन नागपूरला भरणार होते. त्याप्रमाणे तेथे तयारी सुरु होती पण तेथे जहालवादयांचा मोठा प्रभाव असल्याने मवाळांनी अचानक नागपूरऐवजी सुरतला अधिवेशन घेण्याची घोषणा केली. राष्ट्रसभेचे अधिवेशन सुरत येथे २६ डिसेंबर १९०७ रोजी सुरु झाले. स्वागताध्यक्ष मदनमोहन मालवीय यांचे भाषण झाल्यावर डॉ. रासबिहारी घोष यांचे नाव अध्यक्ष पदासाठी सुचविले गेले. यावेळी जहालांनी या नावाला विरोध म्हणून मोठा गोंधळ माजवला त्यामुळे सभा स्थगित करावी लागली. त्यामुळे जहालवादी गट अस्वस्थ होता. सभेच्या दुसऱ्या दिवशी टिळकांनी अध्यक्ष निवडीबाबत दोन शब्द बोलण्याची परवानगी चिठठी पाठवून स्वागताध्यक्षांकडे मागितली पण त्याकडे दुर्लक्ष केले गेले. शेवटी टिळकांनी व्यासपीठावर चढूनही निवड नियमानुसार झाली नसल्याचे घोषित केले. त्यामुळे गोंधळ वाढला. या दिवशीही अधिवेशन तहकूब करावे लागले. टिळकांनी सामोपचाराने संघर्ष मिटवण्याचा प्रयत्न केला पण मवाळवादी जिद्दीला पेटलेले होते. त्यांनी स्वतंत्र बैठक घेऊन जहालवादयांना काँग्रेसमधून हाकलून देण्याचा निर्णय घेतला. अशाप्रकारे सुरत अधिवेशनवात जहाल व मवाळ गटातील मतभेद पराकोटीला पोहचून कॉग्रेस दुभंगली. जहाल गट काँग्रेसबाहेर फेकला गेला. राष्ट्रीय ऐक्यावर हा मोठा आघात होता. सुरत फुटीमुळे मात्र

मवाळवादी नेत्यांची लोकप्रियता घटली व जहालवादी गट अधिकच प्रभावी बनू लागला.

सुरतेच्या अधिवेशनात काँग्रेसमध्ये फूट पडली याचा फायदा सरकारने घेण्याचे ठरविले. सरकारने जहालांची चळवळ दडपण्यासाठी दमननीतीचा अवलंब केला. एकापाठोपाठ अनेक जहाल नेत्यांना अटक करण्याचे सत्र सरकारने सुरु केले. टिळकांना अटक करण्यासाठी सरकार संधीची वाट पहात होते. तशी संधी सरकारला लवकरच मिळाली. खुदीराम बोस या बंगालच्या क्रांतीकाराने मुझफ्फरपूर या ठिकाणी एका इंग्रज न्यायाधिशावर बाँम्ब टाकला. तो बाँम्ब चुकीच्या मोटार गाडीवर पडल्याने त्यामध्ये दोन इंग्रज स्त्रिया ठार झाल्या. या बाँम्बस्फोटामुळे सरकारचे धाबे दणाणले. या बॉम्बस्फोट प्रकरणी टिळकांनी केसरीमध्ये पाच जहाल अग्रलेख लिहिले. या अग्रलेखाबद्दल २४ जून १९०८ साली राजद्रोहाच्या आरोपाखाली सरकारने टिळकांना सहा वर्षाची शिक्षा सुनावली व तुरुंगात पाठविले. टिळकांची सुटका १७ मे १९१४ रोजी झाली. त्यावेळी राष्ट्रीय चळवळ थंडावली होती. टिळकांसारख्या लोकनेत्याचा प्रवेश काँग्रेसमध्ये झाल्याशिवाय राष्ट्रीय आंदोलनाला धार येणार नाही याची जाणीव श्रीमती ॲनी बेझंट यांना झाली. १९१५ साली टिळकांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि ते काँग्रेसचे नेते बनले.

**लखनौ करार - १९१६**

राजकिय क्षेत्रातील टिळकांची महत्वाची कामगिरी म्हणजे काँग्रेस व मुसलमान यांच्यात झालेला लखनौ करार होय. ब्रिटिशांचे मुसलमान विषयक बदलते धोरण, बंगालची रद्द केलेली फाळणी, मुस्लिम लीगच्या नेतृत्वात झालेला बदल आणि तुर्कस्थानाला दुर्बल बनविण्याचा रशिया व ब्रिटनचा प्रयत्न या घटनांमुळे मुस्लिम लीगचे नेते अस्वस्थ झाले होते. याशिवाय टिळकांनी नुकताच काँग्रेसमध्ये आपल्या अनुयायांसह प्रवेश केला होता. टिळकांनीही राष्ट्रीय ऐक्य वाढवून राष्ट्रीय चळवळीस गती दयावयाची होती. यासाठी काँग्रेस व लीग यांची अधिवेशने लखनौ या ठिकाणी होवून या दोन संघटनांत तडजोड होवून एक करार करण्यात आला. तसेच काँग्रेसमधील जहाल गट व मवाळ गट सुद्धा लखनौ येथे एकत्र आले यांस लखनौ करार असे संबोधिले जाते. हिंदु-मुस्लिम ऐक्य व जहाल-मवाळ ऐक्य लखनौ येथे झाले म्हणून लखनौ करारांस अनन्यसाधारण महत्व आहे.

munotes.in

लखनौ कराराने काँग्रेस व लीग या संघटना समान राजकिय उद्दिष्ठांसाठी लढू लागल्या.

## ३.७ होमरुल चळवळ

लो. टिळकांच्या जीवनातील होमरुल चळवळ ही शेवटची राष्ट्रव्यापी चळवळ होती. ब्रिटिशांच्या अटकेतून सुटका झाल्यानंतर टिळकांना राष्ट्रीय चळवळ थंडावल्याचे दिसले. त्याचवेळी त्यांनी स्वराज्याची मागणी करुन राष्ट्रीय आंदोलन सुरु करण्याचे ठरविले त्यासाठी महाराष्ट्रात टिळकांनी व मद्रासमध्ये डॉ. बेझंट यांनी होमरुल लीगची स्थापना केली. ब्रिटीश साम्राज्याअंतर्गत स्वशासीत राज्याचा दर्जा सनदशीर मार्गाने मिळवणे, त्यासाठी जनजागृती व संघटन करणे हे उददेश घोषित केले. मराठा व केसरी या वृत्तपत्रातून होमरुलचा जोरदार प्रचार केला. टिळकांच्या प्रभावामुळे होमरुल चळवळ महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहोचली. एक वर्षात होमरुल संघटनेत १४ हजार सदस्य सामील झाले. लोकप्रियतेत होमरुल लीगने काँग्रेसलाही मागे टाकले व राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व टिळक व बेझंट यांच्याकडे आले.

**टिळक यांच्या कार्याचे मूल्यमापन**

भारताच्या राष्ट्रीय चळवळीतील जहाल विचारसरणीचे प्रमुख नेते म्हणून लोकमान्य टिळकांनी फार मोठे कार्य केले. त्यांनी लढावू राष्ट्रवादाच्या नवीन पर्वाचा प्रारंभ केला. आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी तसेच लोकजागृती करण्यासाठी टिळकांनी 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांचा माध्यम म्हणून वापर केला. राष्ट्रकार्याला निःस्वार्थीपणे वाहून घेणाऱ्या तरुणांची पिढी तयार व्हावी, तसेच राष्ट्रीय ऐक्य घडून यावे यासाठी त्यांनी शिवजयंती आणि गणेशोत्सव सुरु केले. १९०५ ते १९२० या काळात काँग्रेसवर त्यांच्या नेतृत्वांचा प्रभाव होता. त्यांनी अनेक क्रांतीकारकांना गुप्तपणे मदत केली होती. त्यांनी भारतीय जनतेत ब्रिटिश सत्तेविरूद्ध प्रचंड असंतोष निर्माण केला म्हणनूच लंडन टाइम्सचे प्रतिनिधी व्हेलेंटाइन चिरोल यांनी त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' असे म्हटले आहे. टिळकांनी भारतीय जनतेत ब्रिटिशसत्तेबद्दल प्रचंड असंतोष निर्माण करून भारतीय स्वातंत्र्य चळवळ आक्रमक बनवली. आयुष्याच्या शेवच्या क्षणापर्यंत त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे कार्य केले. अशा महान नेत्यांचा मृत्यू १ ऑगस्ट १९२० रोजी झाला. त्यांच्या मृत्युमूळे भारतीय राष्ट्रीय चळवळीतील टिळक पर्वाचा अंत होवून गांधीजींच्या नवयुगाला सुरुवात झाली.

★ **आपली प्रगती तपासा:**

१. बाळ गंगाधर टिळक यांचे योगदान थोडक्यात सांगा.

## ३.८ सारांश

काँग्रेसवर प्रारंभीच्या काळात नेमस्त नेत्यांचा प्रभाव होता. त्यांना ब्रिटिश सरकार विरूद्ध संघर्षाची भूमिका न घेता अर्ज विनंत्या करून आपल्या काही मागण्या मान्य करून घेतल्या. कालातंराने काँग्रेसमधील लो. टिळक, लाला लजपतराय व बिपीनचंद्र पाल या नेत्यांना काँग्रेसचे ब्रिटिशाबद्दलचे मवाळ धोरण पसंत नव्हते. त्यांनी आपल्या राजकीय मागण्या मान्य करून घेण्यासाठी ब्रिटिशाविरोधी संघर्षाची भूमिका घेतली. त्यातूनच मवाळ व जहाल नेत्यातील मतभेद वाढतच गेले व १९०५ नंतर काँग्रेसवर जहाल नेत्यांचे वर्चस्व निर्माण झाले. १९०५ ते १९२० या कालखंडात जहाल काँग्रेसच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य चळवळ आक्रमक बनली. लो. टिळकांनी ब्रिटिशांकडे 'वसाहतीच्या स्वराज्याची' मागणी केली. स्वदेशी व बहिष्कार चळवळ सुरू केली. ब्रिटिशांच्या विरोधात खऱ्या अर्थाने या काळात स्वातंत्र्य आंदोलन तीव्र झाले. जहालवाद्याच्या चळवळीमुळे भारतीय राष्ट्रवाद्यामध्ये नवी आत्मविश्वासाची भावना निर्माण झाली. जनतेमध्ये ब्रिटिशाबद्दल असणारी भयाची भावना कमी झाली. लोकांचा राष्ट्रीय चळवळीतील सहभाग वाढला. ब्रिटिशांशी तीव्र संघर्ष केल्याशिवाय ते भारत देश सोडून जाणार नाहीत म्हणून ब्रिटिशांशी सहकार्याऐवजी सरकारच्या अन्यायपूर्ण धोरणाला प्रतिकार करण्याचे धोरण अवलंबिण्यात आले. भारतीय समाजातील वाढत्या असंतोषाला कृतिशील बनविण्याचे कार्य जहाल गटाने केले. म्हणूनच भारतीय राष्ट्रीय चळवळीतील जहालवादी कालखंड महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

## ३.९ प्रश्न

(१) जहालवादी काँग्रेसच्या उदयाची कारण मिमांसा द्या.

(२) जहालवादी तत्त्वज्ञानावर सविस्तर टिप लिहा.

(३) जहालवादी काँग्रेसच्या कार्याचे मुल्यमापन करा.

(४) बाळ गंगाधर टिळक यांचे जहालवादी कालखंडातील योगदान स्पष्ट करा.

## ३.१० संदर्भ सूची

(१) बिपीन चंद्र व इतर, भारतीय स्वातंत्र्य लढा
(२) बिपीन चंद्र, अमलेश त्रिपाठी, बरुण डेः स्वातंत्र्याचा लढा
(३) ग्रोव्हर आणि बेल्हेकरः आधुनिक भारताचा इतिहास
(४) सुमन वैद्य व शांता कोठेकरः
    १) आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०)
    २) आधुनिक भारताचा इतिहास (१९२०-१९४७)
(५) सुमित सरकारः आधुनिक भारत
(६) डॉ. जयसिंगराव पवारः आधुनिक हिंदुस्तानचा इतिहास
(७) धनंजय आचार्यः आधुनिक भारत (१७५०-१९५०)

♦ ♦ ♦ ♦ ♦

munotes.in

४

# क्रांतीकारी राष्ट्रवाद

**प्रकरणाची रचना**

४.० उद्दिष्टे
४.१ प्रस्तावना
४.२ क्रांतिकारी चळवळीचा उगम व उद्दिष्ट्ये
४.३ महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळ
४.४ पंजाबमधील क्रांतिकारक
४.५ बंगालमधील क्रांतिकारक
४.६ परदेशात कार्यरत असलेल्या क्रांतिकारी चळवळी
४.७ सारांश
४.८ प्रश्न
४.९ संदर्भ सूची

## ४.० उद्दिष्टे

(१) क्रांतीकारी राष्ट्रवादाचा उगम व त्याची व्याप्ती याची जाणीव होणे.

(२) महाराष्ट्र, पंजाब व बंगाल प्रांतातील राष्ट्रवादी क्रांतिकारकाबद्दल माहिती मिळणे.

(३) युरोप व अमेरिका या देशातील भारतीय क्रांतिकारकांच्या कार्याबद्दल माहिती मिळणे.

(४) क्रांतीकारी चळवळीची व्याप्ती व त्यांचे योगदान याची जाणीव होणे.

## ४.१ प्रस्तावना

भारतातील परकीय राजसत्ता उलथून टाकण्यासाठी व भारतीय सत्तेला मुक्त करण्यासाठी भारतात अनेक क्रांतिवीर हिरीरीने पुढे आले. आपल्या सर्वस्वाचा त्याग करून देशासाठी हौतात्म पत्करले. भारतीय तरूणांनी सुरू केलेली क्रांतिकारी चळवळ हे भारतीय इतिहासातील एक

महत्वाची घटना आहे. इ.स.१८५७चा सशस्त्र उठाव मोडून काढल्यानंतर बलाढ्य लष्करी ब्रिटीश सत्तेला त्यांच्याच भाषेत उत्तर दिले पाहीजे याची जाणीव भारतीयांना झाली. क्रांतीकारकांना सनदशीर मार्गाने ब्रिटीश आपणास स्वातंत्र्य देतील यावर बिलकूल विश्वास नव्हता. भारतात राज्यकारभार करणाऱ्या इंग्रजांना देश सोडून जाण्यास भाग पाडणे हे त्यांचे प्रमुख उद्दीष्ट होते. मवाळ व जहाल यांच्या गटाकडून ब्रिटीश सरकारवर कोणताही परिणाम होत नाही. याउलट सरकार बंगालची फाळणी, विद्यापीठ कायदा, प्लेगच्या साथीमधील अत्याचार या गोष्टी अमानुष्यपणे पुढे रेटत होते. त्यामुळे १९व्या शतकातील अखेरीच्या कालखंडापासूनच धडाडीचे तरूण सशस्त्र प्रतिकाराच्या मार्गाकडे वळले होते. त्यांच्या मानाने ब्रिटीशांची ताकत अफाट होती व याची क्रांतिकारकांना पूर्ण जाणीव होती पण आपल्या कृत्यामुळे जनमत जागृत होईल व आपल्या आत्मबलिदानामुळे लोकांतील निष्क्रीयता दूर होऊन ते क्रियाशील बनतील अशी त्यांना आशा होती. जुलमी राज्यकर्त्यांची हत्या ही हिंसा नसून मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी तिच्या पुत्रांनी केलेले एक पवित्र कर्तव्य या दृष्टीने क्रांतिकारी कृत्यांकडे पहात.

## ४.२ क्रांतिकारी चळवळीचा उगम व उद्दीष्टचे

भारताची मोठ्या प्रमाणावर होणारी आर्थिक व राजकीय पिळवणूक व भारतातील जनतेवर लादलेली गुलामगिरी यामुळे क्रांतिकारक पेटून उठले. भारत देश हा ब्रिटीशांनी शस्त्रबळाने जिंकलेला असून तो त्यानेच दडपला जाईल अशी दर्पोक्ती ब्रिटीश अधिकारी करीत असत. त्यातच सामान्य जनतेची उपासमार, दुष्काळाचे भीषण चटके व रोगराई यामुळे जनता त्रस्त होती. याच कालावधीत वृत्तपत्रांतून ब्रिटीशांच्या अन्याय धोरणांवर प्रकाश टाकणारे लेख येत असत. बंगालमध्ये बंकिमचंद्र चटर्जी, महाराष्ट्रात विष्णुशास्त्री चिपळूणकर व खाडीलकर इत्यादींचे साहित्या त्यांचे प्रेरणास्थान बनले. याशिवाय आयर्लंड, इटालियन व अमेरिकन क्रांतिकारकांचे चारित्र त्यांना स्फूर्तिदायक वाटत असत. क्रांतिकारी तरुण हे कट्टर राष्ट्रवादी होते. गुलामगिरीपेक्षा मरण पत्करणे हे त्यांचे ब्रीद होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी दहशतवादी कृत्ये अगत्याचे आहे व अशी कृत्ये करणे ही मातृभूमीच्या स्वातत्र्यासाठी असल्याने ते पाप नसून पवित्र कर्तव्य असल्याची त्यांची भावना होती. समापातातील अस्थिरता व गोंधळ यांची जाणीव ब्रिटीश राज्यकर्त्यांना व्हावी असाही त्यांचा प्रयत्न होता. राजकीय स्वातंत्र्य व सामाजिक समता या तत्वाने मार्क्सवादी क्रांतिकारक भारावलेले होते. त्यांचे जीवन म्हणजे साक्षात मृत्युशी अविरत झुंज होती. गुप्त संघटना उभारणे, त्यांना प्रशिक्षण देणे, शस्त्रास्त्रे तयार करणे, परदेशातून शस्त्रे आयात करणे, आपल्या क्रांतिकारी लिखाणाने जनतेत ब्रिटीश शासनाविरुद्ध असंतोष तयार करणे, ब्रिटीश ऑफिसच्या तिजोऱ्या लुटणे. रेल्वेवर हल्ला करणे ही त्यांची कार्यपद्धती होती.

जुलमी अधिकाऱ्यांना ठार मारणे हे कार्यदेखील क्रांतिकारक करत असत. आपल्या कृत्यांच्या परिणामांची त्यांना पूर्ण जाणीव होती. असे असूनही मातृभूमिसाठी सर्वस्वाचा त्याग करणे हेच त्यांचे ब्रीद होते. ब्रिटीशांकडून पकडले गेल्यावर हसतमुखाने त्यांनी मृत्यूला कवटाळले. कोणत्याही प्रकारची भिती अथवा तमा न बाळगता ते फासावर गेले. सच्चे राष्ट्रवादी क्रांतिकारी अखेरपर्यंत ब्रिटीशांना शरण न जाता अथवा हालअपेष्टांना सामोरे गेले. आपल्या मातृभूमीसाठी जीवन समर्पण करण्यासाठी पुन्हा एकदा याच देशात जन्म घेण्याची मनिषा बाळगता त्यांनी जीवनाचा त्याग केला.

भारतातील क्रांतीकारकांच्या चळवळीस १९व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच सुरुवात झाली होती मात्र १९०५ नंतर त्यांची व्यापकता वाढली.

## ४.३ महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळ

भारतामध्ये क्रांतीकारी चळवळीचे लोण १८५७च्या बंडानंतर मोठ्या प्रमाणात पसरले. भारतात बिहार व झारखंड येथील बिरसा मुंडा या महान आदिवासी समुहाच्या क्रांतिकारकांने क्रांतीची सुरुवात केली. १८९४मध्ये त्यांनी  सर्व आदिवासी बंधुना एकत्र घेऊन या लढ्याची सुरुवात केली. महाराष्ट्रातही रामोशी, भिल्ल यांनी आपल्या अस्तित्वाचे लढे-ब्रिटीशांविरोधात दिले. उमाजी नाईक या क्रांतीवीराने रामोशी बेरड समाजाला  सोबत घेऊन क्रांतिस सुरुवात केली. पुढे काही दिवसातच वासुदेव बळवंत फडके यांनी बंडाचा झेंडा उभारला.

### ४.३.१ वासुदेव बळवंत फडके यांचे बंड (१८४५-१८८३)

वासुदेव बळवंत फडके हे ब्रिटीश सैन्यात नोकरी करत होते. त्यांची आई मृत्यूशय्येवर पडल्यावरदेखील शासनाने त्यांना आईची भेट घेण्यासाठी रजा नाकारली. याचा त्यांच्या मनावर मोठा परिणाम झाला व त्यांनी ब्रिटीशांची नोकरी सोडून दिली. दरम्यान पश्चिम महाराष्ट्रात १८७६च्या सुमारास मोठा दुष्काळ पडला होता. या दुष्काळावर शासनाने हवी तशी उपाययोजना केली नाही. यावेळेस ब्रिटीश शासनाविरोधात लोकांमधे असंतोषाचे वातावरण तयार झाले होते. रामोशी मंडळींमध्ये निर्माण झालेला प्रखर ब्रिटीशविरोधही त्यांना जाणवला. शूर रामोशी मंडळींना सोबत घेऊन त्यांनी सावकार व श्रीमंत यांच्या घरावर दरोडे घातले व त्यातून मिळालेल्या संपत्तीमधून शस्त्रास्त्र विकत घेतली. सशस्त्र दलाची स्थापना करुन संदेशवहनाच्या तारा तोडणे, तुरुंग फोडून कैदयांना मुक्त करणे व ब्रिटीशविरोधी लढ्यात त्यांना समाविष्ट करणे अशी योजना त्यांनी आखली.

ब्रिटीश शासनाविरोधात जनतेतही असंतोष माजला होता. तशातच पश्चिम महाराष्ट्रात धनिकांवर दरोडे टाकून फडके दुष्काळग्रस्तांना धान्य व

पैसा याचे वाटप करु लागले. या पार्श्वभूमीवर ब्रिटीश सरकारने त्यांची धास्ती घेतली व वासुदेव बळवंत फडके यांना पकडण्यास सहाय्य करणाऱ्यांसह रोख बक्षिस दिले जाईल असे जाहीर केले. तरी देखील त्यांचा ठावठिकाणा लागला नाही. अखेरीस २०जुलै १८७९ रोजी गाणगापूर येथील एका मंदिरात तापाने ग्रस्त अवस्थेत डॅनिअल या इंग्रज अधिकाऱ्याने त्यांना पकडले. कोर्टाने त्यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. तुरुंगात त्यांचा आत्यंतिक छळ झाला. अखेरीस फेब्रुवारी १८८३ साली त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या बंडाने इंग्रजांना त्रस्त केले होते. लोकांना संघटित करुन त्यांनी इंग्रजांपुढे जबरदस्त आव्हान उभे केले होते. अथक प्रयत्नाने ब्रिटीशांनी त्यांचा उठाव दडपून टाकला होता.

### ४.३.२ विनायक दामोदर सावरकर (१८८३-१९६६)

स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी भारतीय स्वातंत्र्यालढ्यात मोलाची कामगिरी बजावली. त्यांचा जन्म २८मे १८८३ मधे नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावी झाला. चाफेकर बंधूंच्या बलिदानापासून प्रेरित होऊन त्यांनी १८९९मधे नाशिक येथे मित्रमेळावा संघटना स्थापना केली. सशस्त्र क्रांती हे त्यांचे प्रमुख उद्दीष्ट्य होते. इटालीतील क्रांतीकारी जोसेफ मॅझिनी हे त्यांचे प्रेरणास्थान होते. सशस्त्र क्रांतिशिवाय भारताला स्वातंत्र्य मिळाणार नाही यावर त्यांचा ठाम विश्वास होता. १९०४मध्ये त्यांनी अभिनव भारत ही क्रांतिकारी संघटना स्थापन केली. महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. पुढे १९०६मधे पुढील शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले तेव्हा त्यांचे बंधू गणेश सावरकर यांनी अभिनव भारत संघटनेचे कार्य सुरू ठेवले. महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर अभिनव भारत संघटनेच्या शाखा स्थापन केल्या. तरुणांना क्रांतीकार्यात समाविष्ट करुन क्रांतीला चालना देणे हे अभिनव भारत संघटनेचे प्रमूख उद्दिष्ट बनले.

सावरकर देखील इंग्लंडमध्ये राहून क्रांतीकार्याला मदत करीत असत. अभिनव भारततर्फे पांडुरंग महादेव बापट यांना बॉम्ब प्रशिक्षणासाठी पॅरिस येथे पाठवण्यात आले. तेथे बापटांनी हेमचंद्र दास व मिर्झा अब्बास या भारतीय क्रांतिकारकांसोबत राहून बॉम्ब तयार करण्याच्या पद्धतीची माहीती देणारे एक पत्रक इंग्रजीत अनुवादीत करुन घेतले व त्याच्या प्रती भारतामध्ये क्रांतिकारकांना देण्याची व्यवस्था केली. सावरकरांचे बंधू गेणेश सावरकर यांना स्वातंत्र्यप्रेमी कविता प्रसिद्ध केल्याबद्दल ब्रिटीश सरकारने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. या प्रकारामागे नाशिकचा कलेक्टर जॅक्सन व विल्यम कर्झन बायली हा देखील होता. याचा सूड म्हणून अनंत लक्ष्मण कान्हेरे याने जॅक्सनला ठार केले. मदनलाल धिंग्रा याने जुलै १९०२मध्ये कर्झन वायली याला गोळी घालून ठार केले.

इंडिया हाऊस हे भारतीय क्रांतिकारकांचे महत्वाचे केन्द्र होते. इंडिया हाऊसमध्ये गुप्तपणे बंदुका चालवणे व बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात येत होते. अनंत कान्हेरे व मदनलाल धिंग्रा हे इंडिया हाऊसचे सदस्य होते. सोबत अभिनव भारताच्या काही सदस्यांना देखील शिक्षा झाल्या. सावरकरांना इंग्रजांनी इंग्लडमध्येच कैद केले व त्यांच्यावर जॅक्सनच्या खुनाचा आरोप ठेवण्यात आला. त्यांच्यावर खटला चालवण्यासाठी त्यांना बोटीत परत पाठवण्यात आले. फ्रांसजवळ असलेल्या मार्सेलिस बंदरात पोहचून सावरकरांनी समुद्रात उडी मारून सुटकेचा धाडसी प्रयत्न केला. मात्र ब्रिटीशांनी त्यांना पुन्हा पकडले व नाशिकला त्यांच्यावर खटला चालवला. त्यांना १९११मधे ५०वर्षाची सजा ठोठावण्यात आली. व त्यांची रवानगी अंदमानच्या तुरुंगात करण्यात आली. १९२८येथे त्यांची रवानगी रत्नागिरीच्या तुरुंगात करण्यात आली. पुढे १९३७ मधे त्याची सुटका करण्यात आली. त्यानंतर त्यांनी ब्रिटीश सत्तेविरुद्धच्या संघर्षाला पूर्णविराम दिला व हिंदु महासभा या संघटनेचे अध्यक्षपद स्वीकारले.

### ४.३.३ चाफेकर बंधू :

लोकमान्य टिळक यांच्या केसरी व मराठा या वृत्तपत्रातून लोकजागृती होत होती. सरकारच्या दडपशाहीने लोक संतप्त झाले होते. यात प्लेगने देशात थैमान घातले होते. प्लेगग्रस्तांना सरकारने दंडेलशाही वापरून आणखी त्रस्त केले. यामुळे रँड यांच्यावर चाफेकर बंधूनी पुण्यात गोळ्या झाडल्या व त्याला ठार केले यानंतर ब्रिटीशांनी प्रचंड प्रमाणात दडपशाही सुरु केली. रँडच्या खुनाप्रकरणी टिळकांना देखील दीड वर्षाची शिक्षा देण्यात आली चाफेकर बंधूना याप्रकरणी फाशीची शिक्षा देण्यात आली.

**सेनापती पांडुरंग बापट :** सेनापती बापट हे सशस्त्र क्रांतीच्या तत्वाने भारावले होते. क्रांतिकारी चळवळीसाठी शस्त्र असणे महत्वाचे आहे. बॉम्बमुळे विध्वंस अधिक मोठ्या प्रमाणात होतो म्हणून त्यांनी बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण घेण्याचे ठरवले. बापटांनी भारतात बॉम्ब तयार करण्याचे ठरवले. १९०८ नंतर बापट महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली कार्यरत झाले.

### ४.३.४ शिवराम हरी राजगुरु :

पुणे जिल्ह्यात खेड येथे शिवराम हरी राजगुरु यांचा जन्म १९०८मध्ये झाला. अमरावती येथील हनुमान व्यायामशाळेत त्यांनी मर्दानी खेळाचे शिक्षण घेतले. त्यांनी सेवादलातही काम केले. हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लीकन पार्टीशी संबंध आल्यावर ते चंद्रशेखर आझाद, सरदार भगतसिंग व सुखदेव यांचे सहकारी बनले. सायमन कमिशनचा निषेध करण्यासाठी लाहोर येथे लाला लजपतराय यांनी मोर्चा काढला होता. यामध्ये झालेल्या लाठीहल्यात लाला लजपतराय मृत्युमुखी पडले. याचा बदला म्हणून राजगुरु व भगतसिंग यांनी सँडर्सची गोळी घालून हत्या केली. राजगुरु यांनाही पकडण्यात आले. २३मार्च १९३१ रोजी लाहोरच्या तुरुंगात त्यांना फाशी देण्यात आली.

## ४.४ पंजाबमधील क्रांतिकारक

प्रथम महायुद्ध संपताच इंग्रजांनी १९१९मधे रौलेट कायदा पास करुन व्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालण्याचा प्रयत्न केला. १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसरला जालियनवाला बागेत २०हजार लोक रौलेट कायद्याचा निषेध करण्यासाठी एकत्र जमले असता जनरल डायर या इंग्रज अधिकाऱ्याने जमावावर गोळ्यांच्या फैरी झाडल्या. त्यात शेकडो माणसे मारली गेली. जनरल डायरच्या हुकुमानुसार पजाबमधे दडपशाहीचे पर्व सुरु झाले. या सर्व गोष्टींचा पंजाबमधील तरुणांवर परिणाम होत होता.

पंजाबमधे १९०४ मध्येच एक गुप्त क्रांतिकारी संघटना स्थापन झाली होती. लाला हरदयाळ, अजितसिंग, अंबाप्रसाद हे त्याचे सभासद होते. गांधींच्या असहकार चळवळीने अपेक्षित परिणाम साधला नाही हे पाहून क्रांतिकारकांनी सचिन्द्रनाथ सेन यांच्या नेतृत्वाखाली प्रयत्न सुरु केले. क्रांतिकारकांना शस्त्रास्त्रे मिळवण्यासाठी पैसा हवा होता. रामप्रसाद बिस्मिल यांच्या नेतृत्वाखाली काकोरी स्टेशनजवळ रेल्वेवर हल्ला करुन १९२५मध्ये सरकारी तिजोरी लुटण्यात आली. याप्रकरणी रामप्रसाद बिस्मिल, राजेंन्द्र लाहिरी व अशफाक उल्ला खान यांना फाशीची शिक्षा झाली.

सायमन कमिशनमध्ये सर्वच सदस्य ब्रिटीश होते त्यामुळे जनमत खवळले होते. लाला लजपतराय यांनी या कमिशनचा निषेध करण्यासाठी जमलेल्या मोर्चाचे नेतृत्व केले. त्यामध्ये त्यांच्यावर झालेल्या लाठीहल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्यावर हल्ला करणाऱ्या सॉंडर्स या अधिकाऱ्याला भगतसिंग व राजगुरु यांनी ठार केले. ८एप्रिल १९३०मधे दिल्लीती कायदेमंडळात भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी बॉम्बस्फोट घडवून आणला. २३ मार्च १९३१ रोजी भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना फाशी देण्यात आली.

हिदुस्थान सोशालिस्ट रिपब्लीकन असोशिएशन भगतसिंग राजगुरु, चंद्रशेखर आझाद व इतर अनेक तरूण हिंदुस्थान सोशालीस्ट रिपब्लीकन असोसिएशन या क्रांतिकारी संघटनेचे सभासद होते. भारतामधे राष्ट्रव्यापी क्रांती आणण्याची गरज होती. भारतामधे राष्ट्रव्यापी क्रांती आणण्याची गरज आहे व त्यासाठी शस्त्र हाती घेणे आवश्यक आहे या सत्तेचे ते खंदे पुरस्कर्ते होते. मात्र त्यासोबत समाजाती दारिद्र्य, कुपोषण व गरीबी या मुलभूत समस्याही सुटल्या पाहिजेत असा सामाजिक विचार त्यांचा प्रेरणास्त्रोत होता. यातूनच ते समाजवादी विचारांकडे आकृष्ट झाले.

## ४.५ बंगालमधील क्रांतिकारक

बंगालमध्ये लॉर्ड कर्झनच्या आततायी धोरणांमुळे जनमत प्रक्षुब्ध झाले होते. त्याचा साम्राज्यवादी विचारसरणी व बंगालच्या फाळणीचे धोरण यामुळे बंगाली तरुण संतप्त होते. ब्रिटीश साम्राज्यवादी धोरणांना प्रखर विरोध करणाऱ्या चळवळीपैकी अनुशिलन समिती ही एक प्रमुख संस्था होती. कलकत्ता व ढाका ही त्यांची महत्वाची केंन्द्र होती. १९०२ साली कलकत्त्यामधे अनुशीलन समिती कार्यरत होती. युगांतर या पाक्षिकामधून व अनुशीलन समितीचा कार्यक्रम व राजकीय मतप्रणाली प्रसिद्ध होत होती. ढाका येथील अनुशीलन समितीच्या शाखेने प्रखर क्रांतिकारी राजकीय कार्यक्रम हाती घेतला होता. ब्रिटीश राजवटीच्या आर्थिक केन्द्रावर हल्ले करुन देशकार्यासाठी पैसा उभा करणे हे त्यांचे प्रमुख कार्य होते. बंकीमचंद्र चॅटर्जी यांच्या राष्ट्रवादी लिखाणाच्या समितीच्या सभासदांवर मोठा प्रभाव होता. आनंदमठ या कादंबरीमुळे अनेक तरुण प्रभावित झाले होते. समितीचे सदस्य भगवतगीता ग्रंथापैकी वाचन करीत असत.

बंगाल फाळणीनंतर अनुशीलन समितीने क्रांतीकारी कृत्ये करण्यास सुरुवात केल्यामुळे बिपिनचंद्रपाल व चित्तरंजन दास यांनी समितीतून अंग काढून घेतले. देशभरात समितीच्या अनेक शाखा होत्या मात्र बंगाल हे त्यांचे खरे कार्यक्षेत्र होते. इंग्जांचे राज्य हे परकीय आणि सैतानी आहे. त्यांना भारतातून घालवून देण्यासाठी बळाचा वापर करणे आवश्यक आहे. जर सर्व भारतीयांनी ठरविले तर एका दिवसात भारतात इंग्रज सत्ता नाहीशी होऊ शकते. असा त्यांचा दृढ विश्वास होता. इंग्रज अधिकाऱ्यांना ठार करणे हे त्यांनी कर्तव्यच मानले होते.

### ४.५.१ युगांतर समिती :

विरेन्द्र कुमार घोष, भूपेन्द्रनाथ दत्त, आश्विनीकुमार दत्त, अविनाश भट्टाचार्य व इतर क्रांतिकारकांनी १९०६ मधे युगांतर समितीची स्थापना केली. युगांतर व संध्या या नियतकालिकांद्वारे बंगाली तरुणांना प्रखर राष्ट्रवादाची शिकवण दिली जात होती. हेमचंद्रदास या क्रांतिकारकाने पॅरीसला जाऊन बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण घेतले होते. त्यांच्या मदतीने कलकत्ता येथे बॉम्ब तयार करण्याचा कारखाना काढण्यात आला. पाशवी सत्तेचा वापर करुन लोकांना त्रास देणाऱ्या अधिकाऱ्यांना ठार करण्याचा कार्यक्रम समितीने सुरु केला. भारतीय क्रांतिकारकांना शिक्षा ठोठावणाऱ्या किंग्जफोर्ड या न्यायाधीशाचाच खून करण्याची साहसी योजना समितीच्या सभासदांनी आखली. परंतू प्रत्यक्षात न्यायाधिश किंग्जफोर्ड सुखरुप राहीला मात्र त्याची पत्नी व मुलगी या हल्ल्यात ठार झाली. समितीच्या नरेन्द्र गोस्वामी या सभासदाने फितुरी केल्यामुळे सरकारला ह्या कटाची पूर्ण माहीती मिळाली. इंग्रज सरकारच्या हाती लागण्यापेक्षा प्रफुल्ल चाकी या क्रांतिकारकाने

आत्महत्या केली. खुदीराम बोस मात्र पकडले गेले. १९०९मधे त्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. माफीचा साक्षीदार झालेल्या नरेन्द्र गोसावी याला सत्येंद्रनाथ बोस यांनी ठार केले. त्यांनाही सरकारने फाशी दिली पण क्रांतिकारकांच्या बलिदानातून अखंड प्रेरणा मिळत राहीली व ही चळवळ आणखी जोमाने काम करु लागली. खुदीराम बोस यांना पकडणाऱ्या फौजदारालाही समितीच्या सभासदांनी ठार केले. या खटल्यातील सरकारी वकीलाला देखील जीवे मारण्यात आले.

### ४.५.२ सूर्यसेन :

सूर्यसेन यांचा जन्म १९८४ मधे चितगाव, बंगाल येथे झाला. बंगालमधील अनुशीलन समितीचे ते सदस्य होते. पुढे बी.ए. उत्तीर्ण झाल्यावर बंगालमधील युगांतर संघटनेविषयी त्यांना माहीती मिळाली व त्याचा त्यांच्यावर मोठा प्रभाव पडला. ब्रिटीशांविरुद्धच्या संघर्षात सशस्त्र लढा देण्यावर त्यांचा विश्वास होता. त्यांनी इंडियन रिपब्लीकन आमी स्थापने केली त्यांचे जवळजवळ पाचशे सैनिक ब्रिटीशांविरुद्ध लढा देण्यास सज्ज होते. क्रांतिसाठी शस्त्रास्त्रांची गरज असते तेव्हा शस्त्रास्त्रांसाठी हल्ला करण्याची योजना आखली. १८ एप्रिल १९३०मधे सूर्यसेन यांनी रिपब्लीकन इंडियन आर्मीच्या संस्थेतर्गत गणेश घोष व लोकनाथ दत्त यांच्या नेतृत्वाखली चितगाव येथील सरकारी शस्त्रागारांवर हल्ला केला व त्यावर ताबा मिळवला. क्रांतिकारकांनी टेलीफोन व इतर महत्वाच्या बिनतारी यंत्रणेच्या तारा कापून टाकल्या. रेल्वेमार्ग अडवून धरले. शस्त्रगिरातून त्यांना बंदुका मिळाल्या पण त्यासाठी आवश्यक दारुगोळा त्यांना मिळू शकला नाही. तरीदेखील हिम्मत न हारता सूर्यसेन यांच्या नेतृत्वाखाली चितगावमधे राष्ट्रीय झेंडा फडकण्यात आला व स्वतंत्र सरकार स्थापन झाल्याची घोषणा करण्यात आली. चितगाव हा डोंगराळ भाग असल्याने तेथे क्रांतिकारकांनी इंग्रजांना गनिमी कावा पद्धतीने जेरीस आणले. हजारो इंग्रज सैनिकांनी चितगावला वेढा दिला. दोधांमधे झालेल्या संघर्षात ८०पेक्षा जास्त इंग्रज सैनिक मारले गेले. सूर्यसेन यांचा एक साथीदार नेत्र सेन याने फितूरी केल्यामुळे इंग्रजांनी सूर्यसेन यांना पकडले. सूर्यसेन यांचे साथीदार तारकेश्वर दत्त यांनी सूर्यसेन यांना इंग्रजांच्या तावडीतून सोडवण्याची योजना बनवली पण त्याआधीच त्याची माहीती ब्रिटीशांना लागली त्यामुळे १२ जानेवारी १९३४ मधे सूर्यसेन व तारकेश्वर दोघांना फाशी देण्यात आली.

munotes.in

## ४.६ परदेशात कार्यरत असलेल्या क्रांतिकारी चळवळी

### ४.६.१ इंग्लंडमधील क्रांतिकार्य

इंग्लंडमधील क्रांतिकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवण्यात शामजी कृष्ण वर्मा हे अग्रेसर होते. १८९७मध्ये लंडनमध्ये स्थायिक झाल्यानंतर परदेशी

शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या होतकरु भारतीय तरुणांना दरसाल सहा शिष्यवृत्या देऊ केल्या. या शिष्यवृत्तीसाठी प्रखर राष्ट्रवादी तरुणांची काटेकोरपणे निवड केली जाई. यासाठी त्यांनी लंडनला क्रांतिकारी तरुणांचा गट गोळा केला. इंडिया हाऊस म्हणून प्रसिद्धिला आलेले शामजींचे घर त्यांच्या कार्याचे केंद्रस्थान बनले. १९०५साली त्यांनी 'इंडियन सोशॉलॉजिस्ट' हे पत्रक सुरु केले. पूर्ण स्वराज्य हे त्यांचे अंतिम उद्दिष्ट होते व त्याच्या पूर्ततेसाठी असहकार व निःशस्त्र प्रतिकाराचा मार्ग ते पुरस्कृत करीत होते. शामजींच्या लिखाणाचा सूर कडक होऊ लागताच त्यांच्या कार्यावर निर्बंध घालण्याची मागणी टाईम्ससारखी वृत्तपत्रे करु लागली. तेव्हा शामजींनी लंडन सोडून आपले कार्यकेंद्र पॅरिसला हलविण्यात आले. शामजींच्या पश्चात्त इंडिया हाऊसची जबाबदारी सावरकरांनी शिरावर घेतली. मॅझिनींचे चरित्र क्रांतिकारकांचे स्फूर्तीस्थान होते. १८५७च्या महान घटनेला सावरकरांनी शिपायांचे बंड न म्हणता भारतीयांचे पहिले स्वातंत्र्य युद्ध असे ठामपणे प्रतिपादित केले झाशीची राणी, तात्या टोपे हे क्रांतिकारकांचे आदर्श होते. इंडिया हाऊसमध्ये युरोपातून येणाऱ्या तरुणांबरोबर युरोपातील क्रांतिकारी चळवळीच्या इतिहासाचे सामूहिक वाचन सुरु केले. विदेशी क्रांतिकारकांचा भारतीय तरुणांना परिचय करुन दिला. पिस्तुलाचा वापर करण्याचे शिक्षणही ते गुप्तपणे देऊ लागले. अशाच तरुणांपैकी मदनलाल धिंग्रा यांने कर्झनवायलीची हत्या केली. बलशाली ब्रिटीश साम्राज्याच्या केंद्रस्थानी एका बड्या ब्रिटीश अधिकाऱ्याची हत्या करण्याचा धाडसी प्रयत्न एका भारतीय तरुणाने करुन मातृभूमीसाठी आत्मबलिदान केलेले पाहून ब्रिटीश राजसिंहासनही हादरले.

धिंग्रा प्रकरणामुळे इंडिया हाऊसशी संबंधित असलेल्या ब्रिटीशांच्या दमननीतींचा वरवंटा फिरु लागला. शामजींची विद्यापीठाची पदवी रद्द करण्यात आली. सावरकरांना नाशिक खटल्यात गोवून त्यांना अटक करण्यात आली लंडनप्रमाणेच पॅरिस येथेही सरदार सिंग राणा यांनी क्रांतिकारकांसाठी एक केंद्र उघडले. पुढे श्रीमती कामा लवकरच या गटात सामील झाल्या. १९०२रोजी भारत सोडल्यानंतर त्यांनी युरोपात सतत प्रचारकार्य केले. पॅरिसमध्ये त्या 'वंदे मातरम्' या पत्रकाचे संपादन करु लागल्या. १९०७च्या इंटरनॅशनल सोशालिस्ट कॉंग्रेसमध्ये कामा व राणा यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. या आंतरराष्ट्रीय सभेत कामांनी स्वतः तयार केलेला तिरंगी ध्वज स्वतंत्र भारताचा ध्वज म्हणून फडकविला व त्याद्वारा भारतीयांची स्वातंत्र्याची आकांक्षा जगापुढे मांडली. आयुष्यभर बाहेरच्या जगात त्या भारतीयांच्या आशा आकांक्षांना व सरकारच्या अन्यायाला सतत वाचा फोडीत राहिल्या.

### ४.६.२ अमेरिकेतील क्रांतिकार्य गदर चळवळ

शामजी कृष्ण वर्मा, विनायक दामोदर सावरकर, श्रीमती कामा ही मंडळी युरोपात जे कार्य करीत होती तशाच प्रकारचे कार्य अमेरिकेत

भारताच्या वतीने लाला हरदयाळ करीत होते. २० व्या शतकाच्या प्रारंभी अमेरिकेत स्थायिक झालेल्या कांही श्रीमंत भारतीयांनी राष्ट्रवादी चळवळीला हातभार लावला. शिष्यवृत्या देऊन शिक्षणाच्या निमित्ताने भारतीय तरुणांना अमेरिकेत आणण्यासाठी फंड गोळा करु लागले. वंगभंगाविरोधी चळवळीचे पडसाद तेथेही उमटले. १९०८साली तारकानाथ दासांनी तेथे 'फ्रि हिंदुस्थान हे पत्रक काढले. अमेरिकेत क्रांतिकारी सैन्याचे आयोजन डॉ.खानखोजे व विष्णू पिंगळे यांच्याकडे सोपविण्यात आले लाला हरदयाळ शिष्यवृत्ती घेऊन शिक्षणांसाठी लंडनला गेले होते पण भारतातील ब्रिटीश शासनाच्या शोषक स्वरुपाची माहिती होताच शिष्यवृत्ती सोडून भारतात आले. कांही काळ लाहोरला तरुण क्रांतीकारकांसाठी कार्य केले. परंतु ब्रिटीशांची तीक्ष्ण नजर चुकवून तेथे हे कार्य करणे शक्य नसल्याचे ध्यानात येताच लाला हरदयाळ यांनी १९११मध्ये अमेरिकेत तेथील समविचारी भारतीयांना संघटीत करुन १९१३मध्ये 'हिंदी असोसिएशन ऑफ अमेरिका' नावाची संघटना स्थापन करुन गदर नावाचे साप्ताहिक सुरु केले. असोसिएशनचा सहानुभूती व अमेरिकन लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न होता. गदर नावाच्या साप्ताहिकावरुन हा क्रांतीकारी गट 'गदर पक्ष' म्हणून ओळखला जाऊ लागला. गदर पक्षाची सदस्य संख्या ५०००च्या वर गेली. अमेरिका व कॅनडा मिळून ६२शाखा स्थापन झाल्या. ब्रिटिशनिष्ठ अधिकाऱ्यांची हत्या करणे, शस्त्रास्त्रांची खरेदी करणे, बॉम्ब तयार करण्याचे ज्ञान अवगत करुन घेणे, सरकारी खनिजे लुटणे, इंग्लंडच्या शत्रूशी मैत्री करणे, भारतीय लष्करात विद्रोहाची भावना चेतविणे इत्यादी कामे गदर पक्ष करीत असे. लाला हरदयाळांच्या कार्यावर ब्रिटीशांची नजर होती. हरदयाळांना अटक करावी म्हणून ब्रिटीश सरकारने अमेरिकन सरकारवर दडपण आणून अटक केली. अमेरिकन न्यायाधिशाने हरदयाळची जामीनावर सुटका केली. हरदयाळ स्वित्झर्लंडला निघून गेले. त्यांच्या अनुपस्थित गदर पक्षाचे कार्य त्यांच्या अनुयायांनी चालविले. १९२३पर्यंत अमेरिकेत गदरपक्ष कार्यरत असल्याचा पुरावा सापडतो. कॅनडामध्ये क्रांतिकारी चळवळ संयोजित करण्याच्या बाबतीत गुरुदत्तसिंग या क्रांतिकारकाच्या प्रयत्नाची माहिती १९१४सालच्या 'कामागाटामारु' प्रकरणाने उघडकीस आली.

### ४.६.३ जर्मनीमधील क्रांतीकार्य :

पहिले महायुद्ध सुरु होताच भारतातील ब्रिटीश सत्ता उलथून पाडण्याच्या हेतूने जर्मन सरकारची मदत मिळविण्याची खटपट कांही भारतीय क्रांतिकारक करु लागले. वीरेंद्र चटोपाध्यायसारख्या कांही क्रांतिकारकांचा ब्रिटीश विरोधी उपयोग करुन घेता येईल अशी जर्मन सरकारची कल्पना होती. म्हणून जर्मन सरकारने भारतीय क्रांतिकारकांना मदतीचे आश्वासन दिले. १९१४मध्ये धीरेन सरकार यांच्या नेतृत्वाखाली तेथे एक समिती स्थापन केली. समितीच्या माध्यमातून अमेरिकेतील गदर नेत्यांशी भारतीय क्रांतिकारकांशी संपर्क प्रस्थापित केला. त्यांनी बर्लिन येथे 'इंडियन इंडिपेंडंस'

समिती स्थापन केली जर्मनीप्रमाणे तुर्कस्तान इजिप्तच्या अधिकाऱ्यांशी या समितीने संबंध प्रस्थापित केले. भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावर जर्मनिनी एकाचवेळी हल्ला करावा. त्याचवेळी भारतीय क्रांतिकारकांनी देशाच्या निरनिराळ्या भागात सशस्त्र उठाव करावेत, लष्करी छावण्यांतून सैनिकांनी बंडाचे निशाण उभारावे व या उठावात सस्थानिकांनी सामील व्हावे अशी धाडशी योजना आखण्यात आली. ठरल्याप्रमाणे जर्मन बोटी भारताच्या रोखाने निघाल्या. परंतू कडक बंदोबस्तामुळे त्या भारताच्या किनाऱ्यापर्यंत येऊ शकल्या नाहीत. युद्धकाळात जर्मनीच्या मदतीने रंगून, सिंगापूर मलाया येथील भारतीय सैनिकांला विद्रोहाचे आवाहन करण्यात आले. आव्हानाप्रमाणे सिंगापूरच्या लष्कराने बंड केले पण ते मोडून काढले गेले. क्रांतिकारकांना शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण देण्यास बँकॉक येथे एक केंद्र स्थापन करण्यात आले व या कामासाठी जर्मन अधिकारी नेमले गेले.

### ४.६.४ अफगाणिस्तानमधील क्रांतिकार्य

तुर्कस्तान इंग्लंडविरुद्ध पहिल्या महायुद्धात प्रविष्ट होताच काही भारतीय क्रांतिकारकांनी अफगाणिस्तानात तळ ठोकून तुर्कस्थानाची मदत मिळविण्याचा खटाटोप सुरु केला. या कटात मुस्लिम क्रांतिकारक आघाडीवर होते. पहिल्या महायुद्धात तुर्कस्तानाच्या सुलतानाचा केलेला पराभव यामुळे भारतीय मुस्लिम समाजात ब्रिटिशाविरोधी भावना भडकू लागली. बरेच मुस्लिम तरुण सीमेपलीकडील पठांणाच्या प्रदेशात जाऊन पठाणी प्रदेशात स्थायिक झालेल्या भारतीय वहाबी नेत्यांशी संपर्क साधावा व त्यांच्या मदतीने वायव्यसीमेवर हल्ला चढवावा आणि त्याचवेळी भारतीय मुस्लिमांनी देशात ठिकठिकाणी उठाव करावे अशी योजना आखण्यात आली. या कटाचे सूत्रधार मौलवी अबीदुल्ला हे काबूलला गेले. तेथे राजा महेंद्र व बरकतउल्ला हे दोन क्रांतिकारक त्यांना येऊन मिळाले. त्यांनी तुर्कस्थान व जर्मनीकडून मदतीचे आश्वासन मिळविले व अफगाणिस्तानच्या अमीरने त्यांना आश्रय दिला. डिसेंबर १९१५ मध्ये काबूल येथे क्रांतिकारकांनी स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार स्थापन केले. रशियन सरकारकडे मदतीची मागणी केली परंतू त्यांच्या प्रयत्नांना फळ आले. हल्ला करण्याची योजना त्यांना सोडून द्यावी लागली. १९१७मध्ये रशियात ऑक्टोबर क्रांती झाल्यानंतर काबूलमधील भारताच्या अस्थायी सरकारचे प्रतिनिधी म्हणून बरकत उल्ला व अब्दूल रब उपस्थित होते. त्यांनी लेनिनची भेट घेतली. वीरेंद्र चट्टोपाध्याय, मानवेंद्र रॉय हेही सोविएत सरकारकडे वळले. रशियातील काही क्रांतिकारक भारतात परतले व क्रांतिकारक गटास मिसळले.

**आपली प्रगती तपासा :**

१) परदेशातील क्रांतिकारी चळवळीवर थोडक्यात लिहा.

munotes.in

## ४.७ सारांश

देशातील जुलमी ब्रिटीश शासनाविरुद्ध क्रांतिकारी चळवळी हा फरक महत्वाचा प्रवाह होता. सनदशीर मार्गाने अथवा जहाल लोकांप्रमाणे रस्त्यावर येऊन सरकार विरुद्ध निदर्शने केल्याने अथवा परकीय मालाचा बहिष्कार केल्याने इंग्रज देश सोडून जातील यावर त्यांचा विश्वास नव्हता. जालियनवाला बाग हत्याकांड, बंगालची फाळणी व ब्रिटीश शासनाचे लोकांसोबतचे धोरण यामुळे या चळवळींना तरुणांचे पाठबळ मिळाले. अनेक सुशिक्षित तरुण सुखसमाधानाचे आयुष्य सोडून देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देण्यास सज्ज झाले होते. सर्व सुखांचा त्याग करुन स्वातंत्र्यासाठी ते झपाटलेले होते. काही ब्रिटीश अधिकाऱ्यांना ठार केल्याने ते देश सोडून जातील यावर त्यांची भाबडी श्रद्धा नव्हती. त्यांना इंग्रजांच्या पाशवी सत्तेचे आकलन झालेले होते. भगतसिंग यांनी आपल्या पुस्तकातून स्पष्टपणे सांगितले की अधिकाऱ्यांना ठार केल्याने ब्रिटीश सत्तेचे उच्चाटन होणार नाही. पण इंग्रजांच्या जुलमाविरुद्ध देशातील जनतेत विद्रोही भावना तयार करण्यामागे त्यांच्या क्रांतिकार्याचा प्रमुख हेतू होता. भगतसिंग यांनी कायदेमंडळात घडवून आणलेल्या बॉम्बस्फोटाचा हेतू जिवित हानी करणे हा नव्हता तर देशातील जनतेमध्ये पसरलेल्या तीव्र असंतोषाचे ते प्रतिनिधिक कृत्य होते. त्यांच्या कार्याला त्वरीत यश मिळू शकले नाही तरी त्यांच्या त्यागाने लोकांना अखंड प्रेरणा दिली.

## ४.८ प्रश्न

(१) भारतातील क्रांतिकारी चळवळीबद्दल माहिती द्या.
(२) महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीबद्दल थोडक्यात लिहा.
(३) पंजाब व बंगालमधील क्रांतिकारकांच्या क्रांतिकार्याबद्दल माहीत द्या.
(४) युरोप व अमेरिकेतील भारतीय क्रांतिकारकांच्या क्रांतीकार्यातील सहभागाची माहीती द्या.

## ४.९ संदर्भ सूची

(१) बिपीन चंद्र व इतर, भारतीय स्वातंत्र्य लढा
(२) बिपीन चंद्र, अमलेशत्रिपाठी, बरुण डेः स्वातंत्र्याचा लढा
(३) ग्रोव्हर आणि बेल्हेकरः आधुनिक भारताचा इतिहास
(४) सुमन वैद्य व शांता कोठेकरः
  १) आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०)
  २) आधुनिक भारताचा इतिहास (१९२०-१९४७)
(५) सुमित सरकारः आधुनिक भारत
(६) डॉ. जयसिंगराव पवारः आधुनिक हिंदुस्तानचा इतिहास
(७) धनंजय आचार्यः आधुनिक भारत (१७५०-१९५०)

♦ ♦ ♦ ♦ ♦

५

# गांधीयुगातील चळवळी

**प्रकरणाची रचना**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ म.गांधीचे प्रारंभिक सत्याग्रह

५.३ असहकार चळवळ

५.४ स्वराज्य पक्ष

५.५ सविनय कायदेभंग चळवळ

५.६ चले जाव चळवळ

५.७ सारांश

५.८ प्रश्न

५.९ संदर्भ सूची

## ५.० उद्दिष्टे

**१.** गांधीजींच्या प्रारंभिक सत्याग्रहाची भूमिका समजून घेणे

**२.** म.गांधींच्या असहकार चळवळीचा अभ्यास करणे

**३.** सविनय कायदेभंग चळवळीचे महत्व जाणून घेणे

**४.** चले जाव चळवळीचा अभ्यास करणे

## ५.१ प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या व राष्ट्रीय काँग्रेसच्या इतिहासात १९२० ते १९४८ या कालखंडाला गांधीयुग असे म्हणतात. टिळकांसारख्या महान नेत्याचा १९२० मध्ये मृत्यू झाला. सरकारने केलेल्या दडपशाहीमुळे जहालवादी चळवळीचे खच्चीकरण झाले होते. अशा बिकट परिस्थितीत भारतीय लोकांच्या आशा आकांक्षा व इच्छांना वळण लावणारा कणखर नेता आवश्यक होता आणि ही गरज म.गांधींनी भरुन काढली.

munotes.in

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म १८६९ मध्ये काठेवाडमधील पोरबंदर या ठिकाणी झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाल्यावर महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते मुंबईला आले. त्याआधी वयाच्या बाराव्या वर्षी त्यांचा विवाह कस्तुरबांशी झाला. इ.स.१८८८मध्ये कायद्याची पदवी मिळवण्यासाठी विलायतेस गेले. तेथे बॅरीस्टर बनून मायदेशी परतले. मुंबईच्या न्यायालयात त्यांनी वकीली करण्यास प्रारंभ केला. वकीलीच्या व्यवसायानिमित्त एका खटल्यासंबंधात १८९३मध्ये ते दक्षिण आफ्रिकेतील नाताळ या ब्रिटीश वसाहतीत गेले असता तेथील वर्णभेदाचा भयंकर अनुभव त्यांना मिळाला. ब्रिटीश राजवटीने हिंदी लोकांचा मतदानाचा हक्क हिरावून घेण्याचा कायदा केला तसेच चोर-दरोडेखोरांप्रमाणे हिंदी लोकांच्या बोटांचे ठसे सरकारजमा करण्याचे आदेश दिले. त्यामुळे गांधीजींनी याविरुद्ध व इतर अन्यायी कायद्यांविरुद्ध सत्याग्रहाचा अहिंसात्मक लढा सुरु केला इ.स. १९०६ ते १९१४ या काळात आफ्रिकेतील सरकारला नमवून अनेक कर व कायदे रद्द करुन घेतले त्यांच्या सत्याग्रहाचा हा पहिला मोठा विजय होता. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या आग्रहाने १९१५ मध्ये मायदेशी परतले व त्यांना राजकीय गुरु मानून भारताच्या राजकारणात प्रवेश केला. पहिल्या महायुद्ध काळात गांधीजींनी ब्रिटीश सरकारला मदत करण्याचे जाहीर केले त्यामुळे सरकारने त्यांना 'कैसर-इ-हिंद हा किताब बहाल केला. गांधीजींनी संपूर्ण भारताचा दौरा केला. अहमदाबादला साबरमती परिसरात आश्रम स्थापन केला. देशातील बहुसंख्य अशिक्षीत व मागास जनतेचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी त्यांनी आपला वेष व जीवनपद्धती बदलून टाकली.

munotes.in

## ५.२ महात्मा गांधींचे प्रारंभिक सत्याग्रह

सन १९१६ मध्ये गांधीजींनी देशात सत्याग्रहाचा पहिला प्रयोग केला. हिंदूस्थानातील मजूरांना मुदतबंदीने करार करून प्रशांत महासागरातील फिजी बेटावरील गोऱ्या मळेवाल्यांच्या शेतावर कामाला नेले जाई पण त्यांच्यावर प्रचंड अत्याचार केले जात. याविरुद्ध गांधींनी सरकारला सत्याग्रहाची धमकी दिली त्यामुळे गुलामगिरीची ही पद्धत एप्रिल १९१७ मध्ये सरकारने बंद केली.

बिहारमधील चंपारण्यातही युरोपियनांच्या निळीच्या मळ्यात हिंदी मजूर हलाखीचे जीवन जगत होते. गांधीजींनी स्वतः जाऊन हिंदी मजुरांची स्थिती पाहिली गांधीजींच्या चंपारण्य प्रवेशाला तेथील मॅजीस्ट्रेटने बंदी घातली तरीही गांधींनी चंपारण्यात प्रवेश केल्याने त्यांच्यावर खटला भरला. यावेळी गांधीनी गुन्हा कबूल करुन

कोणतीही शिक्षा भोगण्याची तयारी दाखवली. जनआंदोलनाच्या भितीमुळे सरकारने गांधींविरुद्धचा खटला काढून घेतला व हिंदी मजूरांचे प्रश्न सोडविण्यासाठी एक कमीशन नेमून त्यात गांधीजींची नियुक्ती केली. या कमिशनने १९१८मध्ये कायदा करुन चंपारण्यातील शेतकऱ्यांच्या तक्रारी दूर केल्या.

म.गांधीनी अहमदाबादेतील कापड गिरणी कामगारांना सत्याग्रह करुन गिरणी मालकांकडून न्याय मिळवून दिला. यानंतर ते गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मदतीसाठी गेले. तेथील शेतकऱ्यांना सारा न देण्याचे व सरकारच्या दडपशाहीला अहिसांत्मक प्रतिकार करण्यास प्रवृत्त केले. या आंदोलनाला यश येऊन सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या. गांधीजींच्या या यशस्वी सत्याग्रहांमुळे संपूर्ण देशात गांधीजी लोकप्रिय बनले.

## ५.३ असहकार चळवळ

म. गांधींच्या उदयापर्यंत संपूर्ण देशात राष्ट्रवादाची वाढ मोठ्या प्रमाणावर झाली होती. त्यातच पहिल्या महायुद्धानंतर भारताला स्वयं निर्णयाचे तत्व लागू केले जाईल अशी घोषणा अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुल्ड्रो विल्सन यांनी केली होती. परंतु युद्धसमाप्तीनंतर भारतीयांना इंग्रज सरकारकडून काहीही न मिळाल्याने भारतीयांचा मोठा अपेक्षाभंग झाला. इंग्रज सरकार दिवसेंदिवस क्रूर बनत चालले होते. कोणत्याही परीस्थितीत इंग्रज भारतावरील ताबा सोडण्यास तयार नव्हते.

### ५.३.१ पार्श्वभूमी :

असहकार चळवळीची घोषणा होण्यापूर्वी या काळात घडलेल्या काही घटनांनी गांधीजींचा ब्रिटीशांच्या न्यायप्रियतेवरील विश्वास उडाला.

भारतातील क्रांतीकारी कारवायांना आळा घालण्यासाठी ब्रिटीश सरकारने सिडने रौलेट या न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली १९१७ मध्ये एक समिती नेमली. त्याने दिलेल्या अहवालानुसार १८ मार्च १९१९ रोजी ‘अनार्किकल ॲन्ड रिव्होल्युशनरी क्राइम्स ॲक्ट’ हा कायदा पास केला यालाच रौलेट ॲक्ट असे म्हणतात. या कायद्याने संशयित व्यक्तीला कारण न सांगता किंवा विनावॉरंट अटक करण्याचा व त्यांच्यावर खटला न भरता कितीही दिवस कारागृहात ठेवण्याचा आधिकार पोलीसांना मिळाला. भारतीयांच्या दृष्टीने हा काळा कायदा होता. गांधीजींनी या कायद्याविरुद्ध ३० मार्च १९१९

रोजी सत्याग्रहाचा दिवस जाहीर केला. यावेळी देशातील आंदोलकांवर शासनाने गोळीबार केले. ७ एप्रिल रोजी गांधीजींना अटक झाली.

संपूर्ण देशात या आंदोलनाने पेट घेतला असतांनाच देशाला हादरा देणारी घटना पंजाबमध्ये घडली. येथील आंदोलने दडपून टाकण्यासाठी लेप्टनंट गव्हर्नर ओडवायर ने पंजाबमधील लोकप्रिय नेते डॉ. सैफूद्दीन व डॉ. सत्यपाल यांना स्थानबद्ध केल्याने लोकं संतापले त्यांनी जाळपोळ, हिंसक आंदोलने सुरु केली. ११ एप्रिल १९१९रोजी अमृतसर शहराचा ताबा जनरल डायरच्या हाती सोपविला गेला. त्याने सभा व मिरवणूकांवर बंदीचे फर्मान काढले परंतू हे फर्मान इंग्रजीत असल्याने लोकांना समजू शकले नाही. सरकारचा निषेध करण्यासाठी १३ एप्रिल १९१९ रोजी आंदोलकांनी अमृतसरमधील जालीयनवाला बाग येथे सभा आयोजित केली. या सभेची माहिती मिळताच खवळलेल्या डायरने जालीयन वाला बागेचे सर्व मार्ग बंद करुन पूर्वसूचना न देता गोळीबार सुरू केला. यात हजारो लोकं ठार झाले व जखमी झाले. या हत्याकांडाची चौकशी करण्यासाठी शासनाने हंटर कमिशन नियुक्त केले. २६मे १९२० रोजी या कमिशनचा पक्षपाती अहवाल प्रसिद्ध झाला त्यानुसार जनरल डायरला फक्त कामावरुन दूर केले गेले व ओडवायरला दोषमुक्त ठरवले. या घटनेमुळे गांधीजींचे मन व्यथीत झाले.

इंग्रजांविरुद्ध राष्ट्रीय पातळिवर असहकार सुरु करण्याचे गांधीजींनी ठरवले या चळवळीस मुस्लिमांनी ही पाठींबा द्यावा यासाठी त्यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याकडे लक्ष दिले. तुर्कस्थानचा खलिफा हा जगातील सर्व मुस्लिमांचा प्रमुख धर्मगुरु मानला जाई पहिल्या महायुद्धात खलीफाने इंग्लंडविरुद्ध व जर्मनीच्या बाजूने युद्धात उडी घेतली. इंग्लंडने युद्धसमाप्तीनंतर तुर्की साम्राज्याचे लचके तोडले त्यामुळे मुस्लिमांनी खिलाफत चळवळ सुरु केली. भारतातील या चळवळीस गांधीजींनी पाठींबा दिला व मुस्लिम नेत्यांनी असहकार चळवळीस मदत करण्याचे मान्य केले.

### ५.३.२ असहकार चळवळीस प्रारंभ :

२६ डिसेंबर १९२०रोजी काँग्रसचे नागपूर येथे आधिवेशन भरले. या आधिवेशनाला १४ हजारापेक्षा आधिक प्रतिनिधी देशाच्या कानाकोपऱ्यातून आले होते. यापूर्वीच १ ऑगस्ट १९२० रोजी गांधीजींनी असहकाराची घोषणा केली होती व या आधिवेशनात असहकाराचा ठराव मांडला जाणार होता. चित्तरंजन दास यांनी असहकाराचा ठराव मांडला त्याला लाला लजपतराय, मोतीलाल नेहरू, देशबंधूदास यांनी पाठींबा दिला तर बॅ. जीना, मदन मोहन

मालवीय, ॲनी बेझंट, बिपीनचंद्र, टिळकसमर्थक दादासाहेब खापर्डे, अणे, मुंजे यांनी विरोध केला कारण असहकार करुन राष्ट्राचे कल्याण साधणार नाही असे त्यांना वाटत होते. असे असले तरी असहकार ठराव बहुमताने मंजूर झाला. काँग्रेसच्या या निर्णयाने देशात खऱ्या अर्थाने जनआंदोलनाच्या नव्या पर्वाला प्रारंभ झाला. या आधिवेशनानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी देशभरात सभा घेऊन असहकार कार्यक्रमांचे स्वरूप व महत्व सामान्य जनतेला पटवून दिले. गांधीजिंनीही अलीबंधूसह देशभर दौरा करुन अहिंसक असहकाराच्या मार्गाने एका वर्षात स्वराज्य मिळविण्याची हमी दिली.

### ५.३.३. असहकाराचा कार्यक्रम

म.गांधींनी असहकार चळवळ कशी करावी याचे मार्गदर्शन जनतेला केले व पुढील कार्यक्रम जनतेच्या हाती दिला.

१. सरकारी पदव्यांचा त्याग करावा, पदांचा व स्थानिक संस्थांच्या सदस्यत्वाचा त्याग करावा.
२. सरकारी दरबारात, उत्सवात तसेच स्वागत समारंभात हजर राहू नये.
३. इंग्रजी शाळा-महाविद्यालयांवर बहिष्कार टाकावा व वेगवेगळ्या प्रांतात राष्ट्रीय शाळा स्थापन कराव्या.
४. न्यायाधीश व वकीलांनी सरकारी न्यायालयांवर बहिष्कार टाकून जनतेसाठी पंचायती व न्यायालये स्थापन करावी.
५. सैनिक कर्मचाऱ्यांनी विदेशी नोकरीचा बहिष्कार करावा.
६. स्वदेशीचा वापर व विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकावा.
७. नवीन माँटफोर्ड सुधारणांवर बहिष्कार तसेच १९१९च्या सुधारणाद्वारे होणाऱ्या निवडणूकांवर बहिष्कार टाकावा.

### ५.३.४ चळवळीचा प्रसार :

असहकार चळवळ घोषीत झाल्याबरोबर महात्मा गांधींनी 'कैसर-इ-हिंद', रविंद्रनाथ टागोरांनी 'सर' तर सुभाषचंद्र बोस यांनी आय.सी.एस. पदवीचा त्याग करुन लोकांसमोर आदर्श घालून दिला. मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू, चित्तरंजन दास, व्ही.व्ही. गिरी, राजेंद्रनाथ, वल्लभभाई पटेल यांनी प्रचंड पैसा मिळणारा वकीली व्यवसाय सोडून न्यायालयांवर बहिष्कार टाकला.

कायदेमंडळावर बहिष्कार टाकतांना १९२१च्या निवडणूकीत अनेकांनी उमेदवारी मागे घेतली, मतदारांनी मतदान केले नाही पण काही स्वतंत्र उमेदवारांमुळे, लिबरल पक्षांमुळे निवडणूका होऊन कायदेमंडळ टिकले पण त्यास प्रतिनिधीक स्वरूप राहिले नाही.

हजारो विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने शाळा-महाविद्यालये बंद ठेवून बहिष्कारात भाग घेतला. पालकांनी आपल्या मुलांना सरकारी शाळेतून काढून राष्ट्रीय शाळात टाकले. अनेक राष्ट्रीय शाळा स्थापन झाल्या. परदेशी मालाच्या होळ्या होऊ लागल्या. सुतकताई व विणकामाला उत्तेजन देऊन खादीचा वापर होऊ लागला. स्वदेशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देणे, हातमाग उद्योगाला गती देणे, हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी प्रयत्न करणे, अस्पृश्यता नष्ट करणे हे कार्यक्रमदेखील राबविण्यात आले. विदेशी दारू विकणाऱ्या दुकानांसमोर पिकेटिंग करण्यात आले.

भारतातील नवीन कायदेमंडळाचे उद्घाटन करण्यासाठी इंग्लंडचा युवराज प्रिन्स ऑफ वेल्स याचे १७ नोव्हेंबर १९२१ रोजी मुंबईत आगमन झाले असतांना देशात सर्वत्र काँग्रेसने हरताळ पाळला. म. गांधींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेला प्रचंड गर्दी जमली. या सभेतून निघालेल्या लोकांचा संयम सुटून युवराजाच्या स्वागत समारंभाला जमलेल्या पारशी व अँग्लो-इंडियन लोकांवर त्यांनी दगडफेक सुरु केली, विदेशी दुकाने लुटली, मोटारींना आगी लावल्या यावेळी झालेल्या गोळीबारात ५३ लोकांचे प्राण गेले व ४०० लोकं जखमी झाले.

### ५.३.५ इंग्रज शासनाची भूमिका :

असहकार चळवळीच्या वेगवान प्रसारामुळे तसेच युवराजाच्या आगमनावर प्रत्येक ठिकाणी होणाऱ्या बहिष्कारामुळे सरकारची स्थिती डिवचलेल्या नागासारखी झाली. ही चळवळ अत्यंत निर्दयपणे दडपून टाकण्याचा शासनाने निर्धार केला. राज्यद्रोही संघटन विषयीचा कायदा पास करुन काँग्रेस व खिलाफत मंडळ बेकायदा घोषीत करण्यात आले. जाहीर सभा उधळून लावण्याचा सरकारने सपाटाच लावला. लाठीहल्ला व गोळीबाराचा मुक्त वापर करण्यात आला नेहरू पिता-पुत्र, लाला लजपतराय, चित्तरंजन दास अशा अनेक पुढऱ्यांसह ३० हजारांवर लोकांना तुरुंगात डांबण्यात आले. परिणामाच्या भितीने गांधीजींना अटक करण्याची हिंमत सरकारला झाली नाही. डिसेंबर १९२१मध्ये अहमदाबाद येथे भरलेल्या आधिवेशनात राष्ट्रीय सभेने आंदोलनाचे सर्व अधिकार गांधीजींना दिले. १ फेब्रुवारी १९२२ रोजी गांधीजींनी गव्हर्नर जनरल लार्ड रिडिंग यांना पत्र लिहून दडपशाहीचे धोरण थांबविण्याचे व काँग्रेस नेत्यांची मुक्तता करण्याची मागणी केली त्यासाठी सरकारला सात दिवसांची मुदत दिली. तसेच बार्डोली सत्याग्रहाची घोषणा केली. बार्डोली येथे पहिला सत्याग्रह होताच बिहार, बंगाल, संयुक्त प्रांत, मध्यप्रांत, पंजाब येथेही सत्याग्रहाचे सत्र

सुरु होणार होते. सर्व देशाचे लक्ष बार्डोलीकडे लागले त्यामुळे ब्रिटीश शासन धास्तावले होते.

### ५.३.६ चौरीचौरा प्रकरण व असहकाराची समाप्ती :

१ फेब्रुवारी १९२२ रोजी गांधीजींनी बार्डोली सत्याग्रहाची घोषणा केली होती त्या दिशेने तयारी सुरु असतांनाच एक अनपेक्षीत घटना घडून चळवळीची दिशाच बदलली.

५ फ्रेब्रुवारी १९२२ रोजी उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा येथे स्वयंसेवकांनी शासनाच्या विरोधात मिरवणूक काढली. शांतपणे जाणाऱ्या या मिरवणूकीवर पोलीसांनी गोळीबार केला त्यामुळे प्रक्षुब्ध जमावाने पोलीसांवर प्रतिहल्ला केला. पोलीसांनी जवळच असलेल्या पोलीस ठाण्याचा आश्रय घेतला पण जमावाने ही पोलीस चौकी पेटवून दिली. यात २१ पोलीस जळून ठार झाले, बाहेर पडणाऱ्या पोलीसांनाही ठेचून मारण्यात आले.

या हिंसक घटनेचा मं. गांधीना मोठा धक्का बसला असहकार आंदोलनात त्यांना हिंसा अपेक्षीत नव्हती त्यांणि बार्डोली सत्याग्रह व असहकार चळवळ स्थगित केल्याची घोषणा केली. अनेक नेत्यांना गांधीजींचा निर्णय आवडला नाही, गांधीजींची लोकप्रियताही कमी झाली याचा फायदा घेऊन सरकारने १० मार्च १९२२ रोजी गांधीजींना अटक केली त्यांच्यावर खटला भरुन सहा वर्ष तुरुगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

### ५.३.७ मूल्यमापन :

गांधीयुगातील या पहिल्या जन आंदोलनामुळे ब्रिटीशांविरोधी लढ्याचे क्षेत्र विस्तारले. शहरातीलच नव्हे तर ग्रामीण भागातील जनतेत कॉंग्रेसच्या प्रचारामुळे राजकीय जागृती होऊ लागली. राष्ट्रीय लढ्यात आपणही सहभागी होऊ शकतो या जाणिवेने सामान्य लोकांत प्रचंड उत्साह निर्माण झाला. जनतेत आत्मविश्वास व आत्मसन्मानाची भावना निर्माण झाली तसेच मोठ्या संख्येने लोकं चळवळीत सामील झाल्यामुळे लोकांच्या मनातील शासनाच्या दडपशाहीची भिती नष्ट झाली व राष्ट्रहितासाठी हालअपेष्टा सोसणे, तुरुंगवास पत्करणे ही त्यांना अभिमानाची बाब वाटू लागली. क्रांतीकारी संघटनेप्रमाणे कॉंग्रेसने शस्त्र हातात घेतले नसले तरी अहिंसा व सत्याग्रह ही नवी शस्त्रे ती हाताळू लागली या चळवळीच्या माध्यमातून गांधींनी अस्पृश्यता निवारण्याचा कार्यक्रम लोकप्रिय केला आणि राजकारणातून समाजसुधारणेचे तंत्र लोकांना पटवून दिले. चळवळ स्थगीत करणाऱ्या

गांधींच्या निर्णयावर टीका करणाऱ्या काँग्रेस नेत्यांनी देखील म. गांधींचे नेतृत्व पूर्णपणे झुगारुन दिले नाही हे लक्षणीय आहे.

या चळवळीचे काही नकारात्मक परिणाम देखील घडून आले. गांधीजींची एक वर्षात स्वराज्य ही घोषणा व्यवहार्य नसल्यामुळे ती प्रत्यक्षात उतरणे शक्य नव्हते चळवळ स्थगित झाल्याने तरुणांचा गांधींच्या अहिंसक लढ्यावरील विश्वास उडू लागला आणि स्वराज्य प्राप्तीसाठी ते पर्यायी मार्ग शोधू लागले. हिंदू मुस्लिम ऐक्यासाठी गांधीजींनी खिलाफत चळवळीला जो पाठींबा दिला त्यानुसार हे ऐक्य केवळ दोन वर्षेच टिकले. भारतीय मुसलमानांनी असहकार चळवळीला पाठींबा दिला तो एक राष्ट्रीयत्वाच्या भावनेतून नसून धर्मनिष्ठेच्या भावनेतून होता त्यामुळे तुर्कस्थानात गणतंत्र स्थापन होऊन खलीफाचा प्रश्न निकालात निघताच मुसलमानांना असहकार चळवळीत स्वारस्य उरले नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१) महात्मा गांधीजीची असहकार चळवळ स्थगित का केली होती ?

## ५.४ स्वराज्य पक्ष

असहकार चळवळ अचानक बंद पडल्याने स्वराज्यप्राप्तीसाठी जनतेने उभारलेले आंदोलन, त्यांचा उत्साह ओसरत चालला होता त्यामुळे लवकरात लवकर दुसरे आंदोलन उभारुन जनतेला कार्यप्रवण करणे काही नेत्यांना महत्वाचे वाटत होते. देशबंधू, चित्तरंजन दास यांनी तुरुंगातुन सुटून येताच कायदेमंडळ प्रवेशाबद्दल काँग्रेसमध्ये चर्चा सुरु केली. त्यांच्या या धोरणाला मोतीलाल नेहरू, हकीम अजमलखान, विठ्ठलभाई पटेल यांचा पाठींबा मिळाला पण इतर नेत्यांनी विरोध केला. दास व त्यांच्या गटाने १९२३ मध्ये स्वराज्य पक्षाची स्थापना केली. या पक्षाचे अध्यक्ष चित्तरंजन दास व सचिव मोतीलाल नेहरू हे होते.

मार्च १९२३ मध्ये अलाहाबाद येथे स्वराज्यपक्षाचे आधिवेशन भरले त्यामध्ये स्वराज्यप्राप्त करणे, विधी मंडळात प्रवेश करुन तेथे सरकारला असहकार करणे, निवडणूकीत भाग घेऊन लोकजागृती करणे, सरकारच्या जनहिताच्या योजना राबविणे ही उद्दिष्ट्ये ठरवण्यात आली १९२३च्या निवडणूका जाहीर होताच दिल्ली आधिवेशनात काँग्रेसने स्वराज्य पक्षाला पाठींबा जाहीर केला. केंद्रीय व प्रांतीक कायदेमंडळाच्या निवडणूका होऊन स्वराज्य पक्षाला लक्षणीय विजय मिळला. मध्य प्रांतात स्पष्ट बहूमत मिळाले, बंगालमध्ये इतर पक्षांपेक्षा आधिक जागा मिळाल्या. मुंबई, आसाममध्ये बरेच सदस्य निवडून आले. केंद्रीय कायदेमंडळातील १०५ पैकी ४१ जागा स्वराज्य पक्षाला व २४ जागा स्वतंत्र उमेदवारांना मिळाल्या.

केंद्रीय कायदेमंडळात बहुमत नसल्याने स्वराज्य पक्षाने संयुक्त आघाडी स्थापन केली. कायदेमंडळाच्या पहिल्या सत्रापासून स्वराज्य पक्ष व सरकार यांच्यात विरोधाच्या फैरी झडू लागल्या. १९२४ ते १९२७च्या काळात स्वराज्य पक्षाने सरकारचे अनेक ठराव व आर्थिक विधेयके उधळून लावली पण सरकार विशेष अधिकार वापरुन ही विधेयके मंजूर करुन घेई.

१६ जून १९२५ रोजी स्वराज्य पक्षाचे मुख्य संस्थापक चित्तरंजन दास यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्युने स्वराज्य पक्षाचा आधारस्तंभ कोसळला व पक्षाच्या राजकीय कार्याला उतरती कळा लागली. पक्षाची सर्व जबाबदारी एकट्या मोतीलाल नेहरूंवर पडली व ते चोहोकडून होणाऱ्या विरोधास तोंड देऊन पक्षाचे स्वतंत्र आस्तित्व टिकवू शकले नाही. १९२५ पासून गांधीजींची लोकप्रियता वाढत गेली. त्यामुळे १९२६ मध्ये पक्षाचे आस्तित्व संपुष्टात आले. स्वराज्य पक्षाचे कार्य जेमतेम तीनच वर्षाचे असले तरी असहकार चळवळीनंतर निर्माण झालेली पोकळी या पक्षाने भरुन काढली. कायदेमंडळातील सरकारच्या धोरणांची जनतेला सतत माहिती देऊन मोठ्या प्रमाणात लोकजागृती चालू ठेवली. सरकारच्या दडपशाहीचे धोरणलोकांना कळून स्वातंत्र्याची इच्छा नष्ट होऊ शकली नाही म्हणूनच स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात स्वराज्य पक्ष महत्वाचा मानला जातो.

**आपली प्रगती तपासा :**

१) 'स्वराज्य' पक्षावर टीप लिहा.

---

---

---

---

---

## ५.५ सविनय कायदेभंग चळवळ

### ५.५.१.पार्श्वभूमी :

१९१९ च्या सुधारणा कायद्यात या कायद्याच्या अंमल बजावणिची पाहणी करण्यासाठी १० वर्षानंतर एक शासकीय समितीची नियुक्ती करण्याची तरतुद होती. भारताच्या शासकीय कारभाराची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल पार्लमेंटला सादर करण्याचे काम एका संसदीय समितीकडे सोपवण्यात आले. या समितीत सात सदस्य होते व त्याचे अध्यक्षपद सर जॉन सायमन याच्याकडे देण्यात आले.

या समितीचे भारतात स्वागत होण्याऐवजी मोठा विरोध झाला कारण या समितीच्या सर्वच्या सर्व सात सदस्य युरोपियन असुन एकही भारतीय प्रतिनीधी नव्हता. भारतीय नेत्यांनी या कमिशनवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला ३ फेब्रुवारी १९२८ रोजी कमीशनचे मुंबईत आगमन झाले. त्या दिवसापासून ते कमिशन परत जाई पर्यंत बहिष्कार मोहीम चालू राहिली. कमिशनच्या विरुद्ध सभा, मोर्चे, हरताळ सुरू झाले. 'सायमन गो बॅक' अशा घोषणा देत कमिशनला सगळीकडे काळे झेंडे दाखवले गेले. सरकारने अनेक ठिकाणी लाठीमार व गोळीबार केले. लाहोरमध्ये झालेल्या लाठीमारात लाला लजपतराय यांचा प्राण घेतला तर लखनौमध्ये नेहरूंना लाठ्या खाव्या लागल्या. १९३० मध्ये सायमन कमिशनने आपला अहवाल पार्लमेंटला सादर केला त्यांच्या शिफारसी भारतीयांनी फेटाळून लावल्या.

काँग्रेस, मुस्लिम लीग, हिंदू महासभा या राजकीय संघटनांची सर्वपक्षीय परिषद डॉ.अन्सारी यांच्या अध्यक्षतेखाली १९मे १९२८ रोजी भरवण्यात आली. हिंदूस्थानची भावी घटना ठरविण्यासाठी यावेळी मोतीलाल नेहरुंच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीने मोठे परिश्रम घेऊन आपला सर्वमान्य अहवाल तयार केला यालाच नेहरु रिपोर्ट असे म्हणतात. या रिपोर्टमध्ये पहिल्या टप्यात भारताला साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळावे व दुसऱ्या टप्यात पूर्ण स्वातंत्र्य मिळावे अशी मागणी करण्यात आली. जातीय मतदारसंघ व स्वतंत्र मतदारसंघांना विरोध करण्यात आला. या रिपोर्टवर चर्चा करण्यासाठी २२ डिसेंबर १९२८ रोजी सर्वपक्षीय सभा कलकत्ता येथे भरली. मुस्लिम लीग स्वतंत्र मतदारसंघ सोडण्यास तयार नसल्याने जिनांनी काही उपसुचना सूचविल्या पण त्या बहुमताने फेटाळण्यात आल्या. त्यामुळे संतापलेल्या जिनांनी नेहरु रिपोर्टवर बहिष्कार घातला.

मार्च १९२९ मध्ये मुस्लिम लीग आधिवेशनात लीगला नेहरु रिपोर्ट मान्य नसल्याचे जाहीर करुन मुस्लिमांना राजकीय आधिकारांच्या दृष्टीने बॅ. जीनांनी १४ मुद्यांची एक यादी प्रसिद्ध केली यानंतर जिनांचा राजकीय मार्ग पूर्णपणे बदलला व्यापक राष्ट्रवादी विचारांचे जिना संकूचित जातीय भूमिकेवरच मुस्लिम लीगचे नेतृत्व करु लागले.

### ५.५.२ कायदेभंग चळवळीची घोषणा:

२ जानेवारी १९३० रोजी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक झाली. यावेळी २६ जानेवारी १९३० हा दिवस संपूर्ण देशभर स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्याचे आवाहन करण्यात आले. त्यानुसार लाखो लोकांनी स्वातंत्र्यदिन कार्यक्रमात भाग घेतला. २६ जानेवारीला

अविष्कृत झालेला जनतेतील असीम उत्साह गांधीजी बारकाईने पाहत होते. सविनय कायदेभंगाची राष्ट्रव्यापी चळवळ सुरु करण्यास वातावरण अनुकुल असल्याचे त्यांना आढळून आले.

अशावेळी गांधीजींनी लॉर्ड आयर्विन यांना पत्र पाठवून त्यात भारतीयांच्या वतीने अकरा मागण्या केल्या व त्या मागण्या सरकारने पूर्ण केल्यास चळवळीचा संकल्प सोडून देण्याची तयारी दाखवली. या पत्रात पूर्णतः मद्यबंदी, महसूलात ५० टक्के घट करावी, मीठावरील कर रद्द करावा, संरक्षण खात्यावरील खर्चात ५०टक्के घट केली जावी, परदेशी कापडावर आयात कर लावला जावा, भारतीयांना स्वसंरक्षणासाठी शस्त्र बाळगण्याची परवानगी असावी, राजकीय बंद्यांची मुक्तता केली जावी या मागण्यांचा समावेश होता.

गांधीजींच्या या मागण्या आयर्विनने फेटाळल्या त्यानंतर लगेच साबरमती आश्रमात कार्यकारिणीची बैठक झाली. त्यात महत्वाचे निर्णय घेतले गेले. राष्ट्रीय स्तरावर सविनय कायदेभंग चळवळ सुरु करायची व त्याची सुरुवात गांधीनी करावी हा निर्णय घेतला गेला. ही चळवळ केवळ काँग्रेसची नव्हे तर जनतेची असावी, नेत्यांना अटक झाली तरी सामान्य जनतेने आंदोलन चालू ठेवावे, ही चळवळ अहिंसक मार्गाने करावयाची असली तरी यदा कदाचित चळवळीच्या दरम्यान एखादी हिंसक घटना घडली तर १९२२ सालाप्रमाणे चळवळ मागे घेतली जाणार नाही हे आश्वासन गांधीजींनी दिले. १४फेब्रुवारी १९३० रोजी सविनय कायदेभंगाचा आदेश जनतेला देण्यात आला.

### ५.५.३ चळवळीचा प्रारंभ व दांडी यात्रा :

सर्वांनाच गरजेचे असलेल्या मीठावर सरकारने कर लादला होता म्हणून गांधीजींनी मीठाचा सत्याग्रह करुन कायदेभंग चळवळ सुरु करण्याचे ठरविले व त्यासाठी समुद्रकिनाऱ्यावरील दांडी हे ठिकाण निवडले. गांधींच्या या निर्णयाने मीठ या शब्दाला अचानक आगळे-वेगळे सामर्थ्य प्राप्त झाले. गांधींच्या या निर्णयाने नेहरु,सुभाषचंद्र बोस यासारखे नेते प्रभावित झाले.

१२मार्च १९३० रोजी गांधीजी ७५ अनुयायांसह साबरमती आश्रमातून दांडीयात्रेसाठी निघाले. याआधी गावोगावी कायदेभंगाचा प्रचार करणाऱ्या वल्लभभाई पटेलांना सरकारने अटक केल्यामुळे गुजरातमधील जनता संतप्त झाली होती त्यामुळे शेकडो लोकांनी या चळवळीत भाग घेतला. साऱ्या जगाचे लक्ष गांधीजींच्या दांडीयात्रेकडे लागले होते. रस्त्यारस्त्यात या यात्रेचे स्वागत केले गेले व हजारो लोकं त्यात सामील झाले. सुमारे २४१ मैलाचे अंतर २४ दिवसात कापून ५ एप्रिल रोजी गांधीजी दांडी येथे पोहोचले. ६ एप्रिल रोजी

दांडीच्या किनाऱ्यावर मीठ उचलून गांधीजींनी कायदेभंगाची घोषणा केली. याबरोबर संपूर्ण भारतात कायदेभंग चळवळीला जोमाने सुरुवात झाली.

### ५.५.४ चळवळीचा प्रसार :

जेथे मीठाचा कायदा मोडणे शक्य नव्हते तेथे इतर कायदे मोडण्याचे तंत्र कार्यकर्त्यांनी अवलंबिले. गांधींचा जनमनावरील प्रभाव लक्षात घेऊन सरकारने दांडी येथे त्यांना हात लावला नाही परंतु देशात इतरत्र चळवळीचा कणा मोडण्याच्या हिशोबाने जवाहरलाल नेहरु, सरदार पटेल इ. अनेक नेत्यांना मात्र अटक करण्यात आली. सुरत जिल्ह्यातील धारासना येथे जाऊन कायदेभंग करण्याचा मनोदय १ मे रोजी गांधींनी आयर्विन यांना कळवताच गांधीजींना अटक करण्यात आली. या दडपशाहीमुळे लोकं अधिकच खवळले. सभा, मिरवणूका, हरताळ, बहिष्कार, कायदेभंग यांना उधाण आले. गांधींच्या अटकेनंतर धारासना मीठागरापुढे सत्याग्रह करण्याची सूत्रे सरोजिनी नायडू यांनी हाती घेतली. पंचवीसशेहून अधिक स्वयंसेवकांनी यात भाग घेतला. सत्याग्रहात सहभागी होणाऱ्या स्वयंसेवकांना धारासना येथे पोचता येऊ नये म्हणून धारासनाकडे येणारे मार्ग सरकारने रोखून धरले तरीही सत्याग्रहाच्या दिवसापर्यंत तीन हजार लोकं धारासनात येऊन थडकले. २२मे रोजी सकाळी सत्याग्रहींची पहिली तुकडी शांतपणे व शिस्तीत मिठागराकडे निघाली. ते मीठागरावर पोहोचताच पोलीस लाठ्या-काठ्या घेऊन त्यांच्यावर तुटून पडले. अनेक सत्याग्रही रक्तबंबाळ होऊनही खाली पडत नव्हते. पण शेवटचा सत्याग्रही खाली पडेपर्यंत स्वसंरक्षणासाठी हात न उचलता सत्याग्रही पुढे येत होते. शेवटी दुपारी एकच्या सुमारास सत्याग्रही मीठागरावर पोहोचले. सरोजिनी नायडू, अली इमाम, मणीलाल गांधी यांना अटक झाली.

मुंबईत वडाळा येथील मीठागराच्या जागी पंधरा हजार सत्याग्रहींनी मीठाचा कायदा मोडला त्यांच्यावर भीषण लाठीमार झाला. वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या पद्धतीने कायदे तोडण्यात आले. कोठे करबंदीची चळवळ झाली, कोठे जंगल सत्याग्रह झाले, कोठे परकीय मालावर बहिष्कार व त्यांची सामुहिक होळी झाली. सत्याग्रहींचे लोण खेडोपाडी पसरले होते. काँग्रेसचे आघाडीचे नेते तुरुंगात डांबले गेल्यानंतर चळवळीचे नेतृत्व करण्यास प्रांतिक व जिल्हा स्तरावरील कार्यकर्ते पुढे सरसावले. या चळवळीला मुंबईच्या गिरणीमालकांनी व व्यापाऱ्यांनीही आर्थिक मदत केली. या चळवळीत मोठ्या प्रमाणात महिलांनीही भाग घेतला. मुंबईत ८०पैकी ४६ गिरण्या बंद ठेवण्यात आल्या.

वायव्य सरहद्द प्रांतात लढाऊ पठाणांनी या चळवळीत भाग घेतला. खान अब्दुल गफारखान हे गांधीजींच्या सत्याग्रह तत्वज्ञानाने प्रभावित झाले होते त्यांनी अहिंसक मार्गाने लढण्यास तयार असलेल्या पठानांची एक शिस्तबद्ध संघटना उभारली तिला ‘खुदाई खिदमतगार हे नाव दिले. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना सरहद्द गांधी असे म्हटले जाऊ लागले.

१२ डिसेंबर रोजी मुंबईच्या काळबादेवी मार्गावर बाबू गेनू नावाच्या तरूणाने परदेशी मालाने भरलेल्या ट्रकखाली आत्मबलीदान केले त्यामुळे चळवळ अधिकच वाढली. १९२० सालच्या असहकार चळवळीपेक्षा १९३०ची कायदेभंग चळवळ अधिक व्यापक व परिणामकारक ठरली. या चळवळीमुळे सरकारचे कराचे उत्पन्न व ब्रिटीश मालाची आयात घटली. बिहार, बंगाल, ओरिसा, मुंबई, संयुक्त प्रांत येथे बहिष्कार चळवळ जोमात होती. खादीची विक्री वाढली. प्रचंड दडपशाही करुनही चळवळ आटोक्यात येत नव्हती. भारतातील चिघळत चाललेली परिस्थिती पाहून भारतीयांची गोलमेज परिषद घेण्याची घोषणा आयर्विनने केली.

### ५.५.५. पहिली गोलमेज परिषद (१९३०-३१) :

१२ नोव्हेंबर १९३० रोजी ही परिषद लंडन येथे पंतप्रधान मॅक्डोनोल्डच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. या परिषदेच्या बैठकी १९ जानेवारी १९३१ पर्यंत चालू होत्या. या परिषदेत ८९ प्रतिनिधींनी भाग घेतला. त्यापैकी १६ प्रतिनिधी ब्रिटीश सरकारचे, १६ प्रतिनिधी देशी संस्थानिकांचे व ५७ प्रतिनिधी हे भारतातील विभिन्न पक्षांचे होते. कॉंग्रेसने बहिष्कार टाकल्याने कॉंग्रेसचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नव्हते. परिषदेत भाग घेणारे भारतीय प्रतिनिधी हे जनतेद्वारे निवडलेले नव्हते तर व्हाईसरॉयने नेमलेले होते. त्यामध्ये सर तेजबहादूर सप्रू, श्रीनिवास शास्त्री, डॉ.मुंजे, डॉ.आंबेडकर हे होते. मुस्लिम, ख्रिश्चन, अँग्लोइंडीयन अशा अल्पसंख्यांकानी भाग घेतला. डॉ. आर.सी.मुजुमदार या सर्व प्रतिनिधींचे वर्णन करतांना म्हणतात, कॉंग्रेस सोडून लंडनला निघालेले भारतीय प्रतिनिधी म्हणजे जणू नवऱ्या मुलाखेरीज लग्नासाठी निघालेले वऱ्हाड होते.

या परिषदेत जे निर्णय घेतले गेले त्यामध्ये ब्रिटीश इंडीया व संस्थाने यांचे संघराज्य स्थापन करावे, संघराज्याचे कार्यकारी मंडळ कायदेमंडळाला काही प्रमाणात जबाबदार ठेवावे पण खास आधिकार सरकारच्याच ताब्यात राहणार होते, द्विदल राज्यपद्धती रद्द करुन त्याजागी प्रांतांना स्वायतत्ता द्यावी हे निर्णय घोषीत केले परंतु जातीय प्रश्नावर एकमत होऊ शकले नाही. कॉंग्रेस सहभागी न झाल्याने या

munotes.in

परिषदेला फारसे महत्व प्राप्त झाले नाही त्यामुळे सरकारला कॉंग्रेसच्या सहकार्याची आवश्यकता वाटू लागली.

### ५.५.६ गांधी-आयर्विन करार :

पुढील गोलमेज परिषद यशस्वी व्हावी यासाठी ब्रिटीश सरकारने २६ जानेवारी १९३१ रोजी गांधींसह सर्व काँग्रेस सदस्यांची कैदेतून सुटका केली. ६ फेब्रुवारी रोजी मोतीलाल नेहरुंचे निधन झाले. या दुःखातुन बाहेर पडल्यावर गोलमेज परिषदेची चर्चा काँग्रेसमध्ये सुरु झाली. सप्रु. जयकर, श्रीनिवासन शास्त्री, मालवीय यांनी फुटीर गटांना आळा घालण्यासाठी काँग्रेसने दुसऱ्या गोलमेज परिषदेला उपस्थित राहणे आवश्यक असल्याचे गांधीजींनी सांगितले. व्हाईसरॉय आयर्विनदेखील काँग्रेसशी वाटाघाटी करण्यास उत्सुक होते त्यातून १७ फेब्रुवारी १९३१ रोजी दिल्ली येथे गांधी-आयर्विन यांच्यातील वाटाघाटींना सुरुवात झाली यानंतर उभयतांत करार होऊन ५ मार्च रोजी गांधीजींनी त्यावर स्वाक्षरी केली या करारात पुढील कलमे होती.

१. राजकीय कैद्यांची सुटका व्हावी
२. मीठावरील कर काही प्रमाणात कमी करावा
३. आंदोलकांची जप्त केलेली मालमत्ता सरकारने परत करावी
४. कायदेभंग चळवळ व बहिष्कार मागे घ्यावा.
५. काँग्रेसने दुसऱ्या गोलमेज परिषदेला उपस्थित रहावे.
६. अल्पसंख्यांकांना संरक्षण द्यावे.

### ५.५.७दुसरी गोलमेज परिषद (१९३१-३२) :

गांधीजींनी आयर्विन यांच्याशी केलेला हा करार नेहरु, बोस यासारख्या नेत्यांना पटला नाही. सुभाषचंद्रांनी तर हा करार मान्य करणे म्हणजे सरकारपुढे शरणागती पत्करणे होय असे म्हणून आपला राग व्यक्त केला परंतु गांधीजींनी बलशाली शासनापुढे दिर्घकाळ संघर्ष करणे शक्य वाटत नव्हते म्हणून त्यांनी तडजोड स्वीकारली.

दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठी काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधी म्हणून ऑगस्ट १९३१ मध्ये गांधीजी लंडनला निघाले याचवेळी ब्रिटीश शासनात महत्वाचे बदल झाले आयर्विनच्या जागी व्हॉइसरॉय म्हणून साम्राज्यवादी विलींग्टन आला व भारतमंत्री म्हणून सर होअर यांची नेमणूक झाली. साम्राज्यवादी विलींग्टनने तर गांधी आयर्विन करार अमान्य करुन भारतात अत्याचार सुरु केले. इंग्लडमध्येही राष्ट्रीय सरकार स्थापन झाले होते. ७ सप्टेंबर १९३१ रोजी दुसरी गोलमेज

परिषद सुरु झाली. हिंदूस्थानची भावी घटना कशी असावी यावर चर्चा व्हायची होती परंतु चर्चा झाली ती जातीय प्रश्नावर कारण मुसलमान, ख्रिश्चन, अस्पृश्य, अँग्लो इंडियन यांच्या प्रतिनिधींनी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. गांधीजींनी मात्र संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली पण सरकारने या मागणीस विरोध केला संघराज्याचे न्यायालय, कायदेमंडळ या प्रश्नांवर परिषदेत तडजोड होऊ न शकल्याने गांधीजी निराश झाले. २८ डिसेंबर १९३१ रोजी ते रिकाम्या हाताने मायदेशी परतले.

### ५.५.८. चळवळीचा दुसरा टप्पा व सरकारची दडपशाही :

महात्मा गांधी हिंदूस्थानात येताच त्यांच्या कानावर सरकारच्या अत्याचाराच्या बातम्या आल्या. त्यांनी व्हॉईसरॉयला ही दडपशाही थांबविण्याची विनंती केली परंतु व्हाईसरॉयने ऐकले नाही. शेवटी गांधीजींनी १ जानेवारी १९३२ रोजी कायदेभंग चळवळ पुन्हा सुरु करण्याचा निर्णय घेतला. त्याआधीच सरकारने नेहरु, खान अब्दुल गफारखान, शेरवानी या नेत्यांना अटक केली होती. ३ जानेवारीला चळवळ सुरु झाली व दुसऱ्याच दिवशी गांधीजींनी अटक करुन येरवडा तुरुंगात टाकले. सरदार पटेल, डॉ.राजेंद्रप्रसाद, डॉ. अन्सारी व इतर लहान पुढाऱ्यांनाही अटक झाली. १ लाख २० हजार लोक तुरुंगात डांबले गेले, कॉंग्रेस संघटना बेकायदेशीर ठरवली गेली. दहा अध्यादेश काढून मॅजीस्ट्रेटला व पोलीसांना अमर्याद अधिकार दिले गेले. कार्यकर्त्यांचा छळ करणे, त्यांची मालमत्ता जप्त करणे, वृत्तपत्रांवर बंदी, संपूर्ण खेड्यावर दंड आकारणे, लोकांना मारहाण, गोळीबार करणे अशी सरकारची दडपशाही वाढत गेली पण या दडपशाहीची जनतेला सवय झाली होती.

### ५.५.९ जातीय निवाडा व पुणे करार :

कायदेभंग चळवळ सुरू असतांनाच इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांनी १६ऑगस्ट १९३१ रोजी जातीय निवाड्याचा निर्णय जाहीर केला. त्यानुसार ज्या प्रांतात मुसलमान अल्पसंख्य होते तेथे त्यांना स्वतंत्र प्रतिनिधीत्व, ख्रिश्चन, अँग्लो इंडीयन व युरोपियनांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणावरुन प्रतिनिधीत्व मिळाले, अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ तसेच सर्वसामान्य मतदारसंघामध्ये मतदान करण्याचा हक्कही मिळाला.

या जातीय निवाड्यात दलीत जाती-जमातींना विभक्त मतदारसंघ देऊन हिंदू समाजात फुट पाडण्याच्या डावामुळे गांधीजी अस्वस्थ झाले. त्यांनी याला विरोध करुन २० सप्टेंबर १९३२ पासून आमरण उपोषण सुरु केले. यावेळी गांधीजी पुण्यातील येरवडा तुरुंगात

होते. हिंदू समाज एकसंघ रहावा यासाठी गांधीजी प्राण पणाला लावण्यास सिद्ध झालेले पाहून राष्ट्रीय पुढाऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली व त्यांनी हालचाल सुरु केली. चुन्नीलाल मेहता, धनश्यामदास बिर्ला यांनी गांधींना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला तर मदनमोहन मालवीय यांनी दोन्ही नेत्यांशी बोलणी सुरु केली. अखेरीस सर्व नेत्यांना आंबेडकरांचे मन वळवण्यात यश आले. आंबेडकर स्वतंत्र मतदारसंघाचा आग्रह सोडण्यास तयार झाले. २५ सप्टेंबर रोजी गांधी व आंबेडकर यांच्यात पुणे करार झाला त्यानुसार जातीय निवाड्यातून दलीतांच्या विभक्त मतदारसंघाचे कलम रद्द करण्याचे मान्य केले गेले. सरकारनेही या कराराला मान्यता दिली. स्वतंत्र मतदाररसंघाऐवजी दलीतांना कायदेमंडळात राखीव जागा वाढवून देण्यात आल्या. २६ सप्टेंबर रोजी गांधीजींनी उपोषण सोडले.

### ५.५.१० तिसरी गोलमेज परिषद (१९३२) :

पुणे करारानंतर म. गांधींनी हरिजन सेवकसंघाची स्थापना करुन हरिजन उद्धाराची चळवळ सुरु केली कायदेभंग चळवळीचा जोर कमी होत गेला. या दरम्यान लंडनला १७ नोव्हेंबर ते २४ डिसेंबर १९३२ या काळात तिसरी गोलमेज परिषद पार पडली. या परिषदेला काँग्रेसचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. सरकारशी एकनिष्ठ असलेले ४६ प्रतिनिधीच उपस्थित होते. या परिषदेत मांडण्यात आलेल्या विषयावरील चर्चा निर्णायक स्वरूपाची झाली नाही. परिषदेतील प्रतिनिधींची संख्या व त्यांच्या विचारप्रणालीचे स्वरूप पाहता तसे होणे शक्यही नव्हते पण तेवढे निमित्त करुन परिषदेतील चर्चा फलद्रुप न झाल्यामुळे विशेष समित्यांच्या अहवालांच्या आधारे ब्रिटीश सरकार भारताच्या भावी राज्यघटनेचा मसुदा तयार करेल असे सांगून ही परिषद संपल्याची घोषणा ब्रिटीश सरकारने केली.

**★ आपली प्रगती तपासा.**

१) पुणे करारावर थोडक्यात टीप लिहा.

munotes.in

# ५.६ चले जाव किंवा भारत छोडो आंदोलन

### ५.६.१ प्रस्तावना :

इ.स. १९३९ साली काँग्रेसमध्ये तीव्र तात्विक मतभेद होऊन फूट पडली. सुभाषचंद्र बोस हे जहाल गटाचे तरुण नेते काँग्रेसबाहेर पडले. याचवेळी युरोपातील राजनैतीक तणाव कळसाला पोहोचला होता. ३ सप्टेंबर १९३९ रोजी इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा केली आणि दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली. त्याच दिवशी भारताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड लीनलिथगो यांनी भारतही युद्धात सामील झाल्याची घोषणा केली त्यामुळे काँग्रेसपुढे मोठा पेचप्रसंग निर्माण झाला. इंग्लंडने आपले युद्धहेतू आणि भारताबाबतची आपली भूमिका स्पष्ट केल्याशिवाय इंग्लंडच्या युद्धकार्याला पाठींबा देऊ शकणार नाही असा ठराव काँग्रेसने पास केला. काँग्रेसच्या या पावित्र्यामुळे ब्रिटीश शासनाने १७ ऑक्टोबर १९३९ रोजी भारताविषयीचे धोरण घोषित केले.त्यात भविष्यात भारताला वासाहतिक स्वराज्य दिले जाण्याचा पुनरुच्चार केला. या आक्टोबर घोषणेला काँग्रेसने विरोध केला. २२ ऑक्टोबर रोजी ब्रिटीश धोरणाचा निषेध म्हणून केंद्रीय व प्रांतिक कायदेमंडळातील काँग्रेस सदस्यांनी राजीनामे देण्याचा ठराव पास केला त्याप्रमाणे आठही प्रांतातील काँग्रेस मंत्री मंडळांनी राजीनामे दिले.

भारताला युद्धसमाप्तीनंतर स्वातंत्र्य देण्याची घोषणा सरकारने केली तर इंग्लंडच्या युद्धकार्यास काँग्रेस पाठींबा देईल असा ठराव काँग्रेसने करताच गव्हर्नर जनरलने ८ ऑगस्ट १९४० रोजी एक घोषणा केली पण या घोषणेत स्वराज्याचा उल्लेख नव्हता. अशा तणावाच्या परिस्थितीत गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रहाची घोषणा केली. वैयक्तिक सत्याग्रह सुरु करणारे पहिले सत्याग्रही जवाहरलाल नेहरु होते, त्यांना चार वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली, डिसेंबर१९४१ पर्यंत २६ हजार सत्याग्रहींना अटक झाली. दुसऱ्या महायुद्धकाळात भारताचे सहकार्य मिळवण्यासाठी भारताला इंग्लंडने स्वराज्याचे आश्वासन द्यावे अशी अमेरिकेने सूचना केली. भारतातील राजकीय पेच सोडवून भारतीयांचे सहकार्य मिळवण्यासाठी इंग्लंडचे पंतप्रधान चर्चीलने सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना भारतात पाठवले. २३ मार्च १९४२ रोजी क्रिप्स यांना भारतात पाठवले. २३ मार्च १९४२ रोजी क्रिप्स भारतात आले विविध नेत्यांशी चर्चा करुन त्यांनी आपली योजना जाहीर केली त्यात युद्धानंतर भारताला वासाहतिक स्वराज्य देण्याचे आश्वासन, भारतीयांना भारताची राज्यघटना बनविण्याचा

अधिकार देण्याचे मान्य केले परंतु घटनासमितीत सामील न होण्याची प्रांतांना व संस्थानिकांना मुभा दिल्याने काँग्रेसने ही योजना फेटाळली.

क्रिप्स योजना अपयशी ठरल्याने देशाच्या राजकीय प्रगतीचा मार्ग बंद झाला व देशामध्ये निराशेचे वातावरण पसरले. या वातावरणाला छेद देण्यासाठी गांधीजी पुढे सरसावले.

### ५.६.२ चले जावचा ठराव :

शत्रू भारताच्या सीमेवर उभा ठाकला असतांना भारताच्या संरक्षणाचे सामर्थ्य राज्यकर्त्यात नसल्यामुळे त्यांनी तत्काळ देश सोडून चालते व्हावे, ब्रिटीशांनी भारत सोडला तर जपानी आक्रमणाचा धोका भारताला राहणार नाही असे रोखठोक उद्गार गांधींनी काढले. ब्रिटीशांनी भारत सोडून जाणे त्यांना निकडीचे वाटत असल्याचा सूर त्यांच्या सर्व लिखाणातून मांडला गेला. ते स्वेच्छेने गेले तर ठीक, नाहीतर भारतीयांनी त्यांना घालवून देण्यासाठी चळवळ करावी असेही मत त्यांनी मांडले त्यांच्या या विचाराला ‘छोडो भारत हे घोषणारुप पुढे मिळाले.

६ जुलै १९४२ रोजी वर्धा येथील काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत चले जावचा ठराव एकमताने पास झाला. या बैठकीतील ठरावावर मुंबईला ७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या खुल्या अधिवेशनात शिक्कामोर्तब व्हायचे होते. त्यानुसार ७ ऑगस्ट रोजी मुंबईला आधिवेशन सुरु झाले. मौलाना आझाद हे अध्यक्षस्थानी होते त्यांच्या व गांधीजींच्या भाषणानंतर नेहरूंनी छोडो भारताचा ठराव मांडला त्यास पटेलांनी अनुमोदन दिले ८ ऑगस्ट रोजी हा ठराव बहुमताने पास झाला त्यानंतर ७३ वर्षाच्या गांधींनी सुमारे दोन-अडीच तास ओजस्वी भाषण केले. ह्या क्षणापासून सर्व भारतीयांनी आपण स्वतंत्र झालो आहोत असे समजावे आणि करेंगे या मरेंगे या निर्धाराने चळवळ चालवावी असा मंत्रही दिला.

### ५.६.३ शासनाची कडक कारवाई :

काँग्रेसचा कार्यक्रम जनतेपर्यंत पोचण्यापूर्वीच चळवळीच्या मुळावरच आघात करणाचा सरकारचा निर्धार होता त्याप्रमाणे ९ तारखेला पहाट होण्यापूर्वीच सरकारने देशात धरपकडीचे सत्र सुरु केले. मुंबई शहरात एकाच वेळी साठ पोलीस पथकांनी नेत्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना अटक केली. गांधींना पुण्याच्या आगारवान पॅलेसमध्ये तर नेहरू, पटेल, आझाद यांना अहमदनगरच्या

तुरुंगात स्थानबद्ध करण्यात आले. कॉंग्रेसचे काही प्रांतीक नेते भारत छोडोचा संदेश घेऊन आपल्या गावी परतत असतांना त्यांना वाटेतच अटक करण्यात आली. अटकेचे हे सत्र प्रांतिक व तालुका स्तरापर्यंत चालविण्यात आले.

नेत्यांच्या धरपकडीबरोबरच इतरही सर्व दमनमार्ग सरकारने अवलंबिले. काँग्रेसवर व काँग्रेसशी संलग्न असलेल्या सर्व संघटनांवर बंदी घालण्यात आली. त्यांची मालमत्ता जप्त करुन त्यांच्या कार्यालयांना कुलुपे ठोकण्यात आली. सभा, मोर्चे, निरोधने, भाषणे यावर बंदी घातली गेली, वत्तपत्रांवरील निर्बंध आधिक कडक करण्यात आले. याशिवाय सभा व मिरवणूकांवर लाठी, हल्ले, गोळीबार, संशयितांच्या घरावर धाडी, निरपराध लोकांनाही संशयावरुन मारहाण असे दडपशाहीचे सर्व मार्ग सरकारने अंगिकारले.

### ५.६.४ चळवळीची व्याप्ती व स्वरुप :

सर्व नेत्यांना अटक झाल्याची बातमी समजताच लोकांचा संताप अनावर झाला. ३ ऑगस्ट रोजी नेतृत्वहीन जनतेच्या उत्स्फुर्त उठावांनी आंदोलनाला प्रारंभ झाला. सर्व मोठ्या शहरातून निदर्शने झाली, मोर्चे निघाले, निषेधपर सभा झाल्या, मोठ्या औद्योगिक केंद्रातील कामगार संपावर गेले. महाविद्यालयीन तरुण-तरुणीच नव्हे तर शाळकरी मुलेही हातात तिरंगा फडकवित चले जावच्या घोषणा देत रस्तोरस्ती मिरवणूका काढतांना दिसू लागली. महिला मोठ्या संख्येने सक्रिय होत्या. पोलीसांवर, त्यांच्या वाहनांवर, सरकारी कार्यालयांवर दगडफेक करणे, पोलीस वाहनांना अडवायला रस्तोरस्ती दगड व लाकडे आणून ठेवणे, सरकारी इमारतींवर तिरंगा लावणे, भारतीय शासकीय आधिकाऱ्यांना गांधी टोप्या घालायला लावणे अशा मार्गांचा अवलंब लोकं करु लागले. पोलीस येण्याचा सुगावा लागला की लोकं लपून बसत व ते जाताच आक्रमक कारवायांसाठी बाहेर पडत. ही लाट ग्रामीण भागातही पसरली, भिंती भिंतीवर चले जाव घोषणा झळकू लागल्या. शेतकरी व आदिवासीही या लढ्यात उतरले.

ह्याच काळात चांदा जिल्ह्यातील चिमूर या गावी घडलेले प्रकार अतिशय गाजला. १२ ऑगस्ट रोजी तेथे शांततेने निदर्शने झाली. पोलीसांनी केलेल्या गोळीबारात काही लोकं जखमी होताच जमाव खवळला व त्यांनी प्रतिहल्ला चढविला त्यात काही अधिकारी व पोलीस ठार झाले. याचा बदला घेण्यासाठी सरकारने लष्कर पाठवले तेव्हा सैनिकांनी जनतेवर, स्त्रिया व मुलांवरही पाशवी अत्याचार करुन

संपूर्ण गाव उद्धस्व केले. याचे पडसाद मध्यप्रांत व मुंबई प्रांतात सर्वत्र उठले.

९ ऑगस्टच्या सुमारास पोलीसांच्या हातावर तुरी देऊन अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफल्ली, डॉ. राममनोहर लोहिया, सुचेता कृपलानी हे कार्यकर्ते भूमिगत झाले त्यांनी एक मध्यवर्ती समिती स्थापन करुन गुप्तपणे कार्य करण्यास सुरुवात केली. डॉ. लोहियांच्या प्रेरणेने काही तरुणांनी एकत्र येऊन मुंबईच्या चौपाटीजवळ एका इमारतीत प्रक्षेपण केंद्र स्थापन केले तेथून भूमिगत नेत्यांची भाषणे प्रक्षेपित होऊ लागली. जयप्रकाश नारायण हजारिबाग तुरुंगातून फरार होऊन भूमिगत नेत्यांना येऊन मिळाले सरकारी यंत्रणा बेकाम करण्याच्या दृष्टीने टेलीग्राफचे खांब व तारा तोडणे, पुल उडवणे, रेल्वेमार्गावरील फिशप्लेटस् काढणे, जिल्हा व तालुका स्तरावरील सरकारी कार्यालयांवर हल्ले करुन त्यांचा ताबा घेणे, स्फोटक द्रव्ये वापरुन बॉंब तयार करणे इ. घातपाती कृत्ये भूमिगत नेत्यांनी तरुणांच्या सहाय्याने सुरु केली शस्त्राचा वापर करुन सरकारला त्रस्त करण्यासाठी ‘आझाद दस्ते तयार करण्यात आले. त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्यासाठी नेपाळच्या सीमेनजीक प्रशिक्षक केंद्रे चालवली गेली. बिहारचे नित्यानंद सिंग हे या केंद्राचे प्रमुख होते. बिहार, आसाम, गुजराथ, बंगाल वगैरे प्रांतातून पिस्तुले, हातबॉंब, बंदुका तयार करण्याचे लहान लहान कारखाने सुरु झाले. सरकारी आकडेवारीनुसार १९४३च्या अखेरपर्यंत सुमारे ६६४ बॉंबस्फोट होऊन सरकारी मालमत्तेची जबरदस्त नासधूस झाली.

### ५.६.५. प्रतिसरकारची कामगिरी :

देशात काही ठिकाणी शासकीय यंत्रणा मांडून पडल्यानंतर स्थानिक लोकांनी आपली प्रतिसरकारे स्थापन करुन प्रशासनाची कामे हाती घेतली. यात प्रामुख्याने बंगालमधील मिदनापूर जिल्ह्यातील, ओरिसातील बालासोर जिल्ह्यातील, आंध्रमधील भीमावरम येथील प्रतिसरकारे लक्षणीय ठरली. मुंबई प्रांताच्या सातार जिल्ह्यातील प्रतिसरकार नेत्रदिपक ठरले. हे प्रतिसरकार चळवळीच्या ओघात जन्माला आले. सरकारच्या दडपशाहीमुळे तालुका पातळीवरील काही कार्यकर्ते भूमिगत झाले, त्यांनी वेगवेगळे गट आयोजित करुन शिस्तबद्ध पद्धतीने घातपाती कृत्ये सुरु केली. अल्पावधीतच तुरुंगातुन निसटून आलेले किसन वीर व वसंतदादा पाटील हे त्यांना येऊन मिळाले त्यांनी सरकारी खजिन्यावर व शस्त्रागारांवर धाडी घातल्या नाना पाटील हे या गनिमी युद्धाचे सूत्रधार होते, यशवंतराव चव्हाण त्यांच्याच गटात होते. उठावाच्या काळातील अराजकाचा फायदा जेव्हा गावगुंड व दरोडेखोर साताऱ्याच्या परिसरात घेऊ लागले आणि

काँग्रेसच्या नावावर जनतेला उपद्रव देऊ लागले तेव्हा त्यांचा बंदोबस्त करण्याचा निर्णय या क्रांतिवीरांनी घेतला त्यातूनच प्रतिसरकारी कल्पना जन्माला आली.

सातारा येथे स्थापन झालेले हे जनतेचे प्रतिसरकार पत्रीसरकार म्हणूनही ओळखले जाते. गुन्हेगारांचे दोन्ही पाय बांधून त्याच्या टाचेवर काठीने तडाखे मारणे ही येथे दिल्या जाणाऱ्या शिक्षेपैकी एक कठोर शिक्षा होती. या शिक्षेला स्थानिक मंडळी पत्री मारणे म्हणत म्हणून अशी शिक्षा देणाऱ्या सरकारला पत्रीसरकार असे संबोधू लागले.

वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली गावकऱ्यांनी पंचायत समित्या स्थापन केल्या त्यातून स्थानिक समस्यांचा न्यायनिवाडा होत असे, दारुचे गुत्ते बंद पाडण्यात आले, सावकारांनी शेतकऱ्यांच्या लुबाडलेल्या जमिनी लोक न्यायालयातर्फे परत करण्यात आल्या, काळ्या बाजाराला आळा घातला गेला. तुफान सेना व आझाद सेना या नावाने तरुणांची पथके स्थापन करण्यात आली. ही पथके पोलीसांवर व खबऱ्यांवर नजर ठेवणे, समाजकंटकांना अटक करणे, भूमिगत नेत्यांचे निरोप पोहोचविणे ही कामे करीत या प्रतिसरकारांचे काम १९४६ पर्यंत सुरू होते.

**आपली प्रगती तपासा.**

१) चले जाव चळवळीची वैशिष्टये स्पष्ट करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ५.७ सारांश

९ ऑगस्ट १९४२ रोजी सुरू झालेले भारत छोडो हे आंदोलन भारतीय जनतेचे ब्रिटीशांविरुद्धचे अखेरचे आंदोलन होते. शासकीय सूत्राप्रमाणे या काळात २०९६ लोकं मारले गेले, ८२५१जखमी झाले व ८४८३३ लोकांना अटक झाली परंतु हे आकडे दिशाभूल करणारे आहे. काँग्रेसच्या माहितीनुसार २५ हजार लोकं मारले गेले व १ लाखावर जखमी झाले. या चळवळीत विद्यार्थी, सर्वसामान्य महिला, शेतकरी, आदिवासी, सामान्य लोकं यांचा फार मोठा सहभाग होता. तुरुंगाची वशासकीय दमनाची भिती जनमनातून नाहिशी झाली. नेत्यांच्या प्रेरणेमुळे नव्हे तर नेत्यांच्या अनुपस्थित स्वयंप्रेरणेने जनतेने चालवलेली ही चळवळ अभूतपूर्व होती. प्रति सरकारांमुळे भारतीय लोकं उत्तम शासक होऊ शकतात हा नवा आत्मविश्वास निर्माण झाला. सरकारच्या दडपशाही विरुद्ध गांधीजींनी ९ फेब्रुवारी १९४३रोजी तुरुगातच उपोषण सुरु केले. गांधीजींची प्रकृती बिघडल्यामुळे ६ में १९४४ रोजी सरकारने त्यांची सुटका केली. जून १९४५,मध्ये काँग्रेस कार्यकारिणीच्या सदस्यांचीही मुक्तता करण्यात आली. भूमिगत नेत्यांविरुद्ध जारी करण्यात आलेले पकड वॉरंट १९४६च्या प्रारंभी मागे घेण्यात आले. या सर्व नेत्यांच्या सुटकेबरोबर भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील आंदोलनाचे पर्व मागे पडून सत्तेच्या हस्तांतरणाच्या वाटाघाटीचे पर्व सुरू झाले.

munotes.in

## ५.८ प्रश्न

(१) असहकार चळवळीचा कार्यक्रम व परिणाम स्पष्ट करा.
(२) सविनय कायदेभंग चळवळीचे टप्प्यांचे वर्णन करा.
(३) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील चलेजाव चळवळीचे योगदान स्पष्ट करा.

## ५.९ संदर्भ सूची


(१) बिपीन चंद्र व इतर, भारतीय स्वातंत्र्य लढा

(२) बिपीन चंद्र, अमलेशत्रिपाठी, बरुण डेः स्वातंत्र्याचा लढा

(३) ग्रोव्हर आणि बेल्हेकरः आधुनिक भारताचा इतिहास

(४) सुमन वैद्य व शांता कोठेकरः

१) आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०)

२) आधुनिक भारताचा इतिहास (१९२०-१९४७)

(५) सुमित सरकारः आधुनिक भारत

(६) डॉ. जयसिंगराव पवारः आधुनिक हिंदुस्तानचा इतिहास

(७) धनंजय आचार्यः आधुनिक भारत (१७५०-१९५०)


♦ ♦ ♦ ♦ ♦

munotes.in

६

# १९३५चा भारत शासन कायदा

६.० उद्दिष्टे
६.१ प्रस्तावना
६.२ सायमन कमीशन १९२७ - २८
६.३ १९३५ चा भारत शासन कायदा
६.४ १९३५ भारत शासन कायद्यातील उणिवा
६.५ सारांश
६.६ प्रश्न
६.७ संदर्भ सूची

## ६.० उद्दिष्टे

१) या घटकाच्या अध्ययनानंतर १९३५ चा कायदा संमत करण्यामागे असलेली राजकीय पार्श्वभूमीचे आकलन होणे.

२) १९३५ च्या कायदयातील तरतूदींचे आकलन होणे,

३) १९३५ च्या कायद्यातील उणीवा व त्यावर विविध जणांनी दिलेल्या प्रतिक्रिया यांचे ज्ञान होणे.

## ६.१ प्रस्तावना

भारतात सत्ता प्रस्थापित केल्यानंतर ब्रिटीशांनी सुरवातीस चार्टर ॲक्ट संमत केले. त्यानंतर १८६१ च्या कौन्सिल ॲक्टनुसार भारतीय प्रशासन व्यवस्थेत महत्वाचे बदल केले. १९०९ च्या मिंटो मोर्ले कायद्यानुसार भारतीयांना काही प्रमाणात प्रतिनिधित्व दिले गेले. १९१९ मध्ये मांटेग्यू चेम्सफर्ड कायदयानुसार द्विदल राज्यपध्दती अस्तित्वात आली. प्रथम महायुध्दामध्ये इंग्लडचा विजय झाला असला तरीही यामध्ये त्यांची

दमछाक झाली होती, त्यानंतर घडलेल्या घटनांनी भारतीयांचा आत्मविश्वास वाढला होता. ब्रिटीश सत्तेसोबत होत असलेल्या संघर्षातून ब्रिटीशांनी भारतीयांना विश्वासात होण्यासाठी वेगवेगळी शिष्टमंडळे पाठविली. सायमन कमिशन पाठवले. या सर्वाचा परिपाक म्हणून १९३५ चा भारत शासन कायदा अखेर संमत आला . हा कायदा संमत होण्याआधी घडलेल्या काही महत्वाच्या घडामोडीचा परामर्श घेणे अत्यावश्यक ठरते.

## ६.२ सायमन कमिशन १९२७ - २८

### ६.२.१ सायमन कमिशन १९२७ - २८

भारताच्या शासकीय कारभाराची चौकशी करून त्याबाबत अहवाल पार्लमेंटला सादर करण्याचे काम एका संसदीय समितीकडे नेमण्याचे सुतोवाच ब्रिटीश पंतप्रधानानी केले. या समितीतील सर्व सदस्य ब्रिटीश होते. एकाही भारतीय व्यक्तीला त्यात स्थान नव्हते. भारतामध्ये जवाबदार शासन समिती पाठविण्याचे घोषित केले.

भारतातील जवळजवळ सर्वच पक्षांनी या कमिशनवर बहिष्कार टाकला. भारतामध्ये ठिकठिकाणी काळे झेंडे दाखवून त्यांचा सायमन परत जा या घोषणाद्वारे निषेध करण्यात आला. या दरम्यान सायमन कमिशनने भारताचा दौरा केला. शेकडो लोकांच्या मुलाखाती घेतल्या. त्यानुसार १९१९ ची द्विदल राज्यपध्दती अयशस्वी झाल्याचा निष्कर्ष त्यांनी काढला.

### ६.२.२ नेहरू अहवाल १९२८

भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड यांनी सर्व भारतीयांना मान्य होईल अशी घटना भारतीयांनी तयार केली तर ब्रिटीश शासन ती मान्य करेल असे विधान केले. त्याला आव्हान म्हणून स्विकारून पंडीत मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली सर्व पक्षीय समिती नेमली गेली. भिन्न पक्षांचा समावेश असलेल्या या समितीमुळे बर्कनहेड यांच्या आव्हानाचा मुकाबला करू शकेल असा नेहरू अहवाल प्रसिध्द करण्यात आला. देशातील अनेक कायदेपंडीतांशी चर्चा करून व निरनिराळ्या समस्यांचा वेगवेगळ्या पैलूने विचार करून हा अहवाल तयार केला गेला. १९२८ मध्ये हा ठराव संमत करण्यात आला. मात्र त्यापूर्वी मुस्लीम लीगने यावर आक्षेप घेतला या कारणावरून ब्रिटीशांनी नेहरू अहवाल फेटाळून लावला.

### ६.२.३ सविनय कायदेभंग चळवळ १९३०

नेहरू अहवाल फेटाळल्यानंतर गांधीजीनी सविनय कायदेभंग चळवळ सुरू केली १२ मार्च रोजी आपल्या सहकाऱ्यांसमवेत त्यांनी दांडी येथे मीठाचा कायदा मोडण्यासाठी यात्रा केली. गांधीजींच्या अहवालानंतर देशात ठिकठिकाणी अशा प्रकारची चळवळ हाती घेण्यात आली. गांधीजीना

munotes.in

तत्काळ अटक करून येरवडा जेल मध्ये पाठविण्यात आले. भारतातील चिघळलेली परिस्थिती पाहून ब्रिटीश सरकारने १९३० मध्ये गोलमेल परिषद घेण्याचे ठरविले. पहिल्या गोलमेज परिषेदेस कॉग्रेसने कोणताही प्रतिनिधी पाठविला नाही. अखेर गांधीजी व कॉग्रेस यांच्या सहभागाशिवाय गोलमेज परिषद यशस्वी होण़ार नाही हे लक्षात आल्यावर दुसऱ्या गोलमेज परिषदेला उपस्थित रहाणे अगत्याचे असल्याने कॉग्रेसमधील इतर नेत्यानाही लक्षात आले. तेव्हा पुढील बोलणी करण्यासाठी आयर्विन याच्याशी गांधीजीनी बोलणी करण्याचे ठरविले.

### ६.२.४ गांधी आयर्विन करार १९३१

१७ फेब्रुवारी १९३१ रोजी गांधीजी व आयर्विन यांच्यात वाटाघाटी सुरू झाल्या. प्रदीर्घ चर्चेनंतर त्यांच्यात काही बाबतींवर एकमत झाले. यानुसार काँग्रेसने सविनय कायदेभंग चळवळ मागे घेत असल्याचे मान्य केले व दुसऱ्या गोलमेज परिषदेस उपस्थिती रहाण्याबाबत संमती दर्शवली.

### ६.२.५ जातीय निवाडा व पुणे करार (१९३२) -

ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी पहिली व दुसरी गोलमेज परिषदेत झालेले निर्णय व चर्चा याआधारे मुस्लीम, शीख, युरोपियन, भारतीय व अनुसूचित जातींसाठी वेगळे मतदार संघ दर्शवणारा निवाडा प्रसिध्द केला. या निवाड्यात उच्चवर्णिय हिंदुंसाठी वेगळे व निम्न जातीतील हिंदुंसाठी वेगळे मतदारसंघ ठेवण्यात आले होते. हिंदुधर्मातील निम्न जातीतील लोकांना एकाच धर्मात राहून कोणतेही अधिकार नसल्यामुळे त्यांना राजकीय प्रतिनिधित्व देण्याच्या दृष्टीने ही तरतूद केली होती. गांधीजींनी याला विरोध दर्शवला. त्यांच्या मते यामुळे हिंदु धर्मातील एकता नाहीशी होऊन त्यात फूट पडेल. पण ही भिती निराधार होती कारण मुळात हिंदु धर्मात खालच्या जातीतील लोकांना कोणतेही राजकीय किंवा सामाजिक प्रतिनिधित्व नव्हतेच. गांधीजींना इतर धर्मातील लोकांना वेगळे मतदारसंघ देण्यास काहीही हरकत नव्हती. मात्र हिंदु धर्मातील अन्यायाचे बळी ठरलेल्या जाती जमातींना वेगळे मतदारसंघ देऊन त्यांना प्रतिनिधित्व देण्यास त्यांचा विरोध होता. यासाठी त्यांनी आमरण उपोषण सुरु केले. अखेर इतर काँग्रेस नेत्यांनी डॉ. आंबेडकर यांच्याशी बोलणी सुरू केली. गांधीजीचे प्राण धोक्यात आले होते. त्यांचे प्राण वाचवणे महत्त्वाचे होते. डॉ. आंबेडकर यांना त्यासाठी अस्पृश्यांना मिळणाऱ्या विशेष अधिकाराचा त्याग करावा लागला. त्यांनी व गांधीजींनी मिळून १९३२ चा पुणे करार संमत केला. त्यानुसार काँग्रेसने काही राखीव जागा अस्पृश्य वर्गाला देण्याचे निश्चित केले.

## ६.३ १९३५ चा भारत शासन कायदा

ब्रिटिशांनी भारतात शाशनयंत्रणा सुरळीत सुरू रहाण्यासाठी वेळोवेळी विविध कायदे संमत केले. १९३५चा कायदा हा भारताच्या घटनात्मक

वाटचालींमधील महत्त्वाचा टप्पा होता. भारतातील असंतोष वाढला असे निदर्शनास आल्यावर ब्रिटिश शासनाने जनमत एकदम विरूद्ध जावू नये म्हणून १९३५चा भारत शासन कायदा आणला. त्यामध्ये भारताला स्वायत्तता देणे अथवा भारतीय जनतेला राज्यकारभारात महत्त्वाचे स्थान देणे या बाबी अधोरेखित नव्हत्या. असे असूनही भारताच्या घटनात्मक वाटचालीमध्ये हा कायदा निर्णायक मानला जातो. सुमारे दोन ते अडीच वर्षाच्या कालावधीनंतर ब्रिटिश संसदेपुढे १९३५ मध्ये तो संमत होऊन प्रस्तावित आराखड्याचे कायद्यात रूपांतर झाले. त्याची अंमलबजावणी होण्यास दोन वर्षे लागली. एप्रिल १९३७ मध्ये अंशतः तो भारतामध्ये लागू झाला.

**१९३५ च्या कायद्याची ठळक वैशिष्ट्ये. -**

१) हा कायदा भारतात संघराज्य स्थापन करावे या हेतूने अंमलात आणला गेला होता. गव्हर्नरच्या ताब्यातील प्रदेश, व भारतीय संस्थाने हे या प्रस्तावित संघराज्याचे घटक रहाणार होते.

२) १९३५च्या कायदयात अनेक कलमे व परिशिष्टे होती. भारताला स्वायत्त राज्याचा दर्जा देणे हे ब्रिटिश राजवटीचे उद्दिष्ट मानले गेले. मात्र त्याच्या अंमलबजावणीच्या कालमर्यादेवर निश्चित असे कोणतेही भाष्य करण्यात आले नव्हते.

३) मांटेग्यू चेम्सफर्ड यांच्या १९१९ च्या कायद्यानुसार अंमलात आणलेली द्विदल शासन पद्धती या कायद्यान्वये केंद्रात रूजू करण्याची तरतूद या कायद्यात होती.

४) कायदेमंडळात सर्व भारतीयांचा समावेश व्हावा या हेतूने समाजातील विविध गटांना स्वतंत्र प्रतिनिधित्व दिले गेले होते.

५) भारतामध्ये फेडरल कोर्ट, रिझर्व्ह बँक, फेडरल रेल्वे ऑथॉरिटी यांच्या स्थापनेची तरतूद याच कायद्यात होती.

६) काही महत्त्वाच्या प्रादेशिक विभागांमध्येही बदल करण्यात आले. भारतापासून ब्रम्हदेश वेगळा करण्यात आला. मुंबई प्रांतामधून सिंध व बिहार प्रांतामधून ओरिसा अलग करण्यात आला व दोन नवीन प्रांत बनवण्याचे संकेत दिले गेले.

१९३५ च्या भारत शाशन कायद्यान्वये इग्लंडहून भारताचा राज्यकारभार करण्याबाबत पुढील महत्वाचे बदल करण्यात आले. १८५८ च्या कायद्याद्वारे स्थापन झालेल्या इंडिया कौन्सिल रद्द होवून त्याजागी तीन ते सहा जणांचे एक सल्लागार मंडळ नेमण्यात आले. भारतमंत्र्याला त्याच्या कामकाजात मदत करण्यासाठी नेमून दिलेल्या सदस्यांना केवळ सूचना करण्याचा अधिकार होता. त्यांचा सल्ला अथवा सूचना बंधनकारक नव्हत्या. मात्र प्रांतांना स्वायत्तता देण्यात आल्यामुळे प्रांतावरील त्याचे अधिकार काही प्रमाणात कमी झाले होते. याशिवाय भारत सरकारने संमत केलेल्या विधेयकाला संमती दयायची की नाही हे ठरविण्याचा अधिकारही त्यालाच

होता. १९१९च्या कायद्यानुसार संमत झालेले हाय कमिशनरचे पद या कायद्यातही कायम ठेवले गेले मात्र त्याचे मत गव्हर्नर जनरलवर बंधनकारक नव्हते.

## १९३५ च्या कायदा आणि संघराज्य

या कायद्यानुसार अखिल भारतीय संघराज्यात १७ प्रांत व भारतीय संस्थाने यांचा समावेश होता. संघराज्यात सामील होण्याचा निर्णय संस्थानांवर बंधनकारक नव्हता. मात्र प्रांतांना अशा प्रकारचे निर्णय स्वातंत्र्य देण्यात आले नव्हते. या कायद्यानुसार भारतीय संस्थानावरील सार्वभौमत्व ब्रिटिश सम्राटाच्याच ताब्यात असल्यामुळे संघराज्यात सामील होवून देखील त्यांचा राज्यकारभार प्रांतांपेक्षा वेगळा रहाणार होता. भारतीय संघशाशनाची प्रमुख जबाबदारी गव्हर्नर जनरलच्या हाती होती. कौन्सिल सभासदांच्या मदतीने त्याने संघशाशनाचे काम पहाणे अपेक्षित होते. यासाठी संघराज्यसरकार व घटकराज्ये यांची कार्यक्षेत्रे निश्चित करण्यात आली. संघखात्याकडे सरंक्षण, चलन, पोस्ट ऑफिस, टेलिग्राफ जकात, परराष्ट्रीयधोरण इ. महत्त्वाच्या बाबी देण्यात आल्या, तर प्रांताकडे जमीन महसूल, आरोग्य, कायदा, सुव्यवस्था, शिक्षण, इत्यादी विषयांचा समावेश होता. समवर्ती खाती, संघशाशन व प्रांतशाशन यामध्ये सामाईक दुवा होती. दोन्ही शाशनांना त्यामध्ये कायदे करण्याचा अधिकार होता. मात्र एकाच विषयांवर कायदा संमत झाला असेल तर संघशाशनाचा कायदाच ग्राह्य मानला जाण्याची तरतूद होती.

संघराज्य मोठ्या प्रमाणात शक्तीशाली झाले होते. त्यातही विधिमंडळाला संरक्षण व परराष्ट्र धोरण या बाबींवर कायदे करण्याचा अधिकार नव्हता. काही विधेयके विधिमंडळात सादर करण्यापूर्वी गव्हर्नर जनरलची परवानगी घ्यावी लागत असे. विधिमंडळातील संमत झालेले विधेयक फेटाळ्याचा पूर्ण अधिकार गव्हर्नरला होता. अशा रितीने गव्हर्नरला व्यापक अधिकार दिले गेले. त्याने नियुक्त केलेल्या कौन्सिल सदस्यांना काढून टाकण्याचे अधिकार त्याला होता. शिवाय प्रमुख वित्तसल्लागार, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, चीफ कमिशनर, संघलोकसेवा आयोगाचा अध्यक्ष इत्यादी नेमणूका करण्याचा विशेषाधिकार त्याला प्राप्त झाला. देशात कायदा व सुव्यवस्था टिकवणे, अल्पसंख्यांकाच्या हितसंबंधांची जपणूक करणे व भारतीय संस्थानिकांचे हितसंबंध सांभाळे इत्यादी कामे त्याला दिली होती. या बाबी सांभाळण्याच्या सबबीखाली विधिमंडळाला डावलून तो मनाप्रमाणे वागण्यास मोकळा होता. विधिमंडळाचे अधिवेशन बोलावणे, विधिमंडळ विसर्जित करणे, कामकाजाविषयी नियम बनवणे इत्यादी कामेही त्याच्या अखत्यारीत येत. आणिबाणीच्या काळात अध्यादेश काढण्याचा अधिकारही त्याला होता. देशाच्या आर्थिक बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी अंदाजपत्रकातील बहुतेक बाबींवर त्याचे प्रभुत्व राहील अशी तरतूद होती. प्रांतिक विधिमंडळातही मांडल्या जाणाऱ्या काही विधेयकांना त्याची पूर्वसंमती घेणे, बंधनकारक होते.

**संघविधिमंडळ -** कौन्सिल ऑफ स्टेट आणि फेडरल असेंब्ली १९३५ च्या कायद्यानुसार संघशाशनामध्ये दोन सभागृहे स्थापन करण्याची तरतूद होती. वरिष्ठ सभागृहाला कौन्सिल ऑफ स्टेट म्हटले जाई. त्यामध्ये २६० सदस्य संख्या होती. त्यापैकी प्रत्येक प्रांतांना काही सदस्य संख्या निर्धारित केली गेली तर काही सदस्य गव्हर्नर जनरलने नेमायचे होते. हे गृह आताच्या राज्यसभेसारखे असून दर दोन वर्षांनी एक तृतीयांश सदस्य निवृत्त होण्याची व नवीन सदस्य नेमण्याची तरतूद होती. फेडरल असेंस्ली हे कायदेमंडळाचे कनिष्ठ सभागृह होते. त्याची सदस्यसंख्या ३७५ होती. त्यात प्रांतांचे २५० तर संस्थानांचे १२५ प्रतिनिधी रहाणार होते. या गृहाची कालमर्यादा पाच वर्षांची होती. कायदे संमत करणे हा कायदेमंडळाचा विशेषाधिकार होता.

**प्रांतिक स्वायत्तता -** भारतातील ११ प्रांतांसाठी प्रांतिक स्वायत्तता १९३५च्या कायद्यानुसार प्रस्तावित होती. प्रांतिक शाशनव्यवस्थेतही कायदेमंडळ स्थापन करण्यात आले होते. गव्हर्नर हा कायदेमंडळ व केंद्रशाशन यांच्यातील दुवा होता. यामध्येही गव्हर्नरला मोठ्या प्रमाणात अधिकार प्रदान करण्यात आले होते. प्रांतिक कायदेमंडळावर पूर्णपणे वर्चस्व रहावे या हेतूने गव्हर्नरला गव्हर्नर जनरलप्रमाणेच अधिकार दिले होते.

अल्पसंख्यांक गटांचे हितसंबंध जोपासणे, संस्थानिकांची काळजी घेणे, कनिष्ठ सभागृहाचे अधिवेशन बोलावणे, इत्यादी बाबी त्याच्या कार्यक्षेत्रात येत. प्रांतामध्ये कायदा व सुव्यवस्था राखणे ही महत्त्वाची जबाबदारी त्याला देण्यात आली होती. कायदेमंडळाचे दैनिक कामकाज नियम सभापतीच्या सहाय्याने त्याला तयार करायचे होते. गव्हर्नरला मदत करण्यासाठी काही सदस्यांची नियुक्ती करण्याचे अधिकार गव्हर्नरला होते. १९३५ च्या कायद्यानुसार प्रांतांना स्वायत्तता मिळाली असली तरी त्यांच्यावर केंद्रसरकारचे पूर्ण नियंत्रण होते. संघराज्याच्या कोणत्याही कायद्याविरुद्ध निर्णय घेण्याची परवानगी प्रांतिक कायदेमंडळांना नव्हती. तसेच प्रांतिक कार्यकारी शाखेने अंमलात आणावयाचे धोरण संघसरकारच्या धोरणाविरुध्द असू नये अशी, तरतूद कायद्यात होती. प्रांताच्या शाशनात गव्हर्नर जनरल शांतता व सुरक्षितता या सबबीखाली केव्हाही हस्तक्षेप करण्याचा अधिकार बाळगून होता. दोन प्रांतांत काही वादविवाद झाल्यास त्यात मध्यस्थी करण्याची जबाबदारी गव्हर्नरवर होती. गव्हर्नर हा गव्हर्नर जनरलला व गव्हर्नर जनरल हा भारतमंत्र्याला व पर्यायाने ब्रिटिश पार्लमेंटला जबाबदार असल्यामुळे प्रांतिक शाशनावर अंतिम ताबा आपसूकच ब्रिटिशांचा येत होता. आर्थिक बाबतीतही प्रांत शाशन पूर्णपणे केंद्र सत्तेवर अवलंबून होते.

## ६.४ १९३५ भारत शासन कायद्यातील उणिवा व प्रांतसरकार

१) संघशासन सरकार ह्यांच्यात उचित अधिकार वाटप झालेले नव्हते. त्यामुळे प्रांतिक व मध्यवर्ती सत्ता अप्रत्यक्ष त्यांच्याच हातात होती. या शाशनव्यवस्थेत भारतीयांनी तयार केलेल्या घटनेद्वारे राज्यकारभार केला जावा ही प्रमुख मागणी ब्रिटिशांनी धुडकावली होती. संघराज्याचे घटक समान दर्जाचे नव्हते. गव्हर्नर, चीफ कमिशनर व भारतीय संस्थाने यांमध्ये कमिशनरला अमर्यादीत अधिकार होते. त्याच्या अधिकारांमुळे गव्हर्नर व कायदेमंडळात संमत झालेले कायदे यांनाही महत्त्व नव्हते.

२) देशातील सर्व प्रांतांना संघराज्यात समाविष्ट होणे बंधनकारक होते. मात्र संस्थानांवर अशा कोणत्याही प्रकारचे बंधन नव्हते. त्यांना नकाराधिकाराचे पूरेपूर स्वातंत्र्य दिले गेले.

३) संस्थांनांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधित्व देण्यात आले होते. संस्थानांना यामध्ये अनेक सवलती देण्यात आल्या होत्या. संस्थानांनी कोणती खाती संघसरकारकडे सोपवायची यात त्यांना अधिकार दिला होता मात्र इतर प्रांतांना असे स्वातंत्र्य नव्हते. याशिवाय कायदेमंडळात असणारे संस्थानांचे प्रतिनिधी हे लोकनियुक्त नसून ते नेमले जाणार होते त्यामुळे गव्हर्नर आपल्या मर्जीतील लोक नेमणार हे उघड होते.

४) संघशाशन व्यवस्थेत भारतमंत्री हा प्रबळ व्यक्ती बनला होता. संघशाशनाच्या कार्यकारी शाखेला विशेष अधिकार नव्हते. भारतमंत्र्याच्या खालोखाल गव्हर्नर जनरल सर्वच अधिकार वापरू शकत होता. त्याचे वित्तविषयक व कायदेविषयक अधिकार अमर्यादीत होते त्यामुळे कायदेमंडळात संमत झालेल्या कायद्याला फारसे महत्त्व रहाणार नव्हते.

५) कायदेमंडळांत वरिष्ठ सभागृहाला, कनिष्ठ सभागृह फेडरल असेंब्ली एवढेच अधिकार देण्यात आले होते. लोकनियुक्त सभासदांएवढेच अधिकार निर्वाचित सदस्यांना मिळाल्यामुळे लोकशाहीच्या मूलभूत तत्वालाचा हरताळ फासला गेला.

६) प्रांतिक शाशनव्यवस्थेवरही ब्रिटिश सरकारने पूर्ण अंकुश ठेवला होता. प्रांतिक स्वायत्तता नावापुरतीच होती. गव्हर्नर हा अंतिमतः गव्हर्नर जनरल जबाबदार असल्यामुळे केंद्रसत्तेचा पूर्ण वचक प्रांतिक शाशनावर राहाणार होता. मंत्रिमंडळ हे पूर्णपणे स्वतंत्र नव्हते. त्यांच्या कायदेमंडळापेक्षा गव्हर्नरचा दबाव जास्त होता. गव्हर्नरला इतके

अधिकार देण्यात आले होते की त्यामुळे कायदेमंडळ केवळ नाममात्र राहीले होते.

७) भारतीय विविधतेला जमेस धरून ब्रिटिशांनी त्या आधारावर भारतीयांचे ऐक्य होणार नाही, याची पूरेपूर काळजी घेतली होती.

**१९३५ च्या कायद्याबाबत प्रतिक्रिया :**

१९३५ च्या भारतशाशन कायद्यान्वये प्रास्तपित शाशनप्रणालीबाबत भारतीय सांशक होते. या व्यवस्थेमुळे अनेक नेत्यांचे अथवा राजकीय पक्षांचे समाधान झाले नाही. प्रांतिक घटनेला वरून लोकशाहीचा मुलामा चढविला मात्र ती आतून पोकळ आहे असे मत मदनमोहन मालवीय यांनी व्यक्त केले. राजगोपालाचारी यांनी हा कायदा द्विदल शासनव्यवस्थेपेक्षा धोकादायक असल्याचे प्रतिपादन केले. प्रांतिक स्वायत्तता म्हणजे इंजिन नसलेले यंत्र आहे अशी मार्मिक टीका पंडित नेहरू यांनी केली. विन्स्टन चार्चिल यांनीही या कायद्याला विरोध दर्शविला प्रांतिक सरकारमध्ये गव्हर्नरला एवढे अमर्यादित अधिकार दिले होते. की त्याचा उपयोग करून प्रांतिक शाशनावर नियंत्रण ठेवायचे अशी ब्रिटिश पार्लमेंटचे धोरण होते अशी कबुलीच भारतमंत्री लॉर्ड झेटलंड यांनी दिली. कायदा सुरक्षा ठेवण्याचे काम प्रांतिक सरकारकडे होते मात्र ते खाते गव्हर्नरच्या ताब्यात असल्यामुळे मंत्र्यांना दिलेले अधिकार म्हणजे निव्वळ दिशाभूल होती. असे मत डॉ.राजेन्द्र प्रसाद यांनी व्यक्त केले. कनिष्ठ गृहाच्या अधिकारांना लगाम घालण्यासाठी वरिष्ठ गृहे निर्माण करण्यात आली अशी टीका सी.वाय.चिंतामणी यांनी या कायद्यावर केली.

**आपली प्रगती तपासा :**

१) १९३५ च्या कायद्याची वैशिष्ट्ये सांगा.

## ६.५ सारांश

१९३५ च्या कायदा हा ब्रिटिशांनी वेळोवेळी संमत केलेल्या राज्यकारभाराच्या कायद्याचाच एक भाग होता. १९३५च्या कायद्यानुसार देशात मध्यवर्ती व प्रांतिक शाशनप्रणाली अंमलात आली. यामध्ये मध्यवर्ती शाशन प्रणालीकडे संरक्षण, पोस्ट इत्यादी महत्वाच्या बाबींमध्ये सर्वाधिकार होते. मध्यवर्ती व प्रांतिक शाशनात दोन सभागृहे स्थापन करण्यात आली. प्रांतांत गव्हर्नर तर केंद्रात गव्हर्नर जनरल या अधिकाऱ्यांकडून या शासनव्यवस्थेवर पूर्ण नियंत्रण प्रस्थापि करण्याची योजना होती. या कायद्यातील दोषांबाबत जाणीव असूनही १९१९च्या द्विदल राज्यपद्धतीपेक्षा १९३५च्या कायद्यात बरेच पुढचे पाऊल उचलले गेले होते. त्यामुळे बहुतेक सर्व पक्षांनी प्रांतिक घटना राबण्याचा निर्णय घेतला.

१ एप्रिल १९३७ मध्ये याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली पण १९३९ मध्ये द्वितीय महायुद्ध सुरू झाल्यानंतर या कायद्याची अंमलबजावणी स्थगित केल्याची घोषणा गव्हर्नर जनरलने केली.

## ६.६ प्रश्न

(१) १९३५ च्या भारत शाशन कायदा संमत होण्याची पार्श्वभूमी विशद करा.

(२) १९३५ च्या कायद्यातील प्रमुख तरतूदींचा आढावा घ्या.

(३) १९३५ च्या कायद्यातील त्रुटी व त्यावर घेतलेले आक्षेप याचे परीक्षण करा.

## ६.७ संदर्भ सूची

(१) बिपिन चंद्र, हिस्ट्री ऑफ मॉर्डन इंडिया, ओरिएन्टल ब्लॅकस्वॅन. २००१

(२) डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकरम आधुनिक भारताचा इतिहास, (१९२१ ते १९४७), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, १९९९.

♦♦♦♦♦

munotes.in

# ७

# स्वातंत्र्याकडे वाटचाल आणि फाळणी

७.० उद्दीष्टे
७.१ प्रस्तावना
७.२ ऑगस्ट योजना १९४०
७.३ क्रिप्स योजना १९४२
७.४ राजगोपालाचारी यांची मध्यस्थी
७.५ वेव्हेल योजना १९४५
७.६ त्रिमंत्री योजना (कॅबिनेट मिशन प्लॅन)
७.७ घटनासमितीसाठी निवडणुका
७.८ प्रत्यक्ष कृतीदिन
७.९ हंगामी सरकारची स्थापना
७.१० नौखाली हत्याकांड
७.११ घटना समितीचे पहिले अधिवेशन
७.१२ माऊंटबॅटन योजना
७.१३ १९४७ चा भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा
७.१४ देशाची फाळणी
७.१५ रॅडक्लिफ निवाडा
७.१६ फाळणीचे दुःख
७.१७ सारांश
७.१८ प्रश्न
७.१९ संदर्भ ग्रंथ

## ७.० उद्दीष्टे

१) देशातील राजकीय समस्या सोडवण्याच्या दृष्टीने झालेल्या घडामोडी विद्यार्थ्यांना समजणे.

munotes.in

२) राजगोपालाचारी योजना व माऊंटबॅटन योजनेचे मुख्य कलमे अवगत होणे.

३) ऑगस्ट योजना, क्रिप्स योजना व राजगोपालाचारी योजनेतील मुख्य मुद्दयांचे आकलन होणे.

४) देशाच्या फाळणीस कारणीभूत घटकांचे आकलन होणे.

## ७.१ प्रस्तावना

द्वितीय महायुद्ध सुरू झाल्यावर ब्रिटीशांना भारतीय राजकीय समस्येकडे लक्ष देणे प्रकर्षाचे वाटले होते. ऑगस्ट योजना, क्रिप्स योजना, कॅबिनेट योजना व माऊंटबॅटन योजना अशा विविध योजना त्यांनी मांडल्या व त्यातून माऊंटबॅटन योजनेचा स्विकार करून भारतीय स्वातंत्र्याचा कायदा संमत केला. भारतास स्वातंत्र्य मिळाले परंतु देशाची फाळणी थांबवता आली नाही. देशाचे विभाजन होऊन भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे उदयास आली.

## ७.२ ऑगस्ट योजना १९४०

देशातील बदलती परिस्थिती पाहून गव्हर्नर जनरलने ८ ऑगस्ट १९४० रोजी ऑगस्ट योजना घोषित केली. त्यामध्ये काँग्रसची हंगामी सरकार स्थापना करण्याची मागणी फेटाळून लावली होती. द्वितीय महायुद्धात ब्रिटनला मदत करण्यासाठी भारतीयांच्या युद्ध सल्लागार मंडळाचे गठन करण्याचे सुतोवाच करण्यात आले होते. गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळात काही भारतीय प्रतिनिधींचा समावेश करण्याची तयारी दर्शवली होती. गव्हर्नरच्या ऑगस्ट योजनेत भारताच्या स्वातंत्र्याविषयी कोणतीही टिपणी नसल्यामुळे काँग्रेसने ही योजना फेटाळली. गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाचे पूर्णतः भारतीयकरण करावे ही प्रमुख मागणी ब्रिटीश सरकारने फेटाळल्यामुळे सर्वच भारतीय पक्ष नाराज झाले होते. मात्र ब्रिटीशांना भारतीयांचे महायुद्धात सहकार्य आवश्यक होते. त्यानुसार त्यांनी पुढील बोलणी करण्यासाठी क्रिप्स योजना तयार केली.

## ७.३ क्रिप्स योजना १९४२

१९४१ च्या अखेरीस द्वितीय महायुद्धात जपानने आग्नेय आशियात आपले वर्चस्व प्रस्थापित केले. फ्रेंच, डच व ब्रिटीश वसाहतींचा ताबा घेत जपान भारताच्या दिशेने आगेकूच करत होता. सिंगापूर व रंगून ही ब्रिटीशांची महत्त्वाची शहते जपानने जिंकून घेतली. या वेळेस ब्रिटीशांनी भारतीयांचे सहकार्य मिळवण्याच्या हेतूने राजकीय पेच परस्पर सहकार्याने सोडवावा अशी मागणी इंग्लंडमधेही होवू लागली. अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांनी ही ब्रिटनचे पंतप्रधान

चर्चिल यांना भारताला युद्धसमाप्तीनंतर राष्ट्रीय सरकार स्थापन करू द्यावे, असा तगादा लावला. अखेरीस भारतातील राजकीय पेच सोडवण्यासाठी ब्रिटीश मंत्रिमंडळाने क्रिप्स योजना तयार केली. २३ मार्च १९४२ मध्ये स्टॅफोर्ड क्रिप्स भारतात आले. त्यांनी सर्व नेत्यांची भेट घेतली व सरतेशेवटी आपली योजना जाहीर केली.

**क्रिप्स योजनेची प्रमुख कलमे -**

भारताला लवकरच वसाहतिक राज्याचा दर्जा दिला जाईल. युद्धासमाप्तीनंतर प्रांतिक कायदेमंडळाच्या कनिष्ठ सभागृहामध्ये प्रतिनिधित्वाच्या तत्वानुसार, निर्वाचित सदस्यांची घटना समिती तयार करण्यात येईल. या घटना समितीसोबत अल्पसंख्यांकांच्या आधारे ब्रिटीश सरकार योग्य तो करार करेल. घटनासमितीत प्रांतांना सहभागी होण्याचे अथवा न होण्याचे स्वातंत्र्य होते. घटना समितीत सामिल न होणाऱ्या संस्थानिकांशी ब्रिटीश सरकार स्वतंत्र करार करणार होते. याबदल्यात भारतीयांनी द्वितीय महायुद्धात सरकारला मदत करावी अशी अपेक्षा बाळगण्यात आली होती. या योजनेनुसार भारतीयांचा घटना बनवण्याचा अधिकार प्रथमच मान्य करण्यात आला होता. परंतू त्यात सामिल न होण्याचा अधिकार संस्थानिकांना दिल्यामुळे देशात फुटीरता वादाला आमंत्रण दिले होते.

क्रिप्स योजनेच्या तरतूदीवर काँग्रेस कार्यकारणीने चर्चा केली. तेव्हा त्यातील त्रुटी प्रकर्षाने समोर आल्या. भारताला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याचे कोणतेही आश्वासन त्यात नव्हते. प्रांतांना स्वतंत्र रहाण्याची मोकळीक देऊन फूटीरतावादाला रान मोकळे ठेवले. त्यामुळे काँग्रेसने क्रिप्स योजना फेटाळल्याचे जाहीर केले. मुस्लीमलीगने यामध्ये पाकिस्तानची मागणी नसल्यामुळे ती फेटाळून लावली. उदारमतवादी नेत्यांनीदेखील देशाच्या विभाजनाची तत्त्वे या योजनेत दिसल्यामुळे, त्याबद्दल ती अस्विकारार्ह मानली. क्रिप्स योजना असफल झाल्यामुळे स्टॅफोर्ड क्रिप्स यांनी महात्मा गांधींना जबाबदार धरले. तर काहींनी क्रिप्स यांना दोष दिला. परंतू महत्त्वाची बाब अशी की क्रिप्स यांना भारतात पाठवण्यात आले होते ते केवळ ब्रिटीश जनमत व अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांचे समाधान करण्यासाठी. चर्चिल यांना भारताला इतक्यात सत्ता मिळणे ब्रिटीशांच्या दृष्टिने योग्य नाही असे वाटत होते. त्या पार्श्वभूमीवर क्रिप्स मिशन वाटाघाटी ही करण्यासाठी पूर्णपणे स्वतंत्र नव्हते. क्रिप्स योजनेतच त्यांच्या अयशस्वीतेची बीजे रोवली गेली होती. ब्रिटीश विचारववंत, हेरॉल्ड लास्की यांनी क्रिप्स यांना दोषी ठरवले तर काँग्रेस नेते पट्टभी सीतारमैया यांनी त्या योजनेचे वर्णन 'मृतावस्थेत जन्माला आलेले बालक या शब्दात केले. क्रिप्स भारतातून परत गेल्यावर राजकीय गुंता सोडवण्यासाठी चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी एक तोडगा ठेवला. त्यामध्ये काँग्रेसने मुस्लीम लीगची स्वतंत्र देशाची मागणी मान्य करावी असा प्रस्ताव होता.

## ७.४ राजगोपालाचारी यांची मध्यस्थी

१९४२ साली सुरू झालेले प्रचंड जनआंदोलन हे भारतीय जनतेने देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेले अखेरचे आंदोलन होते. हे आंदोलन संपता संपता दुसऱ्या महायुद्धाची अखेरही जवळ आली. ह्या व्यापक राष्ट्रीय जनआंदोलनामुळे,

आझाद हिंद फौजेच्या मोहिमांमुळे आणि युद्धाच्या दरम्यान जागतिक राजकारणात झालेल्या परिवर्तनामुळे भारताला फार काळ दडपून ठेवणे व भारतीयांच्या राजकीय मागण्या फार काळ डावलणे शक्य नाही हे ब्रिटीश राज्यकर्त्यांनी ताडले. शिवाय युद्धसमाप्तीनंतर भारतीयांच्या राजकीय मागण्यांचा विचार करण्याचे आश्वासन ब्रिटिश सरकारने दिले होते. त्यानुसार १९४५ पासून सत्तेच्या हस्तांतरणाच्या वाटाघाटींना सुरुवात झाली. १९४४ च्या उत्तरार्धात चले जाव चळवळीचा भर ओसरला होता. लॉर्ड वेव्हेल यांनी गव्हर्नर जनरल पदाची सूत्रे हाती घेतली होती. मुस्लीम लीग हीच भारतीय मुस्लीमांची प्रतिनिधी असल्याचा दावा लीगने केल्यामुळे व पाकिस्तानची मागणी पुढे रेटल्यामुळे गंभीर राजकीय पेच तयार झाला होता. त्यावर क्रिप्स मिशन सपशेल अयशस्वी झाले होते. युद्धकाळात सामान्य जनतेच्या हालांना पारावार उरला नाही. मोठ्या प्रमाणावर महागाई वाढली होती. काळ्या बाजाराला ऊत आला होता. या पार्श्वभूमीवर लॉर्ड वेव्हेल यांनी एक कृती समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला. यामधून कोणताही मार्ग काढण्यासाठी ब्रिटीश सरकारच उदासीन होते. अशा आशयाची नोंद वेव्हेल यांच्या खाजगी कागदपत्रात आढळते. या पार्श्वभूमीवर लीगशी बोलणे करण्यासाठी गांधीजींनी जीनांशी पत्रव्यवहार सुरू केला. गांधींची जीनांशी वाटाघाटी करून त्यांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने राजगोपालाचारी यांनी मध्यस्थाची भूमिका स्विकारली.

**राजगोपालाचारी योजना** - जिनांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करून राजगोपालाचारी यांनी काही मुद्दे मांडले. काँग्रेसने सुरू केलेल्या स्वातंत्र्यलढ्याला जीनांनी समर्थन द्यावे. राष्ट्रीय सरकार प्रस्थापित करण्यासाठी काँग्रेसाला सहकार्य करावे. युद्धसमाप्तीनंतर भारतामधे मुस्लीमबहुल प्रदेशाची व्याप्ती निश्चित करण्यासाठी एक समिती नेमण्यात यावी. त्यांनी पाकिस्तानच्या निर्मितीचा कौल दिल्यानंतर त्यांनी पाकिस्तानमधे समाविष्ट व्हावे. देशाचे दोन भागात विभाजन होऊन स्वतंत्र देशांमधे संरक्षण, दळणवळण व इतर हितसंबंध यांच्याविषयी करार व्हावे. राजगोपालाचारी योजनेत पहिल्यांदाच स्वतंत्र मुस्लीम राष्ट्राची संकल्पना स्विकारली गेली. मात्र या योजनेतील पाकिस्तान हे दुबळे व कंगाल असून त्यामधे आपल्याला रस नाही हे सांगून जीना यांनी ही योजना नाकारली. मात्र देशाची फाळणी होण्यामागे राजगोपालाचारी योजनेने दुर्दैवीपणे सुरूवात झाली. गांधी व जींना यांच्या वाटाघाटीमुळे देशाच्या विभाजनास काँग्रेस तयार आहे असा निष्कर्ष जीना यांनी काढला.

## ७.५ वेव्हेल योजना १९४५

ह्या सुमारास द्वितीय महायुद्ध समाप्त होण्याची लक्षणे दिसू लागली होती. भारतातील वाढता राजकीय तणाव ध्यानात घेऊन भारताला लवकरात लवकर घटनात्मक सुधारणां देणे आवश्यक आहे असे लॉर्ड वेव्हेल यांना वाटत होते. त्यांनी ब्रिटीश मंत्रिमंडळाची बोलणी करून १४ जून १९४५ मधे काही सुधारणा सुचवल्या त्यालाच वेव्हेल योजना म्हटले जाते. या योजनेमध्ये शाशनात नवे कार्यकारी मंडळ स्थापन करून त्यामधे मुस्लीम व हिंदुना समान प्रतिनिधित्व देण्याची तरतूद होती. व्हाईसरॉय व सेनापती ही दोन पदे वगळता कार्यकारणीतील

सर्व सदस्य भारतीय असतील. गव्हर्नर जनरलला नकाराधिकाराचा अधिकार रहाणार होता. या सर्व कार्यपद्धतीवर लक्ष देण्यासाठी ब्रिटीश मंत्रिमंडळाने नियुक्त केलेला हायकमिशनर काम करणार होता. ही व्यवस्था हंगामी स्वरूपाची असेल. युद्ध संपल्यानंतर कायम स्वरूपाची घटना निर्मिती होईपर्यंत देशाचा कारभार सुरळीत सुरू ठेवण्यासाठी ही योजना काम करणार होती. या योजनेवर चर्चा करण्यासाठी वेव्हेल यांनी सिमला येथे परिषद बोलावली. परिषदेला मौलाना आझाद हे काँग्रेसचे तर जीना हे लीगचे प्रतिनिधी होते. गांधीजींच्या अपेक्षेप्रमाणे परिषदेच्या आरंभीपासून ती अयशस्वी होण्याची लक्षणे दिसू लागली होती. व्हाईसरॉय कार्यकारी मंडळातील सदस्य कोणत्या तत्वाच्या आधारे निवडायचे, या मुद्दयांवर सदस्यांमधे एकमत होत नव्हते. याशिवाय शीख व समाजातील दलित वर्गाबाबत कोणतीही भरीव तरतूद यात नव्हती. जीनांची दुराग्रही भूमिकाही वेव्हेल यांच्या ध्यानात आली होती. ही परिषद अयशस्वी झाल्यामूळे मुस्लीम लीगची उपद्रवशक्ती मोठ्या प्रमाणावर वाढली होती. जीना यांना अवास्तव महत्त्व, राजगोपालाचारी योजना व वेव्हेल योजनेत दिले गेले. त्यामुळे जीनांच्या विरोधात असणारे मुस्लीम नेतेही राजकीय लाभ मिळवण्याच्या हेतूने जीनांचे समर्थन करू लागले.

## ७.६ त्रिमंत्री योजना (कॅबिनेट मिशन प्लॅन)

इंग्लंडमधे मजूर पक्षाची सत्ता स्थापन झाल्यानंतर भारताला स्वायत्तता देण्याबाबत चर्चा सुरू झाली. ब्रिटीशांनी याबाबतीत पुढाकार घेऊन योग्य ती पाऊले उचलली नाहीत तर भारतीय जनता ब्रिटीश सत्तेविरुद्ध बंड करून उठेल असे इशारे सरकारला मिळत होते. या सर्व बाबींचा परिणाम होऊन पंतप्रधान अँटली यांनी भारतात कॅबिनेट मिशन पाठवीत असल्याची घोषणा केली. भारतमंत्री पॅथिक लॉरेन्स, स्टॅफोर्ड क्रिप्स व ए.सी. अलेक्झांडर हे या योजनेचे सदस्य होते. कोणतीही साचेबंद योजना न तयार करता भारतीय नेत्यांशी चर्चा करून सर्वसामान्य तोडगा काढावा. त्याला काँग्रेस व लीगची मान्यता मिळवावी, हे स्पष्टपणे या सदस्यांना सांगितले गेले होते. यानुसार कॅबिनेट मिशनने भारतात विविध नेत्यांच्या भेटी घेतल्या त्यांच्याशी चर्चा केली. व्हाईसराय सरसेनापती, मौलाना आझाद, जीना, पंडित नेहरू, बॅ.सप्रू, शामाप्रसाद मुखर्जी, तारासिंग, डॉ.आंबेडकर, इत्यादी नेत्यांच्या भेटी घेतल्या. या दरम्यान सर्वच जणांनी जीना यांच्या स्वतंत्र देशाच्या मागणीला विरोध केला, वाटाघाटींच्या पहिल्याच फेरीत भारताच्या सर्वच पक्षांच्या मागण्यांची कल्पना कॅबिनेट मिशनला आली. अखेरीस १६ मे रोजी कॅबिनेट मिशन योजनेने आपली योजना मांडली.

### कॅबिनेट मिशनची महत्त्वाची कलमे

१) भारतातील ब्रिटिशशासित प्रांत आणि संस्थाने यांचे मिळून भारताचे एकसंघ राज्य स्थापन केले जावे; संघराज्याच्या स्वाधीन परराष्ट्रीय धोरण, संरक्षण व दळणवळण ही किमान तीन खाती असावीत; ह्या खात्यांच्या कामकाजासाठी लागणारा निधी उभा करण्याचा अधिकार संघराज्याला असावा; हे कामकाज करण्यासाठी संघराज्याचे

कार्यकारी मंडळ व कायदे मंडळ असावे व त्यात ब्रिटिशशासित प्रांतांचे व संस्थानांचे प्रतिनिधी असावेत.

संघराज्याच्या कायदेमंडळात उपस्थित होणारा महत्त्वाचा सांप्रदायिक मुद्दा कायदे मंडळात उपस्थित असलेल्या दोन्ही महत्त्वाच्या समाज गटांच्या बहुमताने निर्धारित केला जावा.

संघसरकारला देण्यात आलेल्या विषयांव्यतिरिक्त इतर सर्व विषय प्रांतांच्या कक्षेत असावेत. तसेच संघसरकारला देण्यात येण्याऱ्या विषयांव्यतितिक्त उर्वरित सर्व विषयांवर संस्थानांचा ताबा असावा.

२) प्रांतांनी आपले गट बनवावेत, आपले कार्यकारी मंडळ व कायदेमंडळ तयार करावे; तसेच कोणते समान विषय प्रांताकडे ठेवावयाचे ते ठरविण्याचे स्वातंत्र्य प्रांतांना असावे.

३) संघराज्याच्या व प्रांत गटांच्या घटनेत बदल करण्याची गरज एखाद्या प्रांताला वाटल्यास, त्या प्रांताच्या कायदे मंडळाने बहुमताने तसा प्रस्ताव पास केल्यास दर दहा वर्षानी घटनेच्या फेरविचाराची मागणी करता येईल. तशा आशयाची तरतूद घटनेत केली जावी.

४) घटनासमितीची घडण कशा पद्धतीने केली जावी व घटना समितीने कशा पद्धतीने कामकाज करावे ह्या संबंधी कॅबिनेट मिशनने पुढील शिफारसी केल्या.

५) सर्व प्रतिनिधींची व संस्थानांच्या प्रतिनिधिची मिळून एक बैठक व्हावी. त्यात घटना समितीच्या अध्यक्षाची व इतर अधिकाऱ्याची निवड केली जावी. तसेच नागरिकांचे अधिकार, अल्पसंख्यांक गट व आदीवासी यांच्या बाबत विचार करणारी सल्लागार समिती स्थापन केली जावी.

६) प्रांतिक प्रतिनिधींचे तीन गटात विभाजन केले जावे.

अ) बिहार, ओरिसा, मद्रास, मुंबई, मध्य प्रांत

ब) पंजाब, सिंध, वायव्य हद्द

क) बंगालम आसाम

७) प्रांताच्या प्रतिनिधींनी आपापल्या गटा प्रमाणे स्वतंत्र बैठकी घ्याव्या व समान विषय हाती घेण्याबाबत निर्णय घ्यावा.

८) सत्तेच्या हस्तातरणांच्या वेळेस उपस्थित होणाऱ्या सर्व मुद्दयांबाबत भारताच्या घटनासमितीने ब्रिटिश शाशनाशी करार करावा.

**भारतीयांच्या प्रतिक्रिया** - कॅबिनेट मिशन योजनेत संघ सरकारला पुरेसे अधिकार नव्हते त्यामुळे प्रांतिक सरकारे प्रबळ होणार होते. भारताच्या संघराज्यात संस्थानांनी सामिल व्हायचे असेल तरी त्यांच्यावर ब्रिटीशांचे वर्चस्व रहाणार होते. घटनासमितीला पूर्ण स्वतंत्र्य नव्हते. घटना तयार करण्याची प्रक्रिया सदोष होती. प्रथम प्रांताने व नंतर संघाने घटना बनवणे अशी मांडणी घटना समितीच्या मूळ

तत्त्वाला अनुसरून नव्हती. सर्व भारतीय पक्षांनी या योजनेला फेटाळले. अर्थात त्याची कारणे वेगवेगळी होती. काँग्रेसने घटनासमिती स्थापन करण्याबाबत अनुकूलता दर्शवली परंतू मुस्लीम लीगला त्यात जास्त महत्त्व दिल्यामुळे त्यास नकार दिला गेला. प्रारंभीच्या काळात मुस्लीम लीगला कॅबिनेट योजना अनुकूल वाटत होती मात्र संख्याबळाच्या जोरावर घटना समितीत काँग्रेस लीगला नामोहरण करेल या भितीने लीगने नंतर या योजनेस नकार दिला.

## ७.७ घटनासमितीसाठी निवडणुका

लॉर्डे वेव्हेल यांनी कॅबिनेट मिशनच्या संमतीनुसार जुलै १९४६ मधे निवडणुका घेतल्या. या निवडणुकांत २१० सर्वसामान्य जागांपैकी १९९ जागा काँग्रेसने जिंकल्या तर मुस्लीम लीगने ७८ राखीव जागांपैकी ७३ जागा जिंकल्या. अशा रितीने २९६ सदस्यांपैकी २११ सदस्य काँग्रेसचे रहाणार होते. घटना समितीत काँग्रेसचे बहुमत पाहून जीना प्रचंड अस्वस्थ झाले.

munotes.in

## ७.८ प्रत्यक्ष कृतीदिन : १६ ऑगस्ट १९४६

मुस्लीम लीगच्या ठरावानुसार १६ ऑगस्ट १९४६ हा कृतीदिन पाळण्याचा निर्णय घोषित करण्यात आला. प्रत्यक्ष कृती म्हणजे कायद्यानुसार न जाता बेकायदा कृती अथवा हिंसाचार अशी उघड भूमिका लीगने घेतली. याचे प्रात्याक्षिक कलकत्ता येथे दिसून आले. लीगच्या मुस्लीम गुंडाचे थवेच्या थवे रस्तोरस्ती 'लेके रहेंगे पाकिस्तान' या घोषणा देत फिरू लागले. थोड्याच वेळात दंगेधोपे, जाळपोळ व लूटालूट सुरू झाली. शेकडो सशस्त्र मुसलमान गुंड हिंदूच्या घरावर हल्ले करू लागले. भीषण कत्तलीना सुरूवात झाली. पोलीस प्रशासन या जमावाला आळा घालण्याऐवजी निष्क्रीयता दर्शवू लागली. हे अमानुष हत्याकांड सुमारे चार दिवस सुरू होते. अखेर हिंदु व शीख यांनी प्रतिकार सुरू केला. या अमानुष हिंसाचारात पाच हजार लोक बळी गेले. ५०,००० जखमी झाले. कलकत्त्याच्या हिंसाचाराच्या बातम्यांमुळे संपूर्ण देशात तणावाचे वातावरण तयार झाले. सुऱ्हावर्दी बंगालचे मुख्यमंत्री म्हणून न वावरता केवळ गुंड मुस्लीमांचे तारणहार म्हणून पुढे आले. कलकत्त्यातील हिंसाचार उत्फूर्त जातीय हिंसाचार नसून परस्पर चेतवलेल्या नियोजित यादवीचा एक प्रकार होता. यामुळे देशभरात हिंदु मुस्लीम संबंध तणावपूर्ण झाले. अशा प्रकारे दंगे घडवल्यास काँग्रेस तणावपूर्ण स्थितीत आपले दावे मान्य करेल, अशी जीना यांची अपेक्षा होती.

## ७.९ हंगामी सरकारची स्थापना

१९४६च्या निवडणुकात काँग्रेसला अपेक्षित यश मिळाल्या नंतरही त्वरीत हंगामी सरकार स्थापन झाले नव्हते म्हणून लॉर्ड वेव्हेल यांनी काळजीवाहू सरकार

स्थापन केले होते. अखेरिस भारतमंत्री पॅथिक यांच्या सूचने नुसार वेव्हेल यांनी पंडित नेहरूच्या पुढे हंगामी सरकार स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला. अशाच प्रकारचे निमंत्रण त्यांनी जीना यांनाही पाठवले. काँग्रेस कार्यकारणीने वेव्हेल यांचा प्रस्ताव स्विकारला. नेहरू यांनी जीना यांनाही पत्र पाठवून हंगामी सरकारमध्ये सामील होण्याचे निमंत्रण केले. पण जीनांनी हे निमंत्रण फेटाळून लावले. अखेरीस हंगामी मंत्रिमंडळाची घोषणा करण्यात आली. यामध्ये वल्लभभाई पटेल, असफ अली, राजेन्द्र प्रसाद, शरतचंद्र बोस, अहमद खान, राजगोपालाचारी, इत्यादींचा समावेश होता. २ सप्टेंबर १९४६ रोजी हंगामी सरकारचा शपथविधी झाला. काँग्रेस मंत्रिमंडळातील मुस्लीम नेत्यांचा समावेश पाहून जीवा यांचा प्रचंड संताप झाला. त्यांनी याचा निषेध म्हणून त्यांच्यावर प्राणघातक हल्ले करण्यास प्रोत्साहन दिले. या सर्व घटनांना समर्थपणे तोंड देऊन नेहरूचे मंत्रिमंडळ कार्यरत होते. त्यामुळे वेव्हेल यांना महत्त्व मिळेना. पॅथिक यांनी काँग्रेस सरकार व्यवस्थित सुरू असल्याने लीगला यात समाविष्ट करू नये अशी सूचना दिली असताना वेव्हेल जीनांशी वाटाघाटी करू लागले. हंमागी सरकारमधे समाविष्ट होणे कसे फायदयाचे आहे, हे जीनांना पटवून देऊ लागले. जीना हंगामी सरकारमध्ये येण्यास उत्सुक आहेत. अशा प्रकारचा निरोप वेव्हेल यांनी नेहरूंना दिला. नेहरू यांनी मुस्लीम लीगला मंत्रिमंडळात समाविष्ट करून घेतले. हंगामी सरकारमध्ये येताच जबाबदार व्यक्तीप्रमाणे न वागता जीवा आक्रमक व बेताल वक्तव्य करू लागले. नेहरूंच्या प्रत्येक निर्णयावर लीगचे सदस्य आपेक्ष घेऊ लागले. अशा त्यांना काम करणे अवघड झाले. मुस्लीम लीगचे काही नंतर स्वतंत्र पाकिस्तान मिळवण्यासाठीच आम्ही हंगामी सरकारमधे सामील झालो अशी बतावणी करू लागले. लीगच्या सदस्यांनी सुरू केलेल्या या अडवणुकीबाबत वेव्हेल यांच्याकडे तक्रार करण्यात आली मात्र त्याची खास दखल त्यांनी घेतली नाही.

## ७.१० नौखाली हत्याकांड

मुस्लीम लीगने मंत्रिमंडळात सहभाग घेतल्यानंतर थोड्याच दिवसात बंगालमधे नौखाली येथे जातीय दंगे सुरू झाल्याची बातमी समोर आली. येथे मुस्लीमांनी हिंदु समाजाच्या घरांवर हल्ले सुरु केले. त्यामुळे बिहारमधील हिंदुनी याचा सूड तेथील मुस्लीमांवर उगवण्यास सुरूवात केली. या जातीय आगीने नौखाली व बिहार पेटून उठले. या हिंसाचारास आळा घालण्यासाठी गांधीजी यांनी नौखालीचा दौरा केला. तेथील परिस्थिती अतिशय स्फोटक होती. असहाय गरीब लोक अत्याचाराने पिडित होते. गांधीजींनी हिंदु व मुस्लीम समुदायाशी बोलणे सुरू केले व पाशवी वृत्ती सोडून मानवता अंगिकारण्याचे आवाहन केले; बिहारमधील हिंदु समाजाला शांत करण्यासाठी डॉ.राजेन्द्र प्रसाद यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली दरम्यान घटना समितीत लीगने सहभागी व्हावे असा आग्रह काँग्रेसने धरला मात्र लीगला त्यात सहभागी व्हायचे नव्हते. जीना यांच्या ताठर भूमिकेमुळे गंभीर राजकीय पेच तयार झाला होता.

## ७.११ घटना समितीचे पहिले अधिवेशन

घटना समितीचे पहिले अधिवेशन ९ डिसेंबर रोजी दिल्ली येथे सुरू झाले. अधिवेशनाला सुमारे दोनशे सदस्य उपस्थित होते. मुस्लिम लीगचे नेते यावेळेस गैरहजर राहीले. त्यांच्या अनुपस्थितीत घटना समितीचे अधिवेशन सुरू झाले. घटना समितीचे कामकाज निर्धारित करण्यासाठी पंधरा सदस्यांची समिती गठीत करण्यात आली. घटना समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ.राजेन्द्र प्रसाद यांची एकमुखाने निवड करण्यात आली. निष्णात कायदेतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. त्यांनी सर्व सदस्यांना मतभेद विसरून प्रबळ राष्ट्र  निर्माण करण्यासाठी सिद्ध व्हावे असे आवाहन केले.

स्वतंत्र भारताची घटना तयार करण्यासाठी घटना समितीचे कामकाज सुरू असताना मुस्लीम लीगने ३१ डिसेंबरला लीगने अधिवेशन भरवले व घटना समितीच्या कार्यपद्धतीवर टीका केली. ही घटना लीग अजिबात मान्य करणार नाही अशी भूमिका लीगने घेतली. लीगच्या या भाषेमुळे काँग्रेस व लीगमधील सर्व तडफोडीचे मार्ग बंद झाले. १९४६च्या अखेरीस देशाची राजकीय  परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण होती. अशा परिस्थितीत २४ मार्च १९४७ मध्ये माऊंटबॅटन यांची भारताचे गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक करण्यात आली. हे पद घेत असतानाच त्यांनी ब्रिटीश मंत्रिमंडळाला, ब्रिटीशांनी भारत सोडण्याची कालनिश्चिती करावी व यासाठी माऊंटबॅटन यांना कार्यस्वातंत्र्य दयावे अशी मागणी मान्य करून घेतली. माऊंटबॅटन यांना भारतातील तणावपूर्ण परिस्थितीची जाणीव होती. जिना हे पाकिस्तानच्या मागणीवर अडून बसले होते. या पार्श्वभूमीवर त्यांनी सत्तांवराच्या वाटाघाटी सुरू केल्या.

## ७.१२ माऊंटबॅटन योजना

सत्तांतराची कोणती योजना सर्वमान्य ठरेल याचा आढावा घेण्यासाठी माऊंटबॅटन यांनी भारतीय नेत्यांशी चर्चा केली. सर्व नेत्यांची बैठक बोलावण्याऐवजी प्रत्येक नेत्याशी वैयक्तीक चर्चा केली. त्यांची भूमिका समजावून घेतली. २५ मार्च ते एप्रिल दरम्यान त्यांनी नेहरू, गांधी, जिना, लियाकत अली, बलदेवासिंग, व इतर संस्थानिकांच्या भेटी घेतल्या. जिना पाकिस्तानखेरीज कोणताही पर्याय मान्य करण्यास तयार नव्हते. भारतीय पुढाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर त्यांनी प्रांतिक गव्हर्नर सोबत चर्चा केली. २ जून रोजी काँग्रेस व लीगच्या प्रत्येकी तीन प्रमुख नेत्यांना चर्चेसाठी निमंत्रित करण्यात आले या सर्व चर्चेनंतर माऊंटबॅटन यांनी देशाची फाळणीची अपरिहार्यता मान्य करून आपली योजना मांडली.

माऊंटबॅटन योजनेची कलमे

१) भारताचे विभाजन करून भारत व पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र राष्ट्र अस्तित्वात येतील.

munotes.in

२) भारत व पाकिस्तान यांना सत्ता सुपूर्द केल्यानंतर ब्रिटीशांचे सार्वभौमत्व सपुष्टात येईल.

३) दोन स्वतंत्र राष्ट्र निर्माण झाल्यावर त्यांनी फाळणीशी संलग्न असलेल्या समस्यांवर वाटाघाटी करून निर्णय घ्यावा.

४) अस्तित्वात असलेली घटनासमिती कार्यरत राहील. त्यांना घटनासमिती मान्य नसेल त्यांनी स्वतंत्र घटना समिती बनवून त्याप्रमाणे निर्णय घ्यावा.

५) सिंधने कोणत्या घटनासमितीत सामील व्हावे याचा निर्णय विधिमंडळातील सदस्य घेतील.

६) वायव्य सरहद्द प्रांत व बलुचिस्थान यांच्या राजकीय भवितव्याचा निर्णय सार्वमताने घेतला जाईल.

७) आसाम प्रांतातील सिल्हेट जिल्ह्याचा निर्णय सार्वमतानुसार घेतला जाईल. उर्वरीत प्रदेश तेथील कार्यान्वित घटना समितींतर्गत येईल.

८) पंजाब व बंगाल प्रांताच्या कायदेमंडळाची दोन विभागात विभाजन केले जाईल. मुस्लीम व गैरमुस्लीम अशा गटवारी करून त्यांच्या वेगवेगळ्या बैठकी होतील. व प्रांतांच्या विभाजनाच्या निर्णय बहुमताने घेतला जाईल.

९) सीमा निर्धारणासाठी वेगळी समिती स्थापन करण्यात येईल असे या योजनेत नमूद केले होते.

**भारतीयांची प्रतिक्रिया -**

भारतीयांना माऊंटबॅटन योजनेचा प्रथम विरोध केला. हिंदुमहासभेच्या कार्यकारणीने फाळणीला विरोध केला. समाजवादी व साम्यवादी पक्षांनीही फाळणीमुळे होणारे देशाचे विभाजन अमान्य केले. फाळणीची योजना म्हणजे काँग्रेसच्या दुर्बळ व शरणागतीच्या धोरणाचा परिपाक आहे अशी टीका होऊ लागली. महात्मा गांधी यांनी सुरूवातीपासूनच फाळणीला कसून विरोध केला त्याविरुध्द आपण प्राणपणाने लढू असा इशारा त्यांनी माऊंटबॅटन यांना दिला. काँग्रेसमधील अनेक नेते फाळणीच्या बाजूने होते. त्यामुळे गांधीजींना फाळणीला मान्यता देण्याशिवाय कोणता पर्यायच राहीला नाही.

१४ रोजी झालेल्या काँग्रेस महासमितीच्या बैठकीत फाळणीच्या निर्णयाला संमती देण्यात आली. फाळणी मान्य करण्यामागे नेहरूंनी भूमिका स्पष्ट केली. मौलाना आझाद, डॉ.किचलू, मौलाना हफीज रहमान, पुरुषोत्तम टंडन यांनी तीव्रपणे फाळणीला विरोध केला. खान अब्दुल गफारखान या वायव्य सरहद्द प्रांतांत लढणाऱ्या गांधीवादी नेत्यानेही फाळणीला विरोध केला. अशा परिस्थितीत काँग्रेसने फाळणी स्वीकारणे म्हणजे स्वातंत्र्य संग्रामात लढणाऱ्या लोकांना वाऱ्यावर सोडून देण्यासारखे आहे, अशी त्यांची भावना झाली. अशा प्रकारे फाळणी टाळण्यासाठी जी धडपड केली गेली ती लयाला जाऊन देशाचे विभाजन अपरिहार्यपणे मान्य करण्यात आले.

munotes.in

## ७.१३ १९४७ चा भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा

जून १९४८ पर्यंत भारतावरील अधिकार सोडवण्याचा अंतिम निर्णय ब्रिटीश पंतप्रधानमंत्री ॲटली यांनी घोषित केला. माऊंटबॅटन योजना भारतातील काँग्रेस व लीग दोघांनी मान्य केली व त्या आशयाचे विधेयक ४ जुलै १९४७ मध्ये पार्लमेंटमध्ये मांडले. ब्रिटीश संसदेने १५ दिवसाच्या आत भारतीय स्वातंत्र्याचा कायदा संमत केला.

कायद्यातील तरतुदी

१) भारत व पाकिस्तान अशी दोन स्वायत्त राज्ये १५ ऑगस्ट १९४७ रोजी निर्माण करण्यात यावीत आणि पार्लमेंटचे भारतावरील अधिकार व दोन राज्यांच्या हाती सोपविण्यात यावेत.

२) १५ ऑगस्ट १९४७ नंतर या दोन राज्यांच्या कोणत्याही भागावर अगर प्रदेशावर ब्रिटीश सरकारचे नियंत्रण राहाणार नाही.

३) या दोन राज्यांच्या प्रादेशिक सीमा निर्धारित करण्यात याव्यात व त्यात बदल करण्याचा अधिकार त्यांना असावा.

४) या राज्यांच्या कार्यान्वित असलेल्या घटनासमित्यांना नवी घटना तयार होईपर्यंत आपआपल्या राज्याविषयी कायदे करण्याचा अधिकार असावा. ब्रिटिश शासनाच्या काळात केंद्रीय शासनाला असलेले सर्व अधिकार या घटनासमित्यांना हस्तांतरित करण्यात यावेत, म्हणजेच घटनासमित्यांनी घटना तयार करण्याबरोबरच केंद्रीय विधिमंडळ म्हणूनही कार्य करावयाचे होते.

५) या राज्यांच्या घटनासमित्यांना आपआपल्या राज्यासाठी घटना तयार करण्याचा पूर्ण अधिकार राहील. प्रारंभी ही स्वायत्त राज्ये राष्ट्र कुलाची सदस्य राहतील. नंतर मात्र ब्रिटिश राष्ट्रकुलाचे सदस्यत्व घ्यावयाचे की नाही हा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्यांना राहील.

६) नव्या घटना तयार होईपर्यंत ह्या राज्यांचा व त्यांतील प्रांतांचा राज्यकारभार १९३५ च्या कायद्यानुसार चालेल. त्या कायद्यात गरजेनुसार आवश्यक ते बदल करण्याचा अधिकार घटनासमित्यांना राहील.

७) या दोन स्वायत्त राज्याचा गव्हर्नर जनरल हा घटनात्मक प्रमुख राहील. नव्याने पास होणाऱ्या विधेयकांना त्याची मान्यता आवश्यक राहील.

८) ग्रेट ब्रिटनचा राजा हा यापुढे भारताचा सम्राट राहाणार नाही, आणि भारत व पाकिस्तान या स्वायत्त राज्यांच्या विधिमंडळांनी पारित केलेली विधेयके फेटाळण्याचा अधिकार ब्रिटिश सरकारला राहाणार नाही.

९) भारतावरील ब्रिटिश सत्ता संपुष्टात आल्यामुळे भारतमंत्र्याचे पद रद्द केले जावे. भारत व पाकिस्तानसंबंधींचे व्यवहार राष्ट्रकुल खात्याच्या सचिवाकडे सोपविण्यात यावेत.

१०) ह्या कायद्यान्वये भारतीय संस्थानांवरील ब्रिटिश सार्वभौमत्वाचे अधिकार रद्द करण्यात आले. भारत व पाकिस्तान यापैकी कोणत्या राज्यात सामील व्हावयाचे किंवा सामील न होता स्वतंत्र राहावयाचे याबाबतचे निर्णयस्वातंत्र्य त्यांना देण्यात आले. स्वायत्त राज्ये व संस्थाने यांचे परस्परांसंबंध त्यांनी परस्पर विचारविनिमयाने निर्धारित करावे अशी तरतूद करण्यात आली.

११) शासकीय सेवेतील अधिकारी वर्गाला असलेल्या सवलती व त्यांचे अधिकार हे पूर्वीप्रमाणेच चालू राहावेत.

१२) ह्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला दिला गेला.

या कायद्यानुसार भारताचे विभाजन होऊन भारत व पाकिस्तान ही दोन स्वतंत्र देश अस्तित्वात आले. लॉर्ड माऊंटबॅटन हे भारताचे पहिले गव्हर्नर जनरल, तर जिना हे पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल बनले. अशा प्रकारे १९४७ सालच्या कायद्याने भारताचे विभाजन होऊन भारत स्वतंत्र झाला.

## ७.१४ देशाची फाळणी

भारताच्या फाळणीचा निर्णय निश्चित झाल्यावर जून ते ऑगस्ट दरम्यान शाशकीय सोयीसाठी लॉर्ड माऊंटबॅटन यांच्याकडे दोन्ही राज्याच्या गव्हर्नर पदाची सूत्रे असावीत अशी सूचना पुढे आली. मात्र जिनांनी ती मान्य केली नाही. लष्कराची विभागणी १५ ऑगस्ट पूर्वीच व्हावी अशी मागणी त्यांनी केली. जसे जसे स्वातंत्र्य जवळ जवळ येत होते तसे तसे परस्पर द्वेष, शंका, सूड यांना उधाण आले. त्यामुळे राज्यकारभार चाळवणे व नव्या समस्या हाताळणे अशी दुहेरी कामे हंगामी सरकारला करावे लागत होते.

## ७.१५ रॅडक्लिफ निवाडा

जून १९४७ च्या अखेरीस पंजाब व बंगालची प्रादेशिक विभागणी करण्याच्या हेतूने रॅडक्लीफ यांना नेमण्यात आले. विभाजन करताना स्थानिक लोकांचे मत विचारात घेतले जाणार होते. सिंधच्या विधिमंडळाने पाकिस्तान सामील व्हायचा निर्णय घेतला होता. पंजाब व बंगाल विभाजन वेळेस अनेक समस्या होत्या. बंगालमधील १५ जिल्हे व पंजाबमधील काही जिल्हे याभागात गुंतागुंत होती. यामुळे निर्णक करणे अवघड होते. रॅडक्लीफ निवाड्यानुसार बंगालचे विभाजन पूर्व

व पश्चिम अशा दोन भागात करण्यात आले. पूर्व बंगालमधील ४९,४०० चौरस मैल प्रदेश व तीन कोटी नव्वद लाख लोकवस्तीचा प्रदेश पाकिस्तानला देण्यात आला तर पश्चिम बंगालमधील दोन कोटी बारा कोटी लोकसंख्येचा प्रदेश भारतात राहील. पंजाबचेही अशाच प्रकारे विभाजन करण्यात आले. रॅडक्लीफ यांनी फारस्या सखोल अभ्यास न करता कमीत कमी वेळात समस्या निपटून काढण्याच्या उद्देशाने निवाडा केला होता. त्यामुळे या विभाजन प्रक्रियेत अनेक दोष निर्माण झाले होते. पंजाबमधील शीख बांधवांना याचा मोठा फटका बसला होता. त्यांचे ऐक्य नाहीसे झाले होते. त्यांची काही धर्मस्थळे पाकीस्तानात गेली त्यामुळे रॅडक्लीफ यांच्या प्रचंड टीका झाली.

**पाकिस्तानची निर्मिती -**

७ ऑगस्ट १९४७ ला जिना कराचीला रवाना झाले. ११ ऑगस्टला पाकिस्तानच्या घटना समितीच्या बैठकीत अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. जिना यांनी पाकिस्तान हे धर्माधिष्ठीत राज्य रहाणार नसून सर्व नागरिकांना वंश अथवा धर्मभेद न मानता समान अधिकार मिळतील हे घोषित केले. १४ ऑगस्ट रोजी त्यांनी पाकिस्तानचा घटना समिती पुढे ब्रिटिश सम्राटांचा संदेश दाखवला व जिनांची गव्हर्नर जनरल म्हणून नियुक्ती झाल्याचे घोषित करण्यात आले.

**भारत स्वतंत्र झाला -** भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा १४ ऑगस्ट च्या मध्यरात्री म्हणजे १५ ऑगस्टला संसद सदनाच्या मुख्य सभागृहात भारताच्या घटनासमितीच्या बैठकीत करण्यात आली. पंडित नेहरू यांनी याप्रसंगी भावपूर्ण भाषण केले. घटनासमितीचे अध्यक्ष डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी भारतावरील ब्रिटिश प्रभुत्वाचा अंत झाला असून इग्लंडसोबत आमचे संबंध समानतेच्या तत्वावर राहतील असे घोषित केले. १५ ऑगस्टला नेहरूंच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र भारताच्या नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पाडला. मात्र याप्रसंगी गांधीजी तेथे हजर नव्हते. स्वातंत्र्यादिनी बंगालमध्ये उसळलेल्या दंगली शमवण्यासाठी गांधीजी प्राण धोक्यात घालून गावोगावी हिंडत होते.

## ७.१६ फाळणीचे दु:ख

भारताला स्वातंत्र्य मिळणे ही इतिहासातील महत्वाची घटना होय. १५ ऑगस्ट रोजी भारतास स्वातंत्र्य मिळाले. परंतू हा आनंद निर्भेळ नव्हता. देशाची फाळणी झाली होती. त्याचे दु:ख अपरिमित होते. भारत पाक सीमेवर होत असलेल्या हिंसाचार व जातीय दंगलीमुळे लोकांची मने काळवंडून गेली होती. १६ ऑगस्ट १९४६ च्या प्रत्यक्ष कृती दिनापासून जीनाप्राणित लीगने हिंसाचारास सुरूवात केली होती. बंगाल, बिहार व पंजाब मध्ये त्यांचे नेते उघडउघड हिंसाचार फैलावत होते. पाकिस्तानला मान्यता देण्यास ब्रिटिशांना भाग पाडावे व पाकिस्तान निर्मिती शिवाय दुसरा पर्याय नाही, हे काँग्रेसला पटवून दयावे, यादृष्टीने मुस्लीम लीगने पद्धतशीरपणे हिंसाचार सुरू केला होता. धर्माच्या नावावर हजारे जणांच्या क्रूर कत्तली घडवण्यात आल्या. पंजाब व बंगाल मध्ये हजारो निरपराध सामुहिक कत्तलीचे बळी पडले. हजारो हिंदु व शीख पश्चिम पंजाबमधून पूर्व पंजाबमध्ये तर

मुस्लीम पंजाबकडून पश्चिम पंजाबकडे जाऊ लागले. वाटेत त्यांच्यवर हल्ले होत. लूटमार, अपहरण, बलात्कार, या माणुसकीला काळीमा फासणाऱ्या गोष्टी घडल्या. फाळणीसाठी कोणतीही एकच बाब कारणीभूत नसून अनेक बाबी त्यास कारणीभूत होत्या. भारताचे विभाजन ही एक राष्ट्रीय आपदा होती. यासाठी पंडित नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल व गांधीजी यांना दोषी ठरवण्यात येते. गांधीजींवर देशातील हिंदू जातीयवाद्याकडूंन यासंदर्भात टीका करण्यात येते. परंतू गांधीजी हेच फाळणी करण्याच्या विरुद्ध होते. ही बाब सोयीस्कररित्या विसरली जाते. माऊंटबॅटनला प्रथम गांधींजीनी ठणकावून सांगितले होते की फाळणीचा निर्णय त्यांना बिलकूल मान्य नव्हता व त्याविरूद्ध ते प्राणपणाने लढतील. मौलाना आझाद यांना इंडिया विन्स फ्रिडम या स्मृतिग्रंथात गांधी व नेहरू विभाजनाच्या विरोधात होते पण पटेलांच्या व माऊंटबॅटन यांच्या प्रभावाखाली त्यांनी फाळणीस संमती दिली असा अभिप्राय नोंदविला आहे. ह्या मतांचा अभ्यास केल्यास कुणी एक व्यक्ती किंवा कोणती एक परिस्थिती फाळणीसाठी जबाबदार नसल्याचे स्पष्ट होते. देशाच्या फाळणीसाठी ब्रिटिशांचे फूटीरतावादी धोरण प्रकर्षाने जबाबदार होते.

१८५७ च्या राष्ट्रीय उठावानंतर ब्रिटिशांनी हेतुतः भारतीय समाजात फूट पाडण्यासाठी हिंदु व मुस्लीम जमातवादाखाली उत्तेजन दिले. जेणेकरून राष्ट्रीयत्वाची भावना हिंदु व मुस्लीम जमान वादाखाली दडपली जाईल. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस देशाच्या लोकातील समस्येसाठी झगडत असताना मुस्लीमलीग, हिंदु महासभा यांनी धर्माच्या आधारावर जमातवादाचा वणवा पेटवला. त्यात काँग्रेसने सुमारे ५० वर्षे ब्रिटिश शाशनाविरुद्ध लढा देऊनही अखेरच्या क्षणी पाकिस्तानची मागणी करून या जमातवादाला अप्रत्यक्षपणे बळ दिले. भारताचे विभाजन व्हावे ही भूमिका ब्रिटिश राज्यकर्त्यांची होतीच भारतीय उपखंडात भारतासारखे बलाढ्य राष्ट्रअखंडपणे उदयाला आले तर आपल्याला भविष्यात आंतरराष्ट्रीय राजकारणात त्रास होऊ शकतो हे त्यांनी जाणते. अशा रितीने ब्रिटिशांची फुटीरवादी चळवळीस मदत, हिंदु जमातवादी, मुस्लीम जमातवादी पक्ष, या सर्वांचा परिणाम म्हणून भारताची अपरिहार्यपणे फाळणी झाली.

**आपली प्रगती तपासा :**

१) माउंटबेटन योजनेविषयी थोडक्यात माहिती लिहा.

## ७.१७ सारांश

१८५७ च्या उठावानंतर देशात ब्रिटिशांनी जमातवादाचे राजकारण वाढवून आपली सत्ता कायम ठेवण्यासाठी प्रयत्न केले. त्याचसोबत वेळोवेळी कायदे संमत करून संवैधानिक तरतूदी लागी केल्या. त्यांचा अल्प प्रमाणात फायदा होत असे कारण, गव्हर्नर जनरला सर्वाधिकार होते. मात्र प्रथम व द्वितीय महायुद्धानंतर ब्रिटिश सत्तेला हादरे बसले होते. भारतामधील स्वातंत्र्याची आस वाढली होती. सर्वसामान्य जनता जागरूक होऊ लागली. या पार्श्वभूमीवर ब्रिटिशांनी ऑगस्ट योजना, क्रिप्स योजना, कॅबिनेट मिशन योजना व शेवटी माऊंटबॅटन योजना आणली. प्रत्येक योजनेत काँग्रेस व लीग व इतर पक्ष यांच्यात मतैक्य होत नव्हते. अखेरीस माऊंटबॅटन योजनेवर मतैक्य झाले व फाळणीसोबत भारतीय स्वातंत्र्याचा कायदा संमत झाला.

## ७.१८ प्रश्न

(१) १९३५ च्या भारत शाशन कायद्याची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

(२) १९३५ च्या कायद्यामध्ये कोणकोणत्या तरतूदी होत्या ?

(३) क्रिप्स योजना पाठवण्यामागे कारणे नमूद करून तिचे स्वरूप स्पष्ट करा.

(४) कॅबिनेट मिशन योजनेबद्दल विस्तृत माहीती दया व भारतीयांची प्रतिक्रिया नमूद करा.

(५) माऊंटबॅटन योजनेतील महत्त्वाच्या तरतूदी कोणत्या ?

(६) भारतीय स्वातंत्र्याचा कायदा व त्यातील तरतूदी यावर विस्तृत टीप लिहा.

(७) भारताची फाळणी अपरिहार्य घटना होती का ? यावर चर्चा करा.

(८) देशाची फाळणी स्विकारल्यानंतर कोणते परिणाम झाले ते नमूद करा.

## ७.१९ संदर्भ सूची

(१) बिपिन चंद्र, हिस्ट्री ऑफ मॉर्डन इंडिया, ओरिएटंल ब्लकस्वॅन, २००१

(२) डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास (१९२१ ते १९४७); श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर १९९९.

(३) ग्रोव्हर ॲण्ड ग्रोव्हर, ए.न्यू लूक अॅट मॉडर्न इंडियन हिस्ट्री, एस. चांद, २००१.

♦ ♦ ♦ ♦ ♦

## QUESTION PAPER PATTERN
## Subject : History Paper - I
## Semester- I

History of Modern India (1857-1947) (100 Marks)

(1) All Question are compulsory
(2) All Question Carry Equal Marks
(3) Figures to the right indicates marks to a Sub – Question

Q1. Attempt any two of the following (On Module – I) (20 marks)
A)
B)
C)

Q2. Attempt any two of the following (On Module – II) (20 marks)
A)
B)
C)

Q3. Attempt any two of the following(On Module – III) (20 marks)
A)
B)
C)

Q4. Attempt any two of the following (On Module – IV) (20 marks)
A)
B)
C)

Q5. Write any two short notes. (20 marks)
A)
B)
C)
D)

❖❖❖❖

munotes.in